आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

२१ जुलै २०११ | वर्ष २८ | अंक ८

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

₹ १०



# अतिरेक्यांनो तुमचे स्वागत आहे

मुखपृष्ठावरील छायाचित्र २६/११ च्या हल्ल्यानंतर २९/११ रोजी मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनस येथे काढलेले आहे. फलाट क्र. १४ ते १८ चा मार्ग जेथून जातो तेथे रेल्वे मालवाहतूक कार्यालय आहे. तसेच मुख्य फलाटाच्या टोकाला नावाचे एक रेस्टॉरंट आहे. याच समोरच्या जागेतून कसाब आणि त्याचा साथीदार रेल्वे स्थानकावर घुसले होते. त्यांनी अगोदर या रेस्टॉरंटच्या दिशेने गोळीबार केला. त्यातली एक गोळी वर्मी लागून रेस्टॉरंटचे मालक मरण पावले. कसाबने बेछूटपणे चालवलेल्या गोळ्यांपैकी काही गोळ्या वरच्या मजल्यावरील काचा फोडून आतील बाजूस लागल्या. तीच ही काच आहे.

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक ८ । २१ जुलै २०११

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सल्लागार संपादक
**डॉ. मानवेंद्र काचोळे**
**डॉ. गिरधर पाटील**

साहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठावरील छायाचित्र
**श्रीकृष्ण उमरीकर**

अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : ₹ २०० केवळ**

**(टीप : वर्गणीदारांनी अंकांसंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**


**संपर्क :** कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक, जनशक्ती वाचक चळवळ, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१, फोन : ०२४०-२३४१००४. ईमेल : shetkarisanghatak@gmail.com


● हा अंक मालक परदेशी मोहन बिहारीलाल यांच्यासाठी संपादक, मुद्रक, प्रकाशक म्हात्रे सुरेशचंद्र पी., मु.पो. आंबेठाण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१ यांनी उदय एंटरप्राईजेस, ७० सी, सर्व्हिस इंडस्ट्रीज टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद ४३१००३ येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, 'पिनाक', समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.


# अंतरंग


जागरण
**अतिरेक्यांनो तुमचे स्वागत आहे**
श्रीकृष्ण उमरीकर ........ ३

शरदऋतू
**आतंकवाद्यांचे भारतावर उपकार**
शरद जोशी ........ ७

आजकाल
**न्यायालयीन सक्रीयता की लोकप्रतिनिधींची निष्क्रीयता**
ज्ञानेश्वर शेलार ........ ११

मुद्दा
**मग चळवळी का थंडावणार नाहीत?**
रवि देवांग ........ १४

मधोमध
**भारताच्या रोजच्या मृत्यूचे सोयरसुतक कुणाला**
दत्ता जोशी ........ १६

कॉमन नॉन सेन्स
**मंत्रिमंडळातील फेरबदल : शेतीच्या झारीतील शुक्राचार्यांना बक्षिसी**
सुधाकर जाधव ........ १९

आवाहन
**बळिराजा डॉट कॉम**
गंगाधर मुटे ........ २१

वाङ्मय शेती
**भोंडला, हादगा आणि भुलाबाईची गाणी : महिलांच्या व्यथा**
गंगाधर मुटे ........ २३

भारत की जुबानी
**सोने की सीढी**
ॲड. दिनेश शर्मा ........ २६

(उ)संतवाणी
**अलीगढ की पदयात्रा**
'थंडा' महाराज देगलूरकर ........ २९

**शेतकरी संघटना वृत्त** ........ ३१

संपादकीय * श्रीकांत उमरीकर

# हे सरकार पांगळे । न्यायदेवता आंधळी ।।

मुंबईच्या बॉम्बस्फोटाने आपलं सरकार किती पांगळं आहे, हेच परत एकदा सिद्ध केलं आहे. २६ नोव्हेंबर २००८ च्या दहशतवादी हल्ल्यापासून आपण काहीच शहाणपण घेतलं नाही. परिणामी, अजून एका बॉम्ब स्फोटाला महानगरी मुंबईला तोंड द्यावं लागतं आहे. सरकारच्या हलगर्जीपणाबद्दल सगळेच टीका करत आहेत. आणि ती टीका ही योग्यही आहे. पण या निमित्ताने एक वेगळा मुद्दा विचारात घ्यायला हवा. सगळा विकास, सगळ्या आर्थिक उलाढाली एकाच ठिकाणी आणून ठेवायच्या. फार मोठी लोकसंख्या स्वाभाविकचपणे त्या ठिकाणी केंद्रीत होणार. फार मोठी उलाढाल, त्या ठिकाणी होत राहाणार याचा परिणाम म्हणजे असं केंद्र अतिशय स्वाभाविकपणे कुठल्याही दहशतवादी कारवायांचं लक्ष्य ठरणार. गेल्या साठ वर्षांत मुंबईचं महत्त्व आपण सगळ्यांनी मिळून वाढवत नेलं. फक्त महाराष्ट्रच नव्हे, तर भारतभरातून मुंबईकडे पुराच्या पाण्यासारखे माणसांचे लोंढे वाहत आले. याचं कारण काय? सुखासुखी कशामुळे लोकांनी आपली घरेदारे सोडली आणि बकाल मुंबई गाठली. याचं उत्तर म्हणजे किमान सोयी-सवलती आपण भारताच्या ग्रामीण भागात पुरवू शकलो नाही. भारताच्या ग्रामीण, अर्धग्रामीण अशा नगरांमधून समप्रमाणात विकास होऊ शकला नाही. परिणामी, लोकांचे लोंढे मोठ्या शहरांकडे वाहत गेले. फक्त मुंबईच नाही तर दिल्ली, कलकत्ता, चेन्नई, हैदराबाद, बंगळुरू, अहमदाबाद, पुणे, नागपूर इत्यादी सगळ्यांची कमीअधिक प्रमाणात हीच स्थिती आहे. उद्योगधंदे आणि इतर क्षेत्रं तर सोडाच, सर्व राजकीय निर्णय ठरण्याचं केंद्र म्हणजे मुंबई. एखाद्या शहराचा नियोजन आराखडा असो, मोठमोठे औद्योगिक प्रकल्प असो, शेती संदर्भात निर्णय असो, की जिल्हा परिषदेतल्या मास्तरची बदली असो. प्रत्येकाने उठावे आणि मुंबई गाठावी. ही गर्दी आम्ही सगळे मिळून वाढवत नेली आहे. शासकीय धोरणांमुळे ही गर्दी वाढण्यात मदतच झाली आहे. अशी गोळा झालेली प्रचंड लोकसंख्या मग स्वाभाविकच दहशतवादी हल्ल्यात बळी पडण्यासाठी दहशतवाद्यांना कमालीची सोयीस्कर ठरते. मुंबईमधून राजकीय निर्णय प्रक्रियेची केंद्र इतर ठिकाणी हलवणं तर सोडाच, नवी मुंबईतल्या कोकण भवनात हलवायचं ठरलं होतं तर प्रचंड विरोध झाला. हा विरोध कुणी केला? हा विरोध करणाऱ्यांना आता विचारायला पाहिजे, मुंबईमधली गर्दी वाढवून तुम्ही काय साधलं? सगळ्यांत पहिल्यांदा हा विचार आपल्याला करावा लागेल, भारतभरच्या ग्रामीण भागाचा विकास कसा होऊ शकेल? हा विकास घडला तर मुंबईच नव्हे तर इतरही शहरांत येणारे ग्रामीण भागांतले माणसांचे लोंढे कमी होतील. महाराष्ट्राचंच उदाहरण आहे- मागील हंगामात कापसाचा भाव ७ हजारांपर्यंत पोहोचला आणि ग्रामीण भागातली स्थलांतरं कमी झाली, इतकंच नाही तर जमिनीचे सौदेही थांबले. हेही एक उदाहरण पुरेसं बोलकं आहे.



मुंबई बॉम्बस्फोटाच्या संदर्भात अजून एक मुद्दा मोठा गंभीर आहे आणि तो म्हणजे भारतातील न्यायालयीन प्रक्रिया. २६/११ च्या हल्ल्यातील आरोपी अजमल कसाब, याच्यावरती खटला अजूनही चालू आहे. खटल्याचा निकाल दुसऱ्यांदा बॉम्बस्फोट झाला तरी लागलेला नाही. वृत्तपत्रांनी आणि माध्यमांनी १३ जुलैचा हल्ला म्हणजे अजमल कसाबला वाढदिवसाची भेट आहे असे म्हणायला सुरुवात केली. प्रत्यक्षात कसाबचा वाढदिवस कुठला आहे तो मुद्दा वेगळा; पण ही टीका आपल्या न्यायव्यवस्थेवरती गंभीर शंका उपस्थित करते हे लक्षात घ्यायला हवे. 'अदालत में इन्साफ नहीं सिर्फ तारीख मिलती है' हा संवाद फक्त चित्रपटातला उरलेला नाही, या संवादाचे वास्तव चटके सगळ्यांनाच भोगायला लागत आहेत. नुसती चर्चा करण्यापेक्षा न्यायालयीन प्रक्रियेच्या जलद गतीसाठी ठोस काही कृती करणे नितांत गरजेचे आहे. न्यायालयाची जी रचना सध्या अस्तित्वात आहे त्याहून अधिक आणि वेगळ्या अशा संरचनेचा विचार व्हावा, काही सामान्य पातळीवरचे खटले, विविध न्यायाधिकरणांच्या मार्फत तातडीने कसे सुटतील ते बघितले जावे. तातडीने मिळालेला न्याय हा जास्त संयुक्तीक असतो. कसाबच नव्हे तर इतरही आरोपींच्या बाबतीत खटले प्रलंबित असणं हे आपल्या लोकशाहीला लांच्छनास्पद आहे.

आंधळी असलेली न्यायदेवता आणि पांगळं बनलेलं सरकार अशा परिस्थितीत सगळ्यांत पहिली गरज आहे, सर्वसामान्य माणसांनी धीर ठेवण्याची. अन्यथा 'या लोकशाहीचं काही खरं नाही, हुकूमशाहीच पाहिजे, धडाधड सगळ्यांना गोळ्या घातल्या पाहिजेत' असं म्हणणाऱ्यांची संख्या वाढते. हे लोक विसरून जातात, २६/११ च्या हल्ल्यापासून ते १३ जुलैच्या बॉम्बस्फोटापर्यंत मृतांची संख्या ६००च्या जवळपास आहे. तर याच कालावधीमध्ये ज्यांच्याकडे आपण संशयाने पाहतो, त्या पाकिस्तानमधील दहशतवादी हल्ल्यांत मृत पावलेल्या सामान्य पाकिस्तानी नागरिकांची संख्या ७००० इतकी प्रचंड आहे. दहशतवादाची मनुष्य हानीच्या बाबतीत जी किंमत आपण मोजतो आहोत त्याच्या किमान दहापट किंमत पाकिस्तानने मोजली आहे आणि सगळ्यांत भीषण म्हणजे लोकशाहीची आशा असलेलं बेनझीर भुत्तोचं नेतृत्व त्यांनी अशा हल्ल्यांमध्ये गमावलं आहे. तेव्हा हुकूमशाहीची भाषा करणाऱ्यांचा बाष्कळपणा सगळ्यात पहिले लक्षात घ्यायला हवा. लोकशाहीवरची आपली श्रद्धा दृढ झाली तरच या समस्यांना आपण जास्त सक्षमपणे तोंड देऊ शकूत. आपल्या पेक्षा जास्त प्रगल्भता अमेरिकन लोकशाहीने दाखविलेली आहे आणि म्हणूनच दहशतवादाला तोंड देणं त्यांना शक्य होतं आहे. ९/११च्या हल्ल्यानंतर आजतागायत एकही मोठा हल्ला अमेरिकेवर झाला नाही. हा अमेरिकेच्या युद्धखोर धोरणाचा विजय नसून सर्वसामान्य माणसांच्या लोकशाहीप्रेमाचा विजय आहे.



# अतिरेक्यांनो तुमचे स्वागत आहे

मुंबईचे मन खरेच फार मोठे आणि उदार आहे. कोणाला आवडो अथवा नावडो मुंबई सर्वांचेच स्वागत करते. मोकळ्या मनाने आपले बाहू पसरून ती सर्वांना आपल्या कवेत घेते. येणारे बिहारी असोत वा उत्तरप्रदेशचे भय्ये, दक्षिणेतले लुंगीवाले असोत वा पुर्वोत्तरचे 'बहादूर'- मुंबईत सर्वांचे स्वागतच आहे. इतकेच काय, मुंबईवर हल्ला करायला आलेल्या अतिरेक्यांचेही स्वागत आपली मुंबई (मी मराठी असल्यामुळे मला तसे म्हणायचा अधिकार आहे ना? का मुंबई फक्त काही 'सेनापती नि त्यांच्या सेनांची' आहे?) मोठ्या मनाने करते आणि यातच मुंबईचे मोठेपण 'झळकते.'

आमचा एक वैयक्तिक अनुभव इथे देणे अप्रस्तूत ठरणार नाही. मुंबईवर झलेल्या २६ नोव्हेंबरच्या हल्ल्यानंतर २९ नोव्हेंबर रोजी मी छत्रपती शिवाजी टर्मीनस येथे गेलो होतो. मुख्य रस्त्यावर गर्दी असल्यामुळे फलाट क्र. १७-१८ च्या बाजुने माझा टॅक्सीवाला मला घेऊन गेला. कसाब आणि त्याचे साथीदार याच बाजूने स्टेशनमध्ये घुसले होते. ही बाजू फार सुनसान असते. इथे तुरळक माणसे असतात. माझी गाडी उभी करून मी माझे सामान बाहेर काढले. माझ्याजवळ कॅमेऱ्याचे स्टँड (ट्रायपॉड) होते. लंबुळक्या पिशवीत हे स्टँड किंवा बंदूक असली तर काही वेगळे दिसणार नाही. स्टेशनच्या दारात ३ पोलिस बसले होते. मी गाडीतून उतरल्यावर माझ्या जवळच्या लंबुळक्या पिशवीत काय आहे असे ते मला विचारतील असे मला वाटले; पण लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांनी माझ्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. आपली जागा सोडून ते तीन-चारजण बाजुला निघून गेले. काही काळ छत्रपती शिवाजी टर्मीनसच्या त्या बाजुला कोणीच नव्हते. मी माझी गाडी पकडून पुढे गेलो; पण आपण किती असुरक्षीत आहोत ही भावना माझ्या मनात घर करून राहिली. सर्वसाधारण विचार करता हे सहज लक्षात येते की जोवर एखादी स्थनिक व्यक्ती बाहेरच्या व्यक्तीला मदत करायला तयार आहे तोवर देशात कुठेही केव्हाही अतिरेक हल्ला होऊ शकतो. मुंबईसारख्या सर्वांचे स्वागत करणाऱ्या शहरात तर खासच!

**मुंबई स्पिरीट**

हल्ले होऊनही पुन्हा आपले काम चालू ठेवणाऱ्या ज्या 'मुंबई स्पिरीट'चे सगळे कौतुक करतात तेच मुंबई अस्थिर करत आहे असे मला वाटते. कारण दुसऱ्या एखाद्या शहरात जर असा हल्ला झाला, तर काही काळ तिथले व्यवहार बंद पडतील. जनता हैराण होईल. चिंताग्रस्त होईल. शाळा-कॉलेज एक-दोन दिवस उघडणार नाहीत. काही दुकानदार आपली दुकाने बंद ठेवतील. बाबरी प्रकरणाचा निकाल ज्या दिवशी लागणार होता त्या दुपारी आमच्या परभणीतील बाजारपेठ बंद होती; पण मुंबईत व्यवहार चालू होते. या मागे मुंबईकरांची 'आपण बरे नि आपले काम बरे' ही वृत्ती आहे. याच वृत्तीला 'प्रोफेशर्नेलिझम' असे एक छान वाटणारे इंग्रजी नाव आहे; पण याच वृत्तीमुळे होते असे की, आपल्या बाजुच्या घरात कोण राहतो? तो काय करतो? माणूस भला आहे का नाही? त्याची बायको कोण? मुले किती? असा कुठलाच प्रश्न बहुतांश मुंबईकरांना पडत नाही. पडला तरी त्याचे उत्तर शोधण्याच्या भानगडीत तो पडत नाही, कारण त्याला वाटते 'आपण बरे नि आपले काम बरे!' त्यामुळे भर बाजारात डोळ्यांदेखत कोणाचा खून जरी झाला तर मुंबईकर आपला डबा नि छत्री सांभाळत आपल्या वाटेवर चालतो. झालेल्या घटनेची नोंद जणू त्याने घेतलेलीच नसते. याला निर्विकारपणा असे नाव द्या वा निर्ढावलेपण म्हणा वा 'प्रोफेशर्नेलिझम'- मुंबईत हेच घडते.

याचाच फायदा अतिरेकी घेतात. मुळात अतिरेकी तुमच्या आमच्यासारखी सामान्य माणसे आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. ही माणसे सहजपणे गर्दीत मिसळून जाऊ

शकतात. मुंबईत तर कोणीच दुसऱ्याकडे बघत नाही. त्यामुळे आपल्या शेजारच्या घरात ३-४ अनोळखी माणसे राहत आहेत ही बाब सामान्य मुंबईकरांच्या लक्षात कधीच येत नाही. आली तरी त्याकडे दुर्लक्ष करण्याची त्याला सवय झाली आहे. इतर कित्येक गावांमधे जर एखाद्या घरी कोणी पाहुणा आला तर तो कोण आहे? कशाला आला आहे? कधी जाणार आहे? आणि सगळी माहिती शेजाऱ्यापाजाऱ्यांना तत्काळ होते. काही लपून राहत नाही. आपल्या देशात बहुतांश शहरांत-गावात असेच घडते. तसे होत नाही फक्त मुंबईत. त्यातच मुंबई देशाची आर्थिक राजधानी. अत्यंत गर्दीचे महानगर. मुंबईवर हल्ला म्हणजे मोठ्या प्रमाणावर मनुष्य हानीची खात्री आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला धक्का. म्हणून ज्या शहरात आपल्या हालचालींकडे कोणी संशयाने बघणार नाही, ज्या शहरावर हल्ला केल्यास या मिळणार याची खात्री आहे तसेच आपले काम झाल्यावर पळून जायला किंवा लपून राहायला अनंत मार्ग आहेत अशा मुंबईवर सतत हल्ले न झाले तरच नवल! त्यामुळे मुंबईकरांनी आपण बरे नि आपले काम बरे ही वृत्ती सोडुन शेजाऱ्याच्या 'भानगडीत' खुशाल नाक खुपसावे. पोलिसांकडून त्रास होणार नसेल तर कित्येक नागरिक स्वतः होऊन आपल्या परिसरातील संशयास्पद व्यक्तींची माहिती पोलिसांना पुरवतील जर तसे होत नसेल तर पुन्हा होणाऱ्या हल्ल्यांसाठी आपण तयार राहावे!

### चुकते काय?

मुंबईवर झालेल्या हल्ल्यानंतर आपले महान गृहमंत्री आबांनी तोडलेले तारे- 'बडे बडे शहरोंमें छोटे छोटे हादसे होते रहते हैं' किंवा युवराज राहुलने उधळलेली मुक्ताफळे- '९९% हमले रोक दिये गये. १% हो सकते है' किंवा ताजचा तो विलासरावांचा रितेश बाळाला आणी राम गोपाळ वर्माला सोबत घेऊन केलेला दौरा किंवा नुकत्याच झालेल्या हल्ल्यानंतर रुग्णालयात जखमींची 'विचारपूस' करण्यासाठी फुटकळ आमदार-खासदार यांनी केलेला आटापिटा हे सगळं चूक आहे. आबा किंवा राहुल यांनी तोंड उघडायची गरज नव्हती. विलासरावांनी आपला दौरा शासकीय ठेवायला हवा होता. फुटकळ नेत्यांनी आपले फोटो वर्तमानपत्रात छापून यावेत म्हणून रुग्णांचे आरोग्य धोक्यात घालून जो मूर्खपणा केला तो संताप आणणारा होता.

त्यामुळे सारासार विवेक नसलेल्या नेत्यांनी अशा महत्त्वाच्या प्रसंगी आपले तोंड उघडले हे चुकले, वर्तमानपत्रात आपली बातमी यावी म्हणून जे जे केले ते चुकले.

### सुरक्षा यंत्रणेचे यशापयश

या आधीच्या हल्ल्यातील हल्लेखोर म्हणजे कसाब आणि त्याचे साथीदार बोटीतून मुंबईला आले म्हणून सागर किनाऱ्याचे रक्षण करणे महत्त्वाचे ठरले. त्यासाठी राज्य शासनाने ७ वेगवान बोटींची खरेदी केली. त्यांपैकी एक बुडाली आणि निकामी झाली आहे. या बोटींना एका तासाला १०० लिटर पेट्रोल लागते. सहा बोटी जर २४ तास गस्त घालणार असल्या तर इयत्ता तिसरीतल्या मुलालाही हे कळेल की या बोटींना दर आठवड्याला ६x२४x७x१००=१,००,८०० लिटर पेट्रोल लागेल. मात्र आपल्या उदार राज्यशासनाने केवळ ६०० लिटर पेट्रोल मंजूर केले आहे. म्हणजे केवळ ६ तासांचीच गस्त एका आठवड्यात घालता येते. इतर वेळेस समुद्रातून कोणी आले तर आले. जर पेट्रोलसाठी पैसे नव्हते तर मग सहा बोटी घेतल्या कशाला? त्यावर कडी म्हणजे नुकत्याच झालेल्या हल्ल्यानंतर मंत्रिमंडळाची जी बैठक झाली त्यात सर्वांनी आबांना धारेवर धरले. मग आबांनी कूरकूर केली की पोलिस खात्याला जास्त पैसे मिळावेत! त्यांना अजित पवारांनी सुनावले नुसते पैसे काय मागता योजना दाखल करा. म्हणजे २००८ च्या हल्ल्यानंतर पोलिस दलाच्या सुधारणांवर काही विशेष प्रयत्न झाले नाहीत. तसे असले तर आबांनी आपली उरलीसुरली लाज राखण्यासाठी तत्काळ राजीनामा द्यावा आणि आपल्या गावाकडे जाऊन जनतेची सेवा करावी. त्यासाठी मुंबईतच बसण्याची गरज नाही.

माजी रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांनी मुंबईतल्या महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांच्या सुरक्षेसाठी ठिकठिकाणी कॅमेरे लावण्यात यावे म्हणून बजेट मंजूर केले. रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी आपल्या नाकर्तेपणाचा पुरावा देत अजूनही कॅमेरे खरेदी केलेले नाहीत! अतिरेकी हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर हा ढिसाळपणा केवळ अक्षम्य नाही तर शिक्षेस पात्र आहे. दुर्दैवाने अकार्यक्षम अधिकाऱ्यांवर कोणी कारवाई केल्याचे उदाहरण आपल्या देशात पाहायला मिळत नाही.

आणि म्हणून ह्या रेल्वे अधिकाऱ्यांना कोणीच शिक्षा करणार नाही आणि त्यांची दिरंगाई अशीच चालू राहील.

मुंबईत रोज लाखो लोक रस्ता-रेल्वे-हवाई-सागरी मार्गाने येतात बाहेर-जातात. हजारो ट्रकमध्ये भरून वेगवेगळ्या प्रकारचे माल-सामान मुंबईत येत-जात असते. त्यामुळे मुंबईभोवती कुंपण उभारून तिच्या सगळ्या सीमा बंद करणे शक्य नाही; पण जर एखादी दुर्घटना घडलीच तर सरकार तथा सुरक्षा यंत्रणेने कशा प्रकारे प्रतिसाद द्यायचा याची योजना बनवून ती राबविणे शक्य आहे; पण दुर्दैवाने एकमेकांवर कुरघोडी करण्यात मग्न राजकारण्यांनी तसे काही व्हावे म्हणून काही केल्याचे ऐकिवात नाही. म्हणूनच परवाच्या हल्ल्यानंतर १५ मिनीटे एकाही जबाबदार पोलिस अधिकाऱ्याशी मी संपर्क करू शकलो नाही अशी कबुली राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी दिली. खरे तर अशा आणीबाणीच्या प्रसंगी सुरक्षा यंत्रणेने ठरलेल्या योजनेबरहुकूम प्रतिसाद द्यायला हवा. माध्यमांच्या प्रतिनिधींशी कोण बोलणार, सरकारी यंत्रणेला कोण माहिती देणार, तपासात काय निष्पन्न काय झाले-काय नाही, यातले माध्यमाला काय सांगणे गरजेचे आहे ते कोण सांगणार इत्यादी सर्व आधीच ठरवता येऊ शकते; पण आपल्याकडे सगळा सावळा गोंधळ होता. तो पाहून शेवटी केंद्रीय गृहमंत्र्यांना मध्ये पडून अधिकाऱ्यांना समज द्यावी लागली की माध्यमांशी बोलू नका. यावरही आबांनी आपल्या वार्ताहर परिषदेमध्ये काही बोलायचे होते; पण शरद पवारांनी त्यांना चाप लावला आणि न बोलण्याचा सल्ला दिला. सरकारकडे आपातकालीन व्यवस्थापनासाठी योजना तयार नसणे ही बाब अत्यंत गंभीर आहे. सरकारची ही घोडचूक आहे.

### महत्त्वाच्या ठिकाणांचा बंदोबस्त

मुंबईमध्ये येणारी स्फोटके किंवा अतिरेकी पूर्णपणे रोखणे शक्य नाही; पण अतिरेक्यांचे लक्ष बनू शकणाऱ्या जागांचा कडेकोट बंदोबस्त करणे मात्र शक्य आहे. आता झवेरी बाजारचेच पाहा. एका अरुंद रस्त्यावर हा बाजार आहे. या रस्त्यावर खूप गर्दी असते. याच परिसरात कपडा-कागद-नकली दागिने-

प्लॅस्टिक वस्तू-रसायने इत्यादींची घाऊक बाजारपेठसुध्दा आहे. त्याच बरोबर येथे गुजराती व्यापारी मोठ्या प्रमाणावर आहेत म्हणून त्याला पुन्हा पुन्हा लक्ष्य केले जाते असा समज आहे. हा सगळा परिसर छत्रपती शिवाजी टर्मीनसपासून जवळ आहे. येथे खरेदीसाठी हजारो लोक दररोज सगळ्या देशांतून येत असतात. येणाऱ्या प्रत्येकाची तपासणी करणे शक्य नसले तरी येथील अतिक्रमणे काढून गर्दी कमी करता येऊ शकते. मोक्याच्या जागी कॅमेरे बसवून त्या ठिकाणांची निगराणी करता येऊ शकते. त्यामुळे संशयीत व्यक्ती-वस्तु लवकर दृष्टीस पडून धोका टाळता येऊ शकतो. पण या दिशेने सरकारने काही केल्याचे दिसत नाही. एखादी योजना बनवली असली तरी सरकारी यंत्रणेची कार्यक्षमता पाहता तिची अंमलबजावणी होईपर्यंत यासारखे काही हल्ले होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचबरोबर तोपर्यंत केलेली उपाययोजना पुरेशी असेल अथवा नाही हे सांगता येत नाही. त्यामुळे सरकारचा निष्क्रियपणा ही एक चूकच आहे.

**वेगळा पर्याय**

या परिसरातील इमारती जुन्या आहेत. त्या सर्व (जर काही ऐतिहासीकदृष्ट्या महत्त्वाच्या असल्या तर त्या सोडून) पाडून एक आधुनिक बाजारपेठ नव्याने उभी करण्याच्या पर्यायाचा विचार करणे गरजेचे आहे. त्यामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून या महत्त्वाच्या बाजाराच्या सुरक्षेची परिपूर्ण व्यवस्था करता येऊ शकते. त्यासाठी गरज पडल्यास चटई निर्देशांकाचे नियम जरा शिथील करून सर्वच जागा मालकांना सध्या आहे तेवढी जागा देऊन जागेचा कल्पकतेने वापर केल्यास जास्ती जागा किंवा जागेच्या विक्रीतून जास्तीचा पैसा उभा करता येऊ शकतो. गरज आहे ती कल्पकता आणि राजकीय इच्छाशक्तीची. याचप्रमाणे मुंबईमधील इतर काही बाजारपेठा मुंबईच्या बाहेर हलवून त्यांना सर्व सोयीसुविधा पुरविण्यात याव्या जेणे करून दुकानदार नव्या जागी जातीलच सोबत खरेदी करणाऱ्यांचीही सोय होईल.

**क्रांतिकारी पर्याय**

पोलिसदलाचे आधुनिकीकरण करावे, अतिरेक्यांकडे आधुनिक बंदुका आणि पोलिसांकडे जुन्या बंदुका किंवा केवळ





लाठ्या, पोलिसांना प्रशिक्षण द्यावे, जास्त निधी द्यावा, नव्या पोलिसांची भरती करावी यासारखे अनेक उपाय सर्वजण सांगतात; पण खरे पाहता मुंबईची अवस्था सुधारणे कठीण आहे. राजकीय तथा आर्थिक सत्तेचे केंद्र अशाप्रकारे एकत्र असणे खरे तर धोकादायक आहे आणि म्हणून मुंबईचे त्रिभाजन करण्यात यावे. कारण मुंबईच्या समस्या सोडवणे एकतर सरकारच्या आवाक्या बाहेरचे आहे किंवा शक्य नाही किंवा त्या सोडवण्याची सरकारची इच्छा नाही. कारण काहीही असो, मुंबईकरांच्या माथी असुरक्षीतता आणि गैरसोयीचे जिणे आहे हे नक्की. या समस्येवर दुसराही एक तोडगा निघू शकतो. तो असा. मुंबईचे तीन ढोबळ भाग आहेत एक राजकीय, दुसरा व्यापारी-औद्योगिक आणि तिसरा आर्थिक. मुंबईतेला सिनेमा उद्योग आणि जाहिरात-प्रकाशन क्षेत्र वगैरेंचा समावेश आपण या तिसऱ्या भागात करू. यातील राजकीय मुंबई तथा व्यापारी-औद्योगिक मुंबईमध्ये सगळ्या देशातून सामान्य जनता नियमितपणे येत असते. कोणाला सरकारी कार्यालयात काही काम असते तर कोणाला खरेदी-विक्री करायची असते.

**व्यापारी-औद्योगिक मुंबई**

मुंबईमधला बाजार, त्याला माल पुरविणारे छोटे मोठे कारखाने तथा गोदामे मुंबईच्या बाहेर काढून विक्रमगढ-वाडा-भिवंडी-वसई-विरार या दरम्यान स्थलांतरीत करण्यात यावा. मुंबईमधले सगळेच व्यापारी आपली जागा बदलायला सहजा सहजी तयार होणार नाहीत; पण आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविल्यास बरेच बाजार मुंबईच्या बाहेर जाऊ शकतात. असे व्यापारी तथा बाजार कोणते याचा अभ्यास करून ठाणे जिल्ह्यात सोयीच्या जागी नवी बाजारपेठ तयार करण्यात यावी. तेथे जाण्यासाठी रेल्वे-रस्ता इत्यादींची चांगली व्यवस्था करण्यात यावी. त्यामुळे केवळ खरेदीसाठी मुंबईत येणारे लोंढे मुंबईच्या बाहेरच रोकता येतील त्याच बरोबर या बाजारपेठांसाठी ज्या मालाची वाहतूक मुंबईकडे करावी लागायची ती मुंबईच्या बाहेरच थांबली तर मुंबईवरचा ताण अजून कमीच होईल. तसेच गुजरातकडून येणाऱ्या पश्चिम रेल्वे तथा दक्षिण मध्य रेल्वे/मध्य रेल्वे मार्गांवरून या बाजारात जाण्यासाठी मेट्रोसारखी प्रगत व्यवस्था करण्यात यावी. जर मुंबईमधील कारखाने, दुकाने, बाजारपेठा तसेच यांना माल पुरविणारे अनेक लघु तथा कुटीर उद्योग जर मुंबईच्या बाहेर गेले तर मुंबईत येणारे लोंढे आपसूकच कमी होतील. 'आमची मुंबई' म्हणून लढणाऱ्या सेनांच्या सेनापतींना जी मुंबई बाकी राहील तिचे भले करण्याचे काम मिळेल.

**सरकारी-राजकीय मुंबई**

मुंबईचा दुसरा हिस्सा सरकारी आहे. मुंबईमध्ये सचिवालय, उच्च न्यायालय तथा अनेक सरकारी कार्यालये आहेत. आपल्या कामांसाठी अनेक जणांना मुंबईत जावे लागते. जर राजधानी मुंबईमधून हलवून मनमाड-अहमदनगर-बीड-परभणी-बुलडाणा-औरंगाबाद-मनमाड यांमधील सुयोग्य जागेत हलवण्यात यावी. मनमाड हे गाव नव्या राजधानीसाठी सर्वांत योग्य आहे कारण राज्याच्या प्रत्येक कोपऱ्यातून येथे रेल्वेने येता येते. तसेच जर रेल्वेची सोय करता आली तर अहमदनगर अथवा बीडचाही विचार करता येऊ शकतो.

ही नवी राजधानी अत्यंत प्रगत तंत्रज्ञान वापरून उभारण्यात यावी. गुजरातमधील



ॲड. प्रकाशसिंह पाटील

संसदेवरील हल्ल्यातील मुख्य आरोपी अफजल गुरुला ट्रायल कोर्टाने फाशीची शिक्षा दिली. दिल्लीचे हायकोर्ट आणि भारताच्या सुप्रीम कोर्टाने फाशीची शिक्षा कायम केली; परंतु एखाद्या आरोपीला सर्वोच्च न्यायालयाने फाशीची शिक्षा कायम केल्यानंतर राष्ट्रपतींकडे दयेचा अर्ज करण्याची तरतूद आहे. राष्ट्रपती त्या फाशीची शिक्षा माफ करू शकतात किंवा फाशीची शिक्षा कमी करून त्याऐवजी जन्मठेपेची शिक्षा देऊ शकतात. राष्ट्रपतींकडे दयेचा अर्जावर त्यांना शिक्षा माफ किंवा कमी करण्याचे अधिकार आहेत; परंतु त्यावर निकाल किती कालावधीत लावला पाहिजे याबाबतीत तरतूद नाही, म्हणून राजकीय स्वार्थापोटी व मतपेटीकडे डोळा ठेवून हेतूपुरस्सररीत्या आजपर्यंत राष्ट्रपतींनी या प्रकरणावर निर्णय घेतला नाही, परिणामी अफजल गुरू जिवंत आहे.

२६/११ हल्ल्यातील अजमल कसाबला मुंबईच्या न्यायालयाने फाशीची शिक्षा दिली. आता त्याचा खटला मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे, त्याचा निकाल केव्हा लागेल हे सांगणे कठीण आहे. मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल लागल्यानंतर कसाबलाही सुप्रीम कोर्टात जाता येईल आणि सुप्रीम कोर्टानेही जर मुंबई उच्च न्यायालयाच्या शिक्षेवर शिक्कामोर्तब केले तर त्यालासुद्धा अफजल गुरुसारखा दयेचा अर्ज करता येईल आणि त्याचाही अर्ज अफजल गुरुसारखा कित्येक वर्षे प्रलंबित ठेवून त्याला जिवंत ठेवता येईल.

सद्य परिस्थितीत संसदेवर हल्ला करणारा अफजल गुरु आणि मुंबईमध्ये आतंकवादी हल्ला करणारा कसाब हे देशाच्या पंतप्रधानांपेक्षाही सुरक्षीत आहेत. म्हणून आतंकवाद्यांचे धैर्य वाढले आहे. नुकत्याच झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेसारखे धाडसी पाऊल उचलल्याशिवाय आतंकवाद संपुष्टात येणे कठीण आहे हेच सिद्ध होते.

गांधीनगर जसे एक आदर्श रचनेचे शहर आहे त्याहीपेक्षा जास्त चांगले आधुनिक शहर म्हणून या नव्या राजधानीची ओळख व्हावी आणि अर्थातच तिच्या सुरक्षेची व्यवस्था उत्तम करता येईल.

अशा प्रकारे मुंबईचे तीन हिस्से केले तर या तीनही हिश्शांची स्वतंत्र सुरक्षा व्यवस्था करता येऊ शकते आणि अतिरेक्यांनाही मग मुंबईवर हल्ला करण्यात फारसा रस उरणार नाही कारण सध्याच्या मुंबईवर हल्ला केल्यास जी वित्त-मनुष्य हानी होते सोबतच असुरक्षीततेची भावना निर्माण होते, हा परिणाम साधणे या त्रिभाजनानंतर त्यांना शक्य होणार नाही.

हे करायला सरकारला पैसा लागेल. खूप पैसा लागेल. तो उभा करण्यासाठी सोपा उपाय आहे. मुंबईमधल्या ज्या सरकारी जमीनी आहेत त्यांचा लिलाव करून त्या विकून अथवा भाड्याने देऊन मोठ्या प्रमाणावर निधी उभा करता येऊ शकतो. मुंबईमधील जमिनींचे भाव पाहता ही योजना यशस्वी होईल यात शंका नाही. सरकारच्या ताब्यात अनेक इमारती आहेत ज्यासाठी कित्येक उद्योगपती मोठ्या प्रमाणावर पैसे देऊ शकतात. कदाचित राजभवनासारख्या एखाद्या इमारतीच्या विक्रीतून एखादे गाव वसवणे शक्य होईल!

जेव्हा सरकार आपल्या राजधानीचे रक्षण करू शकत नाही, जनतेला सुविधा पुरवू शकत नाही, वाहतूक व्यवस्था सुधारू शकत नाही तेव्हा केवळ भावनांच्या आहारी न जाता, कोणतेही राजकीय भांडवल न करता राजधानी मुंबईच्या बाहेर सुरक्षीत असे नवे शहर वसवून तिथे हलवावी यातच शहाणपण आहे. जर ते होत नसेल तर सरकार इथे चुकत आहे यात शंका नाही.

**इतर महत्त्वाच्या बाबी**

संयुक्त राष्ट्र संघाने सुचविल्याप्रमाणे दर एक लाख लोकसंख्येमागे २२२ पोलिस हवेत. तेही शांत परिस्थितीमध्ये. आपल्याकडे ते १२५ आहेत आणि जे आहेत त्यांची कार्यक्षमता काय वर्णावी! ते बिचारे हप्ते गोळा करण्यात, भरपूर वरकमाई देणारी बदली पदरात पाडून घेण्यात आणि उरलेल्या वेळी राजकारण्यांच्या संरक्षणात घालण्यात मग्न आहेत. त्यांच्याकडून कायदा-सुव्यवस्था कशी राखली जाऊ शकते? राजकारणी-अधिकारी यांची अभद्र युती खूप बलवान झाल्यामुळे मायावतीच्या राज्यात गुंडांनी, जे तिच्याच पक्षाचे सदस्य आहेत, काय उच्छाद मांडला आहे याच्या बातम्या आपण रोज वाचत आहोतच. त्यामुळे पोलिस दलाच्या कार्यपद्धतीत अमुलाग्र बदल होणे आवश्यक आहे. सध्याची भ्रष्टाचाराने लडबडलेली, राजकारण्यांच्या बोटावर नाचणारी यंत्रणा बदलून स्वच्छ कारभार देऊ शकणारी कार्यक्षम तथा आधुनिक पोलिस यंत्रणेची स्थापना होणे गरजेचे आहे. जर हे होत नसेल तर सरकार इथेही चुकत आहे.

**आपातकालीन सेवा**

हल्ल्यात जखमी झालेल्या नागरिकांना दवाखान्यात नेताना मुंबईत गर्दीचा अडथळा होतो. तसेच रुग्णालयात एकदम रुग्ण आल्यावर त्यांची व्यवस्था लावणे कठीण जाते हे लक्षात घेऊन अशा प्रसंगी काही खाजगी रुग्णालयांची मदत घेता आली तर ते पाहावे. त्यांचा खर्च विमा कंपनीकडून झाला तर अशी रुग्णालये रुग्णांवर उपचार करण्यास नकार देणार नाहीत. तसेच अशा रुग्णालयांना पोलिसांकडून काही त्रास होणार नाही हे महत्त्वाचे आहे. तसेच अशा वेळी मनुष्यबळाची कमतरता भासते. विविध राजकीय नेत्यांनी उगाच पेपरमध्ये बातमी यावी म्हणून रुग्णालयात जाण्याचे टाळून आपल्या कार्यकर्त्यांना रुग्णालयात मदत करण्यास पाठवावे. माध्यमांनीही त्यांची राजकीय गरज लक्षात घेऊन असे काम करणाऱ्या पुढाऱ्यांना 'योग्य ती' प्रसिद्धी द्यावी.

या लेखात काही ठळक बाबींचा थोडक्यात आढावा घेतला आहे. या अनुषंगाने तज्ज्ञांनी जास्त विचार करून परिपूर्ण योजना तयार करावी. त्याचबरोबर राजकारण्यांनी आपल्या क्षुल्लक राजकीय स्वार्थापोटी मुंबईचा बळी न देता मुंबईसाठी योग्य ते करावे. ते होत असताना कोणाची राजकीय शक्ती क्षीण होणार असली तरीही. नसता मुंबईच कायमची क्षीण होण्याचा धोका वाढत चाललाय.

**श्रीकृष्ण उमरीकर**
नानल पेठ, परभणी-४३१४०१.
मो. ९४२२६४६२८३

■■

# आतंकवाद्यांचे भारतावर उपकार

**मुंबईत ५९ तास धुमाकूळ घालणाऱ्या आतंकवाद्यांनी सरकारी सुरक्षा व्यवस्थेबद्दलच एक मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे. मुंबईतील ५९ तासांचा इतिहास हा केवळ सरकारी व्यवस्थेच्या अजागळपणामुळे होऊ शकला हे आपण वर पाहिले आहे. सर्वसमावेशकतेचा आव आणणाऱ्या आणि निधार्मिकतेच्या मुखवट्याखाली अल्पसंख्याकवादाला खतपाणी घालणाऱ्या शासनाला कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणे शक्य होणार नाही हे मुंबईला ५९ तास वेठीस धरलेल्या फक्त १० आतंकवाद्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. दक्षिण मुंबईतील काही मोजक्या ठिकाणात थरारक नाट्य घडले. ते संपवण्यात राष्ट्रीय सुरक्षा दल, पोलिस आणि अग्निशामकदल यांना यशही आले. त्यामुळे, आता हा प्रश्न निकाली निघाला असे कोणी समजेल तर त्याची झोप थोड्याच दिवसात खाडकन् उडेल.**

तीन दिवस ५९ तास. फक्त १० आतंकवादी मुंबईत घुसले आणि सगळ्या भारताच्या ताकदीला त्यांनी जबरदस्त आव्हान दिले. या धक्क्यातून देश अजून सावरलेला नाही. आजच (३० नोव्हेंबर २००८) पंतप्रधानांनी सर्व राजकीय पक्षांची एक बैठक दिल्लीत बोलावली आहे. आज हा लेख लिहिताना मी स्वतः पुष्कळसा सावरलो आहे. २६ नोव्हेंबरपासून आतंकवाद्यांची पुढची पायरी काय असले, त्याचा धक्का आपल्याला पोहोचेल काय या भीतीने सारे भारतीय नागरिक वागले आणि जगले; मीही त्यातलाच एक.

मोठे अरिष्ट टळले असे दिसते. १० पैकी ९ आतंकवादी ठार झाले. जवळपास २०० नागरिक आणि सुरक्षाकर्मी शहीद झाले. ३००वर लोक जखमी झाले. एकट्या ताजमहाल हॉटेलचेच नुकसान ५०० कोटी रुपयांच्या वर गेले आहे असे म्हटले जाते.

या सगळ्या धक्क्यातून काहीसा सावरून मी, गेल्या तीन दिवसांत काय घडले त्याचा विचार करतो आहे. ८-१० नोव्हेंबर च्या औरंगाबाद अधिवेशनाचे एक महत्त्वाचे सूत्र होते - प्रत्येक संकट एक संधी समोर आणते.

गेल्या तीन दिवसांत मूठभर आतंकवाद्यांनी साऱ्या भारतीय व्यवस्था आणि समाज उघडा-नागडा करून दाखवला आहे. योग्य वेळी या आतंकवाद्यांचे आभार मानण्याची वेळ येईल - अर्थात, या सगळ्या घटनेतून योग्य निष्कर्ष काढले आणि आवश्यक त्या सुधारणा केल्या तरच.

भारतीय शासन आणि प्रजाजन या दोघांमध्येही, जे काही झाले त्याच्या प्रकाशात कठोर आत्मपरीक्षण करण्याची शक्ती नाही आणि आवश्यक ती पावले उचलण्याची इच्छाही नाही. साऱ्या समाजाला पक्षघाताचा झटका आला आहे. आणि त्याबरोबर विवेकक्रियाही सुस्तावली आहे.



शरद जोशी

हल्ला मुंबईवर झाला. सगळ्या देशावर भयानक घातक परिणाम घडवून आणण्याची आतंकवाद्यांची इच्छा असती तर त्यांनी समुद्रमार्गाने तुर्भे आणि तारापूर येथे हल्ला केला असता, छत्रपती शिवाजी टर्मिनस आणि मुंबई सेंट्रल टर्मिनस ताब्यात ठेवले असते. तुर्भे तारापूर उद्ध्वस्त करून आणि दोन रेल्वे स्थानकांचा ताबा मिळवून त्यांना देशाच्या आर्थिक आणि राजकीय ताकदीवर अधिक गंभीर परिणाम घडवून आणता आले असते. त्यांच्या हल्ल्यांचा मुख्य रोख दोन पंचतारांकित हॉटेलांवर होता. या हॉटेलात काही भारतीय अतिविशिष्ट व्यक्ती उतरतात; याही वेळी एनडीडीबीच्या अमृता पटेल आणि खासदार गायकवाड तेथे उतरलेले होते; पण नेहमीच्या तुलनेत परदेशी प्रवाशांचा हंगाम असूनही त्यांची संख्या त्या मानाने कमी होती. हल्लेखोरांना याचा अंदाज नव्हता असे कसे म्हणावे?

उपलब्ध माहितीनुसार, हल्लेखोरांचे साथीदार बराच काळ आधी या हॉटेलात पाहुणे म्हणून उतरले होते, काहींनी तर हॉटेलांच्या नोकरवर्गात दाखल होऊन तेथील खडान् खडा माहिती हस्तगत केली होती.

हल्लेखोर सर्व सामुग्री पाठीवरच्या आणि हातातल्या पिशव्यांत भरून घेऊन आले होते. तेवढ्या सामुग्रीवर त्यांना ६० तास झुंज देता आली नसती. त्या अर्थी २६ नोव्हेंबरच्या आधीपासूनच नरिमन हाऊस, ताज महाल आणि ओबेरॉय हॉटेल येथे त्यांनी दारूगोळ्याचा साठा जमा करून ठेवला असावा हे उघड आहे. कुलाब्यातील लिओपोल्ड हॉटेलमध्ये किंवा त्याच्या आसपास त्यांचे दारूगोळ्याचे भांडार असावे, अन्यथा सगळी ठिकाणे सोडून या हॉटेलवरच हल्ला करण्याचे आतंकवाद्यांना काही कारण होते असे दिसत नाही.

आतंकवादी भारताविरुद्ध काही मोठे



कारस्थान रचीत आहेत, त्यांचा रोख मुंबईवर दिसतो, एवढेच नव्हे तर हल्ला ताजमहाल आणि ओबेरॉय या हॉटेलांवर होणार आहे अशी माहिती सर्व संबंधित अधिकारी आणि सुरक्षा दले यांना मिळाली होती हे आता उघड झाले आहे. ते समुद्रमार्गाने येणार आहेत याचीही खबर होती. समुद्रमार्गाच्या प्रवासात बांगलादेशी खलाश्यांची मोठी कामगिरी राहणार आहे. या समाजाची दाट वस्ती मुंबईच्या साऱ्या समुद्रकिनाऱ्याने झाली आहे, हे सगळे माहीत असताना मुंबई इतकी बेसावध कशी पकडली गेली? संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव यांनी औरंगजेबाच्या लष्करी तळावर हल्ला करून औरंगजेबाच्या तंबूचे सोनेरी कळस काढून आणले एवढा एकच समांतर प्रसंग इतिहासात दिसून येतो.

छत्रपती शिवाजी टर्मिनस, कामा हॉस्पिटल येथे हल्ला सुरू झाला त्यानंतर चार तासापर्यंत मुंबईतील सुरक्षा दले आणि अलिबाग मुक्कामी असलेले संरक्षण दल यांना कामगिरीसाठी जाण्याचे आदेश मिळाले नाहीत. आदेश देणारे अधिकारी त्यांच्या संध्याकाळच्या 'कार्यक्रमांत' व्यस्त असावेत किंवा पूर्वनियोजित कारस्थानाप्रमाणे त्यांनीच सुरक्षा दलांना थोपवून ठेवून हल्लेखोरांना बस्तान बसवायला मुभा दिली असावी. असा संशय कोणाच्या मनी आला तर त्यात वावगे काय असेल?

राज्यशास्त्राचा सिद्धांत सांगतो की, शासन हा नागरिक आणि सरकार यातील एक करार असतो. या कराराने नागरिक आपला हत्यारे बाळगण्याचा हक्क सोडून देतो आणि त्या बदल्यात शासन त्यांच्या जीविताच्या व मालमत्तेच्या सुरक्षेची जबाबदारी घेते. राज्यशास्त्रातील तितकाच महत्त्वाचा आणखी एक सिद्धांत आहे. शासनकर्त्यांचा अधिकार त्यांना सत्ता कोणत्या मार्गाने प्राप्त होते त्यावर आणि त्या प्रमाणात ठरतो. हत्याराच्या आधारे नागरी किंवा लष्करी क्रांती घडवून आणून सत्तेवर आलेल्या शासनाच्या अधिकारास काहीच धरबंध नसतो. माओ-त्से-तुंग ने म्हटल्याप्रमाणेच त्यांची सत्ता बंदुकीच्या नळीतून आलेली असते.

मग, मतपेट्यांतून आलेल्या सरकारांचे अधिकार कोणते, कर्तव्ये कोणती आणि त्यांच्या मर्यादा काय? प्रत्येक मतदाराला समान मतांचा अधिकार दिला तर निवडून येणाऱ्या सरकारचा अधिकार काय असेल? इंग्रजांच्या काळात मतदानाचा हक्क काही किमान मिळकत, मालमत्ता किंवा शिक्षण असलेल्या मतदारांपुरताच मर्यादित होता. मतांचा अधिकार हा आयकराच्या किंवा संपत्तीकराच्या प्रमाणात ठरवला तर निवडणुकांच्या निकालांचा अर्थ वेगळाच होईल. वयात आलेल्या प्रत्येक नागरिकास सारखेच म्हणजे एकच मत अशी निवडणुकीची पद्धत असेल तर निवडून येणाऱ्या उमेदवाराचा आणि शासनाचा अधिकार ज्या क्षेत्रात सर्व नागरिक समान आहेत तेवढ्यापुरताच मर्यादित राहील. अशी क्षेत्रे कोणती? सर्वांनाच आपला जीव प्यारा असतो, त्याचे रक्षण व्हावे, आपल्या मालमत्तेचे संरक्षण व्हावे व ते शासनाने करावे अशी सर्वांचीच धारणा असते. शेजाऱ्याने किंवा दुसऱ्या नागरिकाने काही खोडी काढली, खोटेपणा केला तर त्याचा न्यायनिवाडाही सरकारकडून झाला पाहिजे ही प्रत्येकाची इच्छा असते. हा न्यायनिवाडा विना दिरंगाईने व्हावा आणि निःपक्षपातीपणाने व्हावा असे प्रत्येकाला वाटते. परदेशी शत्रूचा देशावर हल्ला झाला तर युद्धकाळातही जानमालाचे संरक्षण व्हावे अशी सगळ्या नागरिकांची सारखीच अपेक्षा असते. थोडक्यात, कायदा व सुव्यवस्था, न्याय आणि सुरक्षा एवढ्याच क्षेत्रात सर्व नागरिक समान असतात. 'दरडोई एकमत' पद्धतीच्या निवडणुकीत निवडून आलेल्या शासनाने आपला कारभार एवढ्याच क्षेत्रांपुरता मर्यादित ठेवला पाहिजे, आपल्याला मिळालेला जनादेश तेवढ्यापुरताच मर्यादित आहे हे स्वीकारले पाहिजे.

याउलट, 'दरडोई एकमत' पद्धतीने निवडून आलेल्या शासनाने शिक्षणाची व्यवस्था काय असावी, विद्यापीठे कोठे असावीत, शिक्षणक्रम काय असावेत, प्राध्यापकांचे वेतन काय असावे अशा विषयांत ढवळाढवळ सुरू केली तर अनाचार माजणारच.

अर्थकारणात तसेच शिक्षणक्षेत्रात मागास असणाऱ्यांना समान पातळीवर आणण्याच्या हेतूने का होईना, आरक्षणासारखे अधिकार घेण्याचा जनादेश त्यांना मिळालेला नसतो. असा जनादेश आहे असे दाखविणारे राजकारणी फक्त उदरंभरणाचेच काम करतात.

'गरिबी हटवा'च्या अनेक घोषणा झाल्या, शेकडो कार्यक्रम झाले; पण गरिबांना खरीखुरी मदत पोहोचली ती गुरुद्धारातल्या लंगरसारख्या संस्थांची, सरकारची नाही;

दुःखितांना खरीखुरी मदत पोहोचली ती रामकृष्ण मिशन किंवा मदर तेरेसासारख्या, खऱ्याखुऱ्या करुणेने प्रेरणा मिळालेल्या संस्थांची, सरकारची नाही.

'कायदा आणि सुव्यवस्था, न्याय एवढेच सरकारचे काम असावे; अर्थकारण, शिक्षण, समाजसुधारणा, करुणा ही शासनाची कामे नव्हेत.' हा स्वतंत्र भारत पक्षाचा मूलभूत सिद्धांत आहे. सरकार असावे, मजबूत असावे, प्रसंगी आवश्यक तर धाक वाटण्याइतके कठोरही असावे पण ते त्याच्या कार्यक्षेत्रांत. इतर सर्व क्षेत्रांतून शासन हटावे हा स्वभापचा कार्यक्रम आहे. शासनाने त्याच्या निहित वैध क्षेत्रात कामगिरी करून दाखवली, नागरिकांना सुरक्षितपणे जगता येऊ लागले, घराबाहेर पडलेले माणूस, संध्याकाळी घरी परत येण्याबद्दल धाकधूक वाटेनाशी झाली, शेजारी राष्ट्रांना आपल्या देशाकडे वाकडी नजर करून पाहण्याची हिंमत होईनाशी झाली म्हणजे पुरे.

राज्यशास्त्रातील हा नियम न पाळल्यामुळे आणि प्रत्येक मतदारसंघात त्यातल्या त्यात जास्त मते मिळालेला उमेदवार विजयी ठरविण्याच्या पद्धतीमुळे मोठी दुरवस्था माजली आहे.

'दर डोई एकमत' या पद्धतीच्या निवडणुकीत निवडून येण्यासाठी निम्म्या मतदारांचाही पाठिंबा असण्याची आवश्यकता नाही. दोनचार अल्पसंख्याक जमातींची एकगठ्ठा मते मिळविण्याची व्यवस्था करता आली, त्या जमातींच्या वस्तीतील दादांना विकत घेण्याइतका पैसा भ्रष्टाचार, काळाबाजार, अगदी खूनदरोडेसुद्धा अशा मार्गाने मिळवला की वर्षानुवर्षे पुढारी निवडून येतात आणि सरकारचे मूळ काम सोडून बाकी सगळ्या कामात लुडबुड करतात. अलीकडे कायदा आणि सुव्यवस्था यंत्रणाही भक्कम भ्रष्टाचारी बनली आहे. खात्यांतील नेमणुकांपासून ते गुन्हेगारांच्या सोडवणुकीपर्यंत काळा पैसा कमावता येतो; पण, बांधकामाची कंत्राटे, कारखानदारीचे व आयात-निर्यातीचे परवाने इत्यादींत होणाऱ्या मिळकतीच्या तुलनेने हे उत्पन्न किरकोळ असते.

इंग्रजांनी आपले राज्य स्थापन केल्याबरोबर पहिले काम केले ते ठग आणि पेंढारी यांच्या बंदोबस्ताचे. काठीच्या टोकाला सोने बांधून बिनधास्त काशीयात्रेला जावे अशी सुव्यवस्था झाल्यानंतर इंग्रजांनी हळूहळू शाळा, इस्पितळे, रस्ते, टपाल, रेल्वे इत्यादी व्यवस्था आणावयास सुरुवात केली.

याउलट, स्वातंत्र्यानंतर समाजवादाच्या झेंड्याखाली शासनाला घाई झाली ती उद्योगधंदे वाढवण्याची. उद्योगधंदे, व्यापार यांची लायसन्स-परमिट व्यवस्था पुढाऱ्यांना खूपच सोयीस्कर झाली. त्यातून काळाबाजारवाले, तस्कर, घरे-जमिनी खाली करून देणारे गुंडभाई यांची सर्वदूर उपज झाली आणि सर्व सुव्यवस्था ढासळली. स्वतंत्र भारताच्या शासनाने असा उलटा कार्यक्रम आखल्यामुळे आर्थिक प्रगतीही झाली नाही आणि सगळीकडे अंदाधुंदी मात्र माजली.

अशा उलट्या सरकारी व्यवस्थेचा सैद्धांतिक शेवट १९९१ साली सध्याचे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या पुढाकारानेच झाला. अकार्यक्षम आणि तोट्यात चालणाऱ्या सरकारी संस्था आणि उपक्रम यांचे खासगीकरण किंवा निर्गुंतवणूक होऊ लागली; पण, १९९१ सालापासून आतापर्यंत अगदी आत्यंतिक उदारमतवादीसुद्धा 'शासन कायदा आणि सुव्यवस्थेच्या क्षेत्रातही अपयशी आणि अकार्यक्षम ठरले आहे, या क्षेत्रातही सर्वंकष खासगीकरण आणावे' असे मत मांडीत नाही.

मुंबईत ५९ तास धुमाकूळ घालणाऱ्या आतंकवाद्यांनी सरकारी सुरक्षा व्यवस्थेबद्दलच एक मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे. मुंबईतील ५९ तासांचा इतिहास हा केवळ सरकारी व्यवस्थेच्या अजागळपणामुळे होऊ शकला हे आपण वर पाहिले आहे. सर्वसमावेशकतेचा आव आणणाऱ्या आणि निधार्मिकतेच्या मुखवट्याखाली अल्पसंख्याकवादाला खतपाणी घालणाऱ्या शासनाला कायदा आणि सुव्यवस्था सांभाळणे शक्य होणार नाही हे मुंबईला ५९ तास वेठीस धरलेल्या फक्त १० आतंकवाद्यांनी सिद्ध करून दाखवले आहे. दक्षिण मुंबईतील काही मोजक्या ठिकाणात थरारक नाट्य घडले. ते संपवण्यात राष्ट्रीय सुरक्षा दल, पोलिस आणि अग्निशामकदल यांना यशही आले. त्यामुळे, आता हा प्रश्न निकाली निघाला असे कोणी समजेल तर त्याची झोप थोड्याच दिवसात खाडकन् उडेल.

आतंकवाद्यांचे कृत्य मोठे बहादुरीचे काम आहे असे मनोमन मानणारा समाज मुंबईतच नव्हे तर महाराष्ट्रभर आणि देशभरही सर्वत्र फैलावला आहे. भारत-पाकिस्तान क्रिकेट सामन्यांच्या वेळी भारताची बाजू पडती झाली की हर्षोल्लासाच्या घोषणा देणारी प्रवृत्ती मुंबईत वस्त्यावस्त्यांत आहे. दुर्दैवाची गोष्ट ही की, ५९ तास थरारनाट्याचे चित्रण करणाऱ्या टी.व्ही. चॅनल्सना या वस्त्यांत जाऊन कुशलतेने खऱ्याखुऱ्या प्रतिक्रिया मिळविण्याची बुद्धी झाली नाही. सबंध ताज महाल हॉटेलची इमारत जमीनदोस्त होईल इतक्या शक्तीचे बॉंब, दारूगोळा आणि तीन दिवस थकवा व झोप यांचा त्रास होऊ नये अशा प्रकारची खाद्यसामुग्री ही काही हल्लेखोरांनी कराचीहून आणली नव्हती.

शरीरावर कोठे फोड दिसला की त्याची जुजबी मलमपट्टी करणे अशा प्रकारचे सुरक्षा धोरण स्वातंत्र्यानंतर सर्व सरकारांनी राबवले आहे. या बुळ्या धोरणाचा अंत झाल्याची द्वाहीही गेल्या तीन दिवसांनी फिरवली आहे. 'आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी' असल्या धोरणाने आतंकवादाचा सामना करता येत नाही.

कालच्या (२९ नोव्हेंबर) वर्तमानपत्रांतून हा बदल झाल्याचे दाखवणाऱ्या काही घडामोडी दिसल्या. भारतीय क्रिकेट संघाचा पाकिस्तानचा दौरा रद्द करण्यात आला आहे. एका जबाबदार नेत्याने 'पाकिस्तानने आतंकवाद्यांचे प्रशिक्षण तळ उद्ध्वस्त करण्याचे आश्वासन न पाळल्यामुळे भारताला ती कामगिरी करावी लागेल' असे स्पष्ट म्हटले आहे. गेली पाच वर्षे भारत-पाकिस्तानमधील सुरू केलेल्या दळणवळण आणि संचारव्यवस्था बंद करण्याचे प्रस्तावही

विचाराधीन आहेत. रेल्वे, विमानसेवा आणि संचार सवलती यांनी आतंकवाद्यांचेच काम सुलभ झाल्याचे दिसून आले.

साऱ्या मुंबईवर खरेखुरे राज्य चालते ते दाऊद इब्राहिमचे. बॉलिवूड एवढेच नव्हे तर शेअरबाजार त्याच्या इशाऱ्यावर चालतात हे सर्वांना माहीत आहे. तो जगात कोठे रहात असेल ते राहो बापडा, पण त्याची शक्तिस्थळे मुंबईभरच्या विशिष्ट वस्त्यांत दूरवर पोसलेली आहेत हे सर्व पोलिसखाते जाणते.

मुंबईवर हल्ला झाला तसा इस्रायलमधील एखाद्या शहरावर झाला असता त्या चिमुकल्या देशाने काय सडेतोड उत्तर गेली पन्नास वर्षे दिले आहे ते उदाहरण गिरवणे भारताला शक्य नाही हे मी समजू शकतो; पण, देशातल्या देशात, मुंबईतल्या मुंबईत दाऊद इब्राहिमच्या शक्तिस्थळांवर हल्ला करणे फार दुरापास्त नाही.

सर्वसमावेशकतेची आणि सर्वधर्मसमभावाची नौटंकी दिल्ली शासनाला पक्षाघात झाल्याप्रमाणे लुळी पाडत आहे. सुरक्षा आणि सुव्यवस्था यांवर सरकारी मक्तेदारी नसती तर केवळ काही खुळचट कल्पनांपोटी खासगी सुरक्षादलांना दाऊद इब्राहिमच्या शक्तिस्थळांना नेस्तनाबूत करणे जड वाटले नसते.

केंद्र शासनाची आता रंगसफेदी चालू झाली आहे. शिवराज पाटील यांचा गृहमंत्रीपदाचा राजीनामा स्वीकारण्यात आला आहे. त्यांच्या जागी, श्रीलंकेतील आतंकवादी तामीळ वाघांबद्दल उघड सहानुभूती बाळगणाऱ्या विद्यमान वित्तमंत्र्यांची नेमणूक झाली आहे. त्याहूनही अद्भुत गोष्ट म्हणजे या सगळ्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी पाकिस्तानची मदत मागितली आणि त्यासाठी पाकिस्तानी फौजेचे तसेच आयएसआयचे प्रमुख यांना हिंदुस्थानात पाठविण्याची विनंती पाकिस्तानच्या पंतप्रधानांना केली. थोडक्यात, आज (३० नोव्हेंबर) संध्याकाळच्या सर्वपक्षीय बैठकीत कितीही घोषणाबाजी झाली तरी फरक काहीच पडणार नाही. कायदा आणि सुव्यवस्था सरकार आपल्या हातातून सोडणार नाही. सत्ता हातात टिकवण्यासाठी वेगवेगळ्या समाजांचा अनुनय चालूच राहणार. एका मागोमाग एक एका विशिष्ट प्रकृतीचे लोकच घातपात घडवतात हे स्पष्ट झाले तरी त्यांना दुखवण्याची राजकीय क्षमता कोणातही राहणार नाही. थोडक्यात, आणखी महिन्याभरात सर्वांना मुंबईच्या थरारनाट्याचा विसर पडेल, मग पुन्हा एकदा असेच काही भयानक घडेल. शिवराज पाटलांच्या जागी पी. चिदंबरम काहीतरी लुळेपांगळे समर्थन करतील. हे असेच चक्र चालू राहील. जोपर्यंत देशातील प्रत्येक नागरिक खऱ्या अर्थाने स्वतंत्र होत नाही तोपर्यंत राष्ट्र तेजस्वी बनणार नाही. संपुआचे सरकार २००९ साली पुन्हा एकदा निवडून आले तर मी पूर्वी भाकीत केल्याप्रमाणे, सारा वायव्य भारत पाकिस्तानात जाईल आणि ईशान्य भारताला चीन गिळून टाकील. भारताविषयी काही प्रेम असलेले ज्यू समाजाप्रमाणे निर्वासित होऊन देशोधडीला लागतील.

हे टाळता येईल. शिवराज पाटील तसे सज्जन गृहस्थ आहेत. त्यांच्याशी बोलताना आपण नक्षलवाद्यांचा सामना करण्यात आणि मुसलमानी आतंकवादाला तोंड देण्यात अपुरे पडत आहोत याची खंत त्यांच्या अंतर्मनात वाटत असे अशी मला अनेकदा जाणीव झाली आहे. पाटील पक्षनिष्ठेने भारले आहेत. २००४ सालच्या निवडणुकीत रूपाताई निलंगेकरांसारख्या साध्या गृहिणीने त्यांचा पराभव करावा ही गोष्ट त्यांना खूप लागली होती. अशाही परिस्थितीत सोनिया

**अलीकडे मालेगाव प्रकरणात अटक झालेल्या साध्वी प्रज्ञासिंग, कर्नल पुरोहित इत्यादींची नार्को टेस्ट घेण्यात आली. शिवराज पाटील यांचीही नार्को टेस्ट घेतली तर कोणत्या मानसिकतेतून त्यांनी जाणूनबुजून नक्षलवाद्यांचा विस्तार वाढू दिला, धार्मिक आतंकवाद्यांचा कठोरपणे पाठपुरावा केला नाही आणि महाराष्ट्रातील अनेक नेत्यांचे दाऊद इब्राहिम याच्याशी खुल्लम् खुल्ला संबंध माहीत असतानाही त्या नेत्यांना अटक केली नाही हे साऱ्या जगापुढे येणे आवश्यक आहे. शिवराज पाटलांची नार्को टेस्ट केल्यास गेली पाच वर्षे दिल्लीतून चालवले जाणारे हे देशबुडवे कारस्थान उघडकीस येईल आणि कदाचित.... कदाचित, भारतीयांचे देशप्रेम जागृत होऊन लोकमान्य टिळकांच्या निर्वाणानंतर देशावर आलेले नेभळटपणाचे सावट दूर होईल.**

गांधींनी मेहेरबानी करून त्यांना राज्यसभेत घेतले, एवढेच नव्हे तर ज्या आसनावर सरदार वल्लभभाई पटेल, गोविंद वल्लभपंत अशा दिग्गजांचा स्पर्श झाला त्या जागेवर बसवले या विषयीच्या कृतज्ञतेपोटी ते सर्वसमावेशकता आणि भोंदू निर्धार्मिकता यांची नौटंकी इतकी मनापासून करतात की त्यांची स्वतःची या पोकळ तत्त्वज्ञानाबद्दल खात्री पटली आहे.

अलीकडे मालेगाव प्रकरणात अटक झालेल्या साध्वी प्रज्ञासिंग, कर्नल पुरोहित इत्यादींची नार्को टेस्ट घेण्यात आली. शिवराज पाटील यांचीही नार्को टेस्ट घेतली तर कोणत्या मानसिकतेतून त्यांनी जाणूनबुजून नक्षलवाद्यांचा विस्तार वाढू दिला, धार्मिक आतंकवाद्यांचा कठोरपणे पाठपुरावा केला नाही आणि महाराष्ट्रातील अनेक नेत्यांचे दाऊद इब्राहिम याच्याशी खुल्लम् खुल्ला संबंध माहीत असतानाही त्या नेत्यांना अटक केली नाही हे साऱ्या जगापुढे येणे आवश्यक आहे. शिवराज पाटलांची नार्को टेस्ट केल्यास गेली पाच वर्षे दिल्लीतून चालवले जाणारे हे देशबुडवे कारस्थान उघडकीस येईल आणि कदाचित....

कदाचित, भारतीयांचे देशप्रेम जागृत होऊन लोकमान्य टिळकांच्या निर्वाणानंतर देशावर आलेले नेभळटपणाचे सावट दूर होईल.

*(मा. शरद जोशी लिखित 'भारता'साठी या पुस्तकातून साभार...)*

**शरद जोशी**
'अंगारमळा', अंबेठाण, ता. खेड, जि. पुणे.
sharadjoshi.mah@gmail.com

■■

# न्यायालयीन सक्रीयता की लोकप्रतिनिधींची निष्क्रियता

**प्रत्येक चारआठ दिवसांनी न्यायालयाने सरकारला चपराक मारल्याचे उदाहरण दिसून येत आहे. याचा अर्थ लोकप्रतिनिधी निष्क्रिय होत आहेत आणि नाइलाजाने न्यायालयांना सक्रिय व्हावे लागत आहे. आपण आपल्या परिसरातील, मतदारसंघातील छोट्या-मोठ्या सर्वच, ग्रामपंचायत सदस्यांपासून तर आमदार-खासदार-मंत्री यांना कामाला लावणार आहात का? की न्यायपालिका आणि कार्यपालिका यातील सीमारेषा पुसट होण्याची वाट पाहणार आहोत!**

माझ्या शहरातील लोकप्रतिनिधी गणेशोत्सव, दहिहंडी, किंवा इतर सणांच्या वेळी मोठमोठे होर्डिंग्ज आणि बॅनर लावून लोकांना शुभेच्छा देतात. त्यांच्या वाढदिवसाचे होर्डिंग्जही वाढदिवसानंतर सहा महिने व येणाऱ्या दिवसाचे सहा महिने असे जवळजवळ वर्षभर लावलेली असतात. माझ्या परिसरात तुंबलेली गटारे आणि खराब रस्त्यांचा गंभीर प्रश्न तयार झालाय. ३०० मीटरचे अंतर पार करणेही मोठे दुरापास्त झाले आहे. परिसरातल्या लोकांनी यावर हा प्रश्न लोकप्रतिनिधींसमोर मांडण्यासाठी गणेशोत्सवाच्या कार्यक्रमात सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन त्याच्या बक्षिस वितरणाला वार्डाचे प्रतिनिधी सत्ताधारी पक्षाचे कार्यकर्ते आमदार यांना बोलावले. ते अगदी वेळेवर आणि उत्साहाने हजर झाले. लोकांनी गटारीचा आणि रस्त्याचा प्रश्न बक्षिस वितरणानंतर मांडला. आश्वासने मिळाली. काही दिवसांनी रस्त्याचे कामही झाले; पण गटार स्वच्छ करून त्यात साठलेल्या घाणीचे गुडघ्याएवढे ढीग अरुंद रस्त्यावर टाकले. त्यातले दोन-तीन ढीग उचलल्यानंतर बाकी सर्व मैला तसाच पडला असल्याने रस्त्याची अर्धी बाजू बंद झाली. लगेचच पाण्यासाठी दुसऱ्या बाजूने पाईपलाईन टाकण्यासाठी खोदकाम करून तेथे मातीचे ढिगारे करण्यात आले. रस्ताही उखडला. आता मधून कसेबसे छोटेसे वाहन जाईल, अशी जागा शिल्लक आहे. मातीचे आणि मैल्याचे ढिगारे आता पावसाने पुन्हा गटारीत जाऊन पुन्हा गटार बंद होईल. आश्वासन तर पूर्ण झाले, पैसेही खर्च झाले. काम संपले नाही! अशी अनेक उदाहरणे सर्रास बघायला मिळतात. परिसरातील लोकांनी आणखी एकदा गाऱ्हाणे मांडावे यासाठी जवळच्या राम मंदिर आणि हनुमान मंदिरात रामनवमीला आणि हनुमान जयंतीला खासदारांना बोलावले. त्यांच्या पक्षाची सत्ता महापालिकेत असल्याने ते काही करतील, घाणीकडे त्यांचेही लक्ष जाईल असे लोकांना वाटले, मात्र त्यांनी आपण या मंदिरात वीस वर्षांपासून कसे आरतीसाठी येतो, लोकही आपल्याला आदराने आणि प्रेमाने बोलावतात, इथले लोक किती धार्मिक आणि परंपराप्रिय आहेत, त्यांचे कौतुकच करायला हवे, असे पाच मिनीटांचे भाषण ठोकले अन् दुसऱ्या मंदिरात आरतीसाठी निघून गेले; आमचे गाऱ्हाणे मात्र तसेच राहिले.



ज्ञानेश्वर शेलार

२००२ मध्ये जेव्हा व्हिडिओकॉनने औरंगाबादच्या शेजारील पाच गावांची साडेसहा हजार एकर जमीन सेझसाठी घ्यायचे ठरविले. तेव्हा गावातील लोक सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांकडे, आमदाराकडे, खासदाराकडे जाऊन आले.

आमदारांनी अजिबात सेझ होऊ देणार नाही अशी शपथ मारुतीच्या मंदिरासमोर घेतली. ते शेजारच्याच गावात राहतात; परंतु त्यानंतर त्या गावात त्यांनी नंतरच्या इलेक्शनसाठीच पाय ठेवला. कुणीच काही करत नाही, असे लक्षात आल्यावर लोक धावाधाव करीत शेतकरी संघटनेकडे आले. शेतकरी संघटनेने आंदोलनाचा दणका देताच 'सेझ' रद्द झाले. विरोधी पक्षाचे एक माजी मंत्री शेंद्रा येथील जमीन अधिग्रहीत करण्यात येत आहे याचे गाऱ्हाणे घेऊन गेलेल्या शेतकऱ्यांना म्हणाले, ''आम्ही तर विरोधी पक्षात आहोत. निवडून आलो असतो तर, हे नक्कीच होऊ दिले नसते. आता हा सरकारी मामला आहे. त्यामुळे काही करणे शक्य नाही.'' औरंगाबादच्या परिसरात २८ खेड्यांच्या झालर क्षेत्राचा विकास आराखडा तयार करण्याचे काम सिडकोला देण्यात आले आहे. सिडकोने त्यात मोठ्या प्रमाणावर अनियमितता केली आहे. स्थानिक आमदारांना लोक या संदर्भात भेटायला गेल्यानंतर त्यांनी सिडको फक्त आराखडा तयार करणार आहे. अंमलबजावणी करणार नाही, त्यामुळे तुम्ही घाबरून जाऊ नका, असे सांगून वेळ मारून नेली. एका लग्नात त्यांची भेट झाल्यावर आम्ही त्यांना हा प्रश्न विचारला, तेव्हा त्यांनी चांगल्या वसाहती तयार व्हाव्यात कुणीही अतिक्रमण करू नये यासाठी आराखडा तयार करण्यात येत आहे. असे म्हणत असताना सिडकोनेच सावळा-गोंधळ करून ग्रीनचे येलो आणि येलोचे ग्रीन वसाहतींवर आरक्षण आणि मोकळ्या जागा मोकळ्याच असा आराखडा तयार केला आहे. आमदारांना आराखडा तयार करत आराखडा तयार करत असताना त्यात लक्ष घातलेले नाही. लक्ष घातलेच असेल तर ते कुणासाठी घातले, जनतेसाठी की बांधकाम व्यावसायिकांसाठी हे तपासावे लागेल. आम्ही सत्ताधारी असल्यामुळे यात फारसे काही बोलू शकत नाहीत, असेही ते म्हणाले. म्हणजे मग लोकांनी आपली गाऱ्हाणी विरोधी पक्षाकडे मांडावीत का? आणि मग या सत्ताधाऱ्यांना सत्तेत कशासाठी बसवायचे? अशा अनेक प्रश्नांमध्ये स्थानिक, विभागपातळीवर, राज्यपातळीवर किंवा देशपातळीवर लोकप्रतिनिधींचे विचार काय असतात असे बघितले तर त्यांना बऱ्याच प्रश्नांची अजिबात जाणीव नसते, अभ्यास नसतो असे दिसून येते. सध्या जमीन अधिग्रहणाचा प्रश्न त्यासाठी तयार होणारा नवीन कायदा, महिला आरक्षणाचा कायदा, लोकपाल विधेयक, भ्रष्टाचार, धरणांचे पाणी वितरण असे अनेक प्रश्न अनेक मतदार संघात किंवा देशपातळीवर उपस्थित झालेले आहेत. लोकप्रतिनिधींना याबाबत प्रतिक्रिया विचारली तर, जवळजवळ नो कॉमेन्टस् अशाच स्वरुपाची किंवा इतकी थातूरमातूर असते, की त्यांच्या प्रतिक्रियेत कुठलाही विचार किंवा गांभीर्य नसते आणि त्यांच्यावरच कायदे करण्याची जबाबदारी आहे. ते निष्क्रिय ठरत आहेत. त्यांच्या भेटीगाठी कुठेतरी लग्नकार्यात बारशात, मौतीत किंवा मंदिराच्या बांधकामाच्या वेळेसच होतात, प्रगल्भपणे एखाद्या लोकप्रतिनिधीने प्रतिनिधीगृहामध्ये बाजू मांडल्याचे किंवा प्रसारमाध्यमांकडे विचार मंथन केल्याचे कोणत्याही मतदार संघातील मतदाराने दाखवून द्यावे. अशा निष्क्रिय लोकप्रतिनिधींमुळेच न्यायालयांना पुढाकार घेऊन काही बदल घडवून आणावे लागत आहेत. लोकप्रतिनिधींना किंवा सरकारला वेळोवेळी खडसवावे लागत आहे.

याची काही उदाहरणे ताजी आहेत. परदेशातील काळ्या पैशांच्या शोधासाठी सरकार काय पावले उचलत आहे, अशी विचारणा सुप्रिम कोर्टाने वारंवार करूनही सरकारने काहीही हालचाल केलेली नाही, शेवटी या देशात काय घडत आहे, सरकार नावाची काही चीज आहे, की नाही, असे म्हणून सुप्रिम कोर्टानेच विशेष शोध पथक नेमून काळ्या पैशांच्या शोधाची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आहे. एका बाजूला न्यायालयांना हे काम करावे लागत आहे, तर दुसऱ्या बाजूला बाबा आणि अण्णांचा उदय झाला आहे आणि त्यांना भ्रष्टाचार मिटविण्यासाठी तयार करण्याचा कायद्याचा मसुदा बनविण्यासाठी पाचारण करण्यात येत आहे. धार्मिक लोकांना भ्रष्टाचार मिटविण्यासाठी दिल्लीत मैदानात उतरावे लागत आहे. यापेक्षा या सरकारची आणखी नाचक्की काय असू शकते. पुन्हा लोकप्रतिनिधीच हे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन करणारे अण्णा-बाबा लोकशाही प्रक्रियेला आणि लोकशाहीला नख लावीत आहेत, अशी ओरड करीत आहेत, पण मग तुम्ही सरकार म्हणून प्रतिनिधी म्हणून काही हातपाय हलवा ना! नसता डोक्यावर न्यायालयांचा बडगा आणि खाली भ्रष्टाचारविरोधी आंदोलनांचा वणवा अशी सरकारची परिस्थिती झाल्याशिवाय राहणार नाही. दिल्लीजवळ नोएडा येथे सरकारने बिल्डरांच्या घशात जमीन घातली. सरकारशी लागेबांधे असलेल्या लोकांनी तेथे उंच उंच इमारती बांधण्यासाठी कमी किमतीत जमीन मिळवली. ज्यांच्या जमिनी गेल्या त्यांनी विरोध केल्यानंतर न्यायालयाला हस्तक्षेप करून तेथील बांधकामे थांबवावी लागली. झालेली बांधकामे कदाचित पाडण्याचाही आदेश मिळेल. हे सरकारचे अपयश नाही का?

पोलिसांच्या अकार्यक्षमतेमुळे लोकांनी शस्त्रे बाळगावीत अशी मुभा नक्षलवादी परिसरात देण्यात आली. नक्षलवादाचा उपद्रव असलेल्या राज्यांनी सलवा-जुडूम म्हणजे स्व संरक्षणासाठी लोकांच्या हातात बंदुका दिल्या. न्यायालयाने यावर ताशेरे ओढून अशा पद्धतीने सर्वसामान्यांच्या हातात शस्त्रे देऊन त्यांना हिंसेला प्रवृत्त करणे योग्य नाही. म्हणून त्यावर बंदी घातली आहे. बाह्य आक्रमणापासून संरक्षण आणि अंतर्गत बंडाळी, दंगल, उद्रेक, यांचा बंदोबस्त ही सरकारची सर्वप्रथम जबाबदारी आहे. ही साधी जबाबदारीही सरकार पार पाडू शकत नाही. गावोगाव ग्रामरक्षक दले स्थापन करून आणि त्यांना गावोगाव पाट्या लावायला सांगून आम्ही आता तुमचे संरक्षण करण्यासाठी लायक नाहीत असेच जाहीर करून टाकले आहे. दरोडे, हाणामाऱ्या, दंगली, छेडाछेडी हे निपटण्याचे काम आता तुमचे तुम्हीच करा, हा सरकारचा संदेश आहे.

भ्रष्टाचार टाळण्यासाठी असलेल्या सेंट्रल व्हिजिलन्स कमिशनरच्या प्रमुखपदी केंद्रसरकारने स्वत:च पी. जे. थॉमस या भ्रष्ट अधिकाऱ्यास की ज्यांच्यावर



**पोलिसांच्या अकार्यक्षमतेमुळे लोकांनी शस्त्रे बाळगावीत अशी मुभा नक्षलवादी परिसरात देण्यात आली. नक्षलवादाचा उपद्रव असलेल्या राज्यांनी सलवा-जुडूम म्हणजे स्व संरक्षणासाठी लोकांच्या हातात बंदुका दिल्या. न्यायालयाने यावर ताशेरे ओढून अशा पद्धतीने सर्वसामान्यांच्या हातात शस्त्रे देऊन त्यांना हिंसेला प्रवृत्त करणे योग्य नाही. म्हणून त्यावर बंदी घातली आहे. बाह्य आक्रमणापासून संरक्षण आणि अंतर्गत बंडाळी, दंगल, उद्रेक, यांचा बंदोबस्त ही सरकारची सर्वप्रथम जबाबदारी आहे. ही साधी जबाबदारीही सरकार पार पाडू शकत नाही.**

अगोदरच भ्रष्टाचाराच्या आणि पदाच्या गैरवापराचे खटले चालू आहेत- त्यांची वर्णी लावण्याचा प्रयत्न केला. त्याचे समर्थन केले. आम्हाला त्यांच्या खटल्यांबद्दल माहिती नव्हती अशी पळवाटही शोधली. एवढ्या मोठ्या देशपातळीवरील खात्याच्या प्रमुखाच्या नेमणुकीच्या वेळी एवढी अंदाधुंदी होत असेल आणि सरकारचा मानसही दिसून येत असेल, की भ्रष्टाचाराची व्यवस्था मोडून काढण्यासाठीसुद्धा एका भ्रष्टाचारी माणसाला तेथे बसवण्याचा आटापिटा सरकारने केला. जनहित याचिकेनंतर हे सर्व उघड झाल्यावर कोर्टाच्या आदेशानंतर त्यांची नेमणूक रद्द करण्यात आली.

२जी स्पेक्ट्रम घोटाळ्यामध्ये स्वत: मंत्रीच अडकलेले आहेत. लोकप्रतिनिधी आणि मंत्र्यांनी कार्यकारी मंडळ म्हणजे प्रत्यक्ष काम करणारी लोकशाही जर भ्रष्टाचार करीत असेल, तर त्या ठिकाणी वॉचडॉगची भूमिका पार पाडावी तो भ्रष्टाचार उघडकीस आणावा, कामाची आणि प्रशासनाची गुणवत्ता टिकवावी हेच त्यांचे काम आहे. त्या ऐवजी तेच जमेल तसे सार्वजनिक संपत्तीचे लचके तोडीत आहेत. न्यायालयीन प्रक्रियेनंतर आता ए. राजा, कनिमोझी, सुरेश कलमाडी हे वॉचडॉग पिंजऱ्यात जाऊन बसले आहेत. गुजरात दंगलींच्या संदर्भात मानवाधिकार आयोगाने केलेल्या तक्रारीनंतर न्यायालयाने पुन्हा एकदा या दंगलींची चौकशी करण्याचा आदेश दिला आहे. कारण आपण दंगली घडविणाऱ्यांना सत्तेत बसवले आहे. बऱ्याच ठिकाणी न्यायालयांनी दिलेले आदेश हे समाजाच्या मानसिकतेच्या फार पुढचे आहेत असेही दिसून येते. समलिंगी संबंधांना चार-पाच वर्षांपूर्वीच न्यायालयांनी योग्य ठरविले असताना, केंद्रीय मंत्री सलमान खुर्शिद - हा एक रोग आहे असे म्हणतात. म्हणजे त्यांना झालेल्या कायद्यांची, सामाजिक बदलांची आणि स्वास्थ्याची किती जाण आहे हे दिसून येते.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील मोठा भाग हा काळ्या बाजारात विकला जातो. याचे प्रमाण राज्यनिहाय ४० ते १०० टक्के इतके आहे. नुकतेच सरकारने ८०% जनतेला अन्नसुरक्षा कायद्याच्या कक्षेत आणण्यासाठी कायदा केला. एका बाजूला प्रचंड भ्रष्टाचार आणि २०-२२ टक्के लोकांनाच सार्वजनिक वितरण व्यवस्थेची गरज असताना त्यात आणखी वाढ करून ८०% लोकांना त्यात आणणे. हे लांगूलचालन आपल्याला कोठे घेऊन जाणार आहे. शेवटी न्यायालयाने या सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा संपूर्ण पर्दाफाश करण्यासाठी स्वत:च विडा उचलला आहे आणि न्यायालयीन चौकशीचे आदेश दिले आहेत.

प्रत्येक चारआठ दिवसांनी न्यायालयाने सरकारला चपराक मारल्याचे उदाहरण दिसून येत आहे. याचा अर्थ लोकप्रतिनिधी निष्क्रिय होत आहेत आणि नाइलाजाने न्यायालयांना सक्रिय व्हावे लागत आहे. आपण आपल्या परिसरातील, मतदारसंघातील छोट्या-मोठ्या सर्वच, ग्रामपंचायत सदस्यांपासून तर आमदार-खासदार-मंत्री यांना कामाला लावणार आहात का? की न्यायपालिका आणि कार्यपालिका यातील सीमारेषा पुसट होण्याची वाट पाहणार आहोत!

**ज्ञानेश्वर शेलार**
मो. ९२२६७९७०१८

■■

# मग चळवळी का थंडावणार नाहीत?

**शेतीच करावीशी वाटत नाही. मग शेतीचे प्रश्न सोडवण्यासाठी आंदोलन का करायचे? असा आपमतलबी विचार तरुण करतो आहे. कष्ट करून जगायची तरुणांची तयारी नाही. 'इझी मनी' मिळवायची लालसा त्यांच्यामध्ये आहे, कारण आपण नोकरी गुणाची करून ठेवली आहे. शेती कनिष्ठ करून टाकली आहे. लाचारांची संख्या वाढते आहे. राजकीय पक्षांचे तरुण कार्यकर्ते म्हणजे हिजड्यांच्या फौजा झाल्या आहेत. 'अन्याय घडो कोठेही चिडून उठू आम्ही' अशी ऊर्मी दिसत नाही. आम्ही त्याची वाट पाहत आहोत. सध्या तरी तंग जिन्स पॅन्टवरील पाठमोरा सलमान खान दोन्ही हात ढुंगणावर ठेवून झिंक चिक्का, झिंक चिका, झिंका चिका रे हे हे हेऽऽऽ म्हणणारा तरुणांचा नॅशनल आयडॉल झाला आहे आणि अण्णा हजारे वाकड्या तोंडाचा गांधी! म्हणून चळवळी थंडावल्या आहेत.**

अलीकडील काळात चळवळी का थंडावल्यात? याचा शोध घेण्यापूर्वी चळवळींचा उद्‌गम कोणत्या परिस्थितीत होतो हे अभ्यासणे गरजेचे आहे. शिवरायांची स्वातंत्र्य लालसा, जिजाऊंनी पाहिलेली महाराष्ट्राची अवस्था, तुकारामांनी, समर्थ रामदासांनी वर्णन केलेली महाराष्ट्राची सामाजिक परिस्थिती, जनतेला अभय देणाऱ्या जननायकाची गरज या सगळ्या गोष्टींच्या कार्यकारण भावाची तर्कसंगती लावल्यास चळवळींचे उद्‌गम, उत्थान आणि ऱ्हाय यांची कारणे सापडू शकतात.

ब्रिटीश भारताचे आर्थिक शोषण करतात ही गोष्ट उमजायला बरीच वर्षे लागली. समाजमन खोलवर जाऊन विचार करत नाही. दादाभाई नौरोजींनी ब्रिटीश पार्लमेंटमध्ये भारताच्या आर्थिक शोषणाला वाचा फोडली. त्यावेळी भारतात काही तीव्र प्रतिक्रिया उमटल्या नव्हत्या; पण १९०५ मध्ये बंगालची फाळणी झाली त्यावेळी देशात असंतोषाची लाट उसळली होती. तीच गोष्ट जालीयनवाला बाग हत्याकांडानंतर घडली होती. जेव्हा अन्यायाची परिसीमा गाठली जाते त्याचवेळी जनक्षोभ उफाळून येतो तोच काळ चळवळींना पोषक असतो, हा एक प्रवाह असतो, फ्लो असतो. चळवळी निर्माण करता येत नसतात. त्या होत असतात. वासुदेव बळवंत फडके ब्रिटीशांविरुद्ध लढते पण ते एकाकी होते. इतकेच नाही तर स्वामी समर्थ या देवपुरुषांनी त्यांना त्यावेळी उठाव न करण्याचे सांगितले होते; कारण ब्रिटीशांविरुद्धच्या चळवळीला ती वेळ अनुकूल नव्हती. भारतीय असंतोषाचे जनक लोकामन्य टिळकांना म्हणतात. त्यांची सिंहगडावर म. गांधींची भेट झाली होती. टिळक युग १९२० मध्ये समाप्त झाले. त्यानंतर २७ वर्षांनी देशाला स्वातंत्र्य मिळाले. या कालखंडात म. गांधी जननायक होते. टिळकांच्या सभेस जेवढे लोक जमत त्यापेक्षा गांधींना ऐकण्यासाठी कितीतरी पटीने जास्त लोक येत होते. हा काळाचा महिमा! देशात स्वातंत्र्य लालसेचा प्रवाह १९४२ ला शिगेला पोहोचला होता. स्वातंत्र्योत्तर काळात महत्त्वाच्या चार चळवळी झाल्यात. त्यात संयुक्त महाराष्ट्राची चळवळ महत्त्वपूर्ण होती. भाषावार प्रांत रचनेचे तत्त्व मान्य झाले होते. मुंबई महाराष्ट्राला न देण्याचे राजकारण खेळले गेले. मुंबईचा गिरणी कामगार हा या चळवळीचा नायक होता. एसेम, डांगे, अत्रे या त्रिकुटाने महाराष्ट्र ढवळून काढला होता. तो मराठी भाषिकांच्या अस्मितेचा प्रश्न होता. त्यात १०५ हुतात्म्यांचा बळी गेला. चळवळ टिपेला पोहोचली आणि ५० वर्षांपूर्वी महाराष्ट्राचा मंगल कलश प्राप्त झाला. १९८०ला शेतकरी आंदोलन पेटले. त्याची धग दशकभर होती. शेतकऱ्यांचं शोषण होत आहे. त्याने कितीही पिकवलं तरी कर्ज फिटत नाही. ही गोष्ट आर्थिक लोकशिक्षण करून शरद जोशींनी शेतकरी समाजापर्यंत नेली. सरकारी धोरणावर शेतकरी तुटून पडले. महाराष्ट्रात 'पुलोद' घडले ते शेतकऱ्यांच्या असंतोषाने. अलीकडच्या काळात शेतकरी चळवळ थंडावली आहे. मनमोहन सिंग व नरसिंह राव या जोडीने नेहरूवादी समाजवादाला सोडचिठ्ठी दिली. आर्थिक उदारीकरण सुरू झाले. विकासदर सरासरी ८ ते ९ टक्के झाला. जो पूर्वीपेक्षा दुप्पट होता. रोजगाराच्या संधी उपलब्ध होत गेल्या. शेतकरी कापूस, कांदा,



रवि देवांग

साखर निर्यातबंदीविरुद्ध बोलू लागला. त्यामुळे कापूस, कांदा, ऊस या पिकांना चांगले दर मिळू लागले. अशा परिस्थितीत शेतकरी उठाव कसा करेल? सद्यस्थितीत समाजावर अन्याय होत आहे; परंतु अन्यायाने परिसीमा गाठलेली नाही. शेतजमीन हस्तांतरणाच्या संदर्भात घटना दुरुस्ती परिशिष्ट (९) मध्ये बदल न केल्यास नंदिग्राम, सिंगूर, भट्टा परसौल या ठिकाणांप्रमाणेच शेतकऱ्यांचे बळी जात राहतील. त्यातूनच बंगालमध्ये सत्तांतर घडले तसे इतर राज्यातही घडल्यास नवल नाही.

आजकाल चळवळी थंडावल्या आहेत ही गोष्ट मला मान्य नाही. चळवळी थंडावलेल्या नाहीत. चळवळींतील लोकसहभाग कमी झाला आहे, नव्हे शून्य झाला आहे हे मात्र खरे. दुसऱ्यांच्या घरात शिवाजी निर्माण व्हावा असे साऱ्यांना वाटते. चळवळीतील कार्यकर्त्यांना राष्ट्रद्रोहाचे कलम लावले जाते. डॉ. विनायक सेन, प्रतिभा शिंदे ही मंडळी राष्ट्रद्रोही नाही; पण 'सत्ता' चळवळींचे खच्चीकरण करण्यात नेहमीच उत्साही असते. रामदेव बाबांचे आंदोलन चिरडण्यामागे सरकारचा भयगंड व रामदेव बाबांची अपरीपक्वता जगजाहीर झाली आहे. इंदिरा गांधींनी आणीबाणी लादली. सर्व प्रमुख नेत्यांना बंदी बनवले. नोकरशाहीने फणा काढला. आचार, विचार आणि व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आली. वयोवृद्ध विकलांग जे.पीं.चे नेतृत्व अंधारातील प्रकाश म्हणत तरुणांनी स्वीकारले. इंदिरा गांधींचा जनतेने पराभव केला. परिस्थिती आणि नेतृत्व याचा मेळ योग्य काळी घडत असतो. त्यातूनच चळवळी जन्मास येतात.

होस्नी मुबारक यांना परागंदा व्हावे लागले. माहिती तंत्रज्ञानाने ही क्रांती केली. ट्वीटर, ब्लॉग इत्यादी इलेक्ट्रानिक्स माध्यमे दळणवळणाचे प्रभावी माध्यम झाले आहे. देश राजकीय आर्थिक कात टाकतो आहे. विद्यमान राजकारण्यांना त्याची चाहूल नाही; पण चळवळींच्यासाठी पोषक वातावरण निर्मिती झाली आहे; परंतु ध्येयवादाचा अभाव आणि चारित्र्यवान नेतृत्व, प्रभावी वक्तृत्व याची वानवा आहे. जात, सांप्रदाय, वांशिक अस्मिता यांनी लोकचळवळींची हानी झाली आहे. गावात नेतृत्व तयार होऊ नये यासाठी दलाल पोसले जात आहेत. नोकरीवरून काढणे, व्यावसायिक कोंडी करणे, गुंडांना हाताशी धरणे, खोटी कलमे लावून कोर्टाच्या तारखांचा ससेमीरा लावणे, पैसे चारून प्रसार माध्यमांना हाताशी धरून नेतृत्व बदनाम करणे, बहिष्कृत करणे, प्रसंगी मारझोड करून दहशत बसवणे असे प्रकार सर्रास अवलंबिले जातात. त्यामुळे चळवळी करण्याची हिंमत खचते. नर्मदा आंदोलनात धुळ्यात झालेला आदिवासींवर अमानुष लाठीहल्ला विस्थापितांचे खच्चीकरण करून गेला. शेतकरी आंदोलनात ३० बळी गेले. त्यामुळे एक प्रकारचा आतंक कार्यकर्त्यांवर लादला जातो. पत्रकार, विचारवंत, बुद्धिवंत, वकील विकले जातात बेभाव... नव्या पिढीतील चंगळवाद, शीघ्र श्रीमंतीची स्वप्ने, तरुणांना, गुमराह करीत आहे. मध्यमवर्गीय समाजातला अप्पलपोटेपणा वाढला आहे. अण्णा हजारेंची भ्रष्टाचारविरोधी आंदोलनं त्यामुळे जनआंदोलनं होत नाही व मेधा पाटकरांची नर्मदा चळवळ केवळ विस्थापितांपुरतीच मर्यादीत राहते, ती या काही कारणांमुळेच! आजोबा, बाप कर्जात बुडून गेला. राब राब राबूनही जगता येत नाही म्हणून कुणब्याचा पोरगा शेती करू इच्छित नाही. त्यापेक्षा शहरात पानटपरी टाकू. शिपायाची नोकरी करू, शिक्षण संस्थेत चिटकू असा विचार ग्रामीण बहुजन तरुण करतो

**आजकाल चळवळी थंडावल्या आहेत ही गोष्ट मला मान्य नाही. चळवळी थंडावलेल्या नाहीत. चळवळींतील लोकसहभाग कमी झाला आहे, नव्हे शून्य झाला आहे हे मात्र खरे. दुसऱ्यांच्या घरात शिवाजी निर्माण व्हावा असे साऱ्यांना वाटते. चळवळीतील कार्यकर्त्यांना राष्ट्रद्रोहाचे कलम लावले जाते. डॉ. विनायक सेन, प्रतिभा शिंदे ही मंडळी राष्ट्रद्रोही नाही; पण 'सत्ता' चळवळींचे खच्चीकरण करण्यात नेहमीच उत्साही असते. रामदेव बाबांचे आंदोलन चिरडण्यामागे सरकारचा भयगंड व रामदेव बाबांची अपरीपक्वता जगजाहीर झाली आहे. इंदिरा गांधींनी आणीबाणी लादली. सर्व प्रमुख नेत्यांना बंदी बनवले. नोकरशाहीने फणा काढला. आचार, विचार आणि व्यक्तिस्वातंत्र्यावर गदा आली. वयोवृद्ध विकलांग जे.पीं.चे नेतृत्व अंधारातील प्रकाश म्हणत तरुणांनी स्वीकारले. इंदिरा गांधींचा जनतेने पराभव केला. परिस्थिती आणि नेतृत्व याचा मेळ योग्य काळी घडत असतो. त्यातूनच चळवळी जन्मास येतात.**

आहे. दलित नेत्यांना नामांतर, अस्मिता, आरक्षण यातच राजकीय तरुणांना गुंतवून ठेवायचे आहे. यामुळे राष्ट्र सेवादल छात्रभारती यांसारख्या सामाजिक अभिसरण करणाऱ्या चळवळी मार खातात. एकेकाळी पँथरचा काय आवाज होता! त्यावेळी राजा ढाले, नामदेव ढसाळ नेते म्हणून पुढे आले. त्यावेळी दलित साहित्य फुलले. ते मंडलच्या बाबतीत मात्र झाले नाही. शेतीच करावीशी वाटत नाही. मग शेतीचे प्रश्न सोडवण्यासाठी आंदोलन का करायचे? असा आपमतलबी विचार तरुण करतो आहे. कष्ट करून जगायची तरुणांची तयारी नाही. 'इझी मनी' मिळवायची लालसा त्यांच्यामध्ये आहे, कारण आपण नोकरी गुणाची करून ठेवली आहे. शेती कनिष्ठ करून टाकली आहे. लाचारांची संख्या वाढते आहे. राजकीय पक्षांचे तरुण कार्यकर्ते म्हणजे हिजड्यांच्या फौजा झाल्या आहेत. 'अन्याय घडो कोठेही चिडून उठू आम्ही' अशी ऊर्मी दिसत नाही. आम्ही त्याची वाट पाहत आहोत. सध्या तरी तंग जिन्स पॅन्टवरील पाठमोरा सलमान खान दोन्ही हात ढुंगणावर ठेवून झिंक चिक्का, झिंक चिका, झिंका चिका रे हे हे हेऽऽऽ म्हणणारा तरुणांचा नॅशनल आयडॉल झाला आहे आणि अण्णा हजारे वाकड्या तोंडाचा गांधी! म्हणून चळवळी थंडावल्या आहेत.

**रवि देवांग**
मो. ९४२२२९६३५८
ravi.metta@rediffmail.com

■■



# भारताच्या रोजच्या मृत्यूचे सोयरसूतक कुणाला?

दत्ता जोशी
media.care.abd@gmail.com

जिल्हा कोर्टासमोरून जात होतो. पोलिस व्हॅनमधून कोणा व्यक्तीला पोलिस हातकड्या घालून उतरवीत होते. त्या माणसाची रया पूर्णतः गेली होती. अत्यंत मळलेले कपडे, गालावर वाढलेले दाढीचे खुंट, अस्ताव्यस्त पसरलेले केस आणि पाय अनवाणी, डोळ्यातील चमक नाहिशी झालेली... अशी अवस्था झालेल्या या माणसाने कोणता गुन्हा केला असेल, या उत्सुकतेपोटी बंदोबस्तावरील हवालदाराकडे मी सहज चौकशी केली. त्याने उत्तर दिले, 'xxxxx ने घरफोडी केली. नव्वद हजाराचा डल्ला मारला. पळून चालला होता, लोकांनी पकडून फोडून काढला आणि ठाण्यात आणला.' मला सर्वांचीच कीव आली. पोलिसाची, लोकांची, ज्याच्या घरी चोरी झाली त्याची आणि या चोराचीही. पोलिसांची या साठी, की अशा 'चिल्लर' चोरांना पकडण्यात त्यांचा वेळ अकारण वाया जात आहे. लोकांची या साठी की ज्या चोरांना चामडी लोळेपर्यंत फोडून काढून भर चौकात फासावर चढवायला पाहिजे अशा महाचोरांना ते फोडून तर काढत नाहीत, उलट आपले प्रतिनिधी म्हणून निवडून देतात. ज्यांच्या घरी चोरी झाली त्यांची या साठी की आता कुणाच्याच घरी काहीही सुरक्षित राहिलेले नाही आणि चोराची या साठी की फक्त ९० हजारांच्या चोरीसाठी त्याची ही अवस्था झाली. लाखो कोटींचे दरोडे घालणारे पंचतारांकित तुरुंगात सरकारी पाहुणचार घेत आहेत...!



मला ए. राजा, कनिमोळी, सुरेश कलमाडी प्रभृतींचे पोलिसांच्या गराड्यात तुरुंगातून कोर्टात आणि कोर्टातून तुरुंगात जात असतानाचे हर्षोल्हासित चेहरे आठवले. यांच्या चेहऱ्यावरील आणि कपड्यांवरीलही घडी मोडलेली नव्हती. राजाचे वर्तन तर खरोखरच राजाप्रमाणे होते पण कनिमोळीसुद्धा नुकत्याच एकाद्या ब्युटीपार्लरमधून आल्यासारख्या प्रफुल्लित दिसत होत्या. सुरेश कलमाडी यांचे तर काय सांगावे? एखाद्या सम्राटालाही लाजवील असा त्यांचा अविर्भाव आहे. कोर्टाजवळ चपलेने मारण्याचा प्रयत्न झाल्यानंतरही त्यांच्या मुखकमलावर विलसणारे हास्य पाहून त्यांच्यात लज्जाभाव अस्तित्वात तरी आहे काय, याविषयी शंका निर्माण झाली. भुरट्या चोऱ्या करणाराची अत्यंत वाईट अवस्था पाहताना लाखो कोटींचा भुगा करणारे हे लोक अशा कडक इस्त्रीच्या कपड्यांनिशी कसे राहू शकतात? तुरुंगात डांबण्याचे आदेश असताना एखाद्या महालात असल्यासारखी त्यांची सरबराई कशी होते? हे सुद्धा संबंधित न्यायमूर्तींनी तुरुंगाला भेट दिल्यानंतर लक्षात यावे? याहूनही कळस म्हणजे संबंधित जेलरला अंदमानला पाठविण्यात आले. ज्यांना अंदमानला पाठवायचे ते जेलरच्या कक्षात चहापान करणार आणि बिचारा जेलर काळ्यापाण्यावर? त्याला कशाला बळीचा बकरा बनविण्यात आले? कलमाडींना चहा देण्याचा, तुरुंगाच्या कोठड्यांना कुलपे न घालण्याचा निर्णय घेण्याइतका अधिकार त्याच्याकडे खरेच आहे? असे अधिकार फक्त देशाच्या सरकारला आणि गृहमंत्र्यांना असतात. त्यांना जाब विचारण्याची कुणाची हिम्मत नाही... इथे भारत कणाकणाने मरतो आहे.

उत्तर भारतात एकाच दिवशी दोन रेल्वे अपघात झाले. त्यांची सांगण्यात येणारी कारणे वेगवेगळी असली तरी खरे कारण फक्त एकच आहे - बेपर्वाई. स्वातंत्र्यानंतर झालेल्या पहिल्या रेल्वे अपघाताची जबाबदारी घेऊन



**भारत रोज कणाकणाने मरतो आहे. कधी तो नेत्यांच्या भ्रष्टाचाराने मरतो तर कधी या नेत्यांना तुरुंगातही 'व्हीआयपी' ट्रीटमेंट दिल्याचे पाहून मरतो. रेल्वेच्या अपघातांमध्ये तर तो महिन्यातून किमान एकदा मरतो आणि बॉम्बस्फोटांत तो (राहूलबाबाच्या भाषेत सांगायचे तर) एक टक्का तरी मरतोच मरतो...! या मरणाचे सोयरसुतक कुणाला आहे का?**

तत्कालीन रेल्वेमंत्री लाल बहादूर शास्त्री यांनी राजीनामा दिल्याची घटना आता दंतकथा वाटावी अशी स्थिती निर्माण झाली आहे. रेल्वेच्या अपघातावाचून एकही महिना जात नाही. मनमोहनसिंगांच्या सरकारात ज्या मंत्र्यांकडे जी जबाबदारी दिली आहे, त्यानी ती सांभाळाचीच नाही असा अलिखित नियम आहे की काय अशी शंका येते. ममता बॅनर्जी यांच्याकडे मागील अडिच-तीन वर्षे रेल्वे खाते होते. त्यातील अधिकांश काळ त्या कोकोत्यात तळ ठोकून होत्या. स्वतःला वेळ देता येत नसेल तर त्यांच्याच पक्षातील कुणा दुसऱ्या कडे हे खाते का दिले गेले नाही? कोणत्याही लालसा नसलेल्या या बाईंना लाल दिव्याची एवढी लालसा का होती? याचे उत्तर तर त्या ही देऊ शकणार नाहीत.

नुकत्याच झालेल्या या दोन अपघातांमध्ये नेमक्या किती जणांचा बळी गेला, हे ४८ तासपर्यंत कळू शकले नव्हते. मदत आणि बचाव कार्याची ही अवस्था? हा यंत्रणेतील दोष की अनास्थेचा परिणाम? देशाचा रेल्वेमंत्री कोण, हे ही देशाला आता आठवत नाही. रेल्वेच्या यंत्रणेतील दोषांवर कशासाठी पांघरूण घातले जाते? दोषारोपांच्या फैरी एकमेकांवर टोलविण्याचा प्रयत्न कशासाठी होतो आहे? दोन - पाच लाखांच्या मदतीनंतर संबंधित कुटुंबांची आयुष्यभराची झालेली हानी भरून येणार आहे का? इथे माणसाचा जीव सर्वात स्वस्त झाला आहे... इथे भारत कणाकणाने मरतो आहे.

०००

मुंबईत पुन्हा एकदा बॉम्बस्फोट झाले. मृतांची संख्या मोजायचे तर मी आता बंदच केले आहे. मध्यंतरी एक व्यंगचित्र पाहण्यात आले होते. विज्ञानात तीन स्थिती शिकविण्यात येतात. इंग्रजीत त्याला 'स्टेट' म्हणतात. 'सॉलिड'स्टेट, 'लिक्विड'स्टेट आणि 'गॅस'स्टेट. या व्यंगचित्रात या तीनही स्थिती लिहून त्यावर त्याच्या आकृती म्हणून त्या स्थिती दर्शविणारी चित्रे काढली होती. त्यात फक्त आणखी एका स्थितीची वाढ त्यांनी केली होती. ती होती 'सॉफ्ट'स्टेट. आणि त्यावर चित्र म्हणून भारताचा नकाशा काढला होता. कोणीही यावे आणि हल्ले चढवून जावे, अशी भारताची ही स्थिती बनली आहे. 'सॉफ्ट' स्टेट.

आणि दुर्दैवाची बाब म्हणजे दर वेळी अशा हल्ल्यांनंतर मुंबईकरांचे कौतिक करण्याची चढाओढ लागते. 'मुंबईकर पुन्हा कामावर', 'मुंबईचे जनजीवन अल्पावधीतच पूर्ववत', 'मुंबईचा हल्लेखोरांना जबरदस्त जबाब' वगैरे... पण खरोखरच ही स्थिती आहे का? मुंबईकर खरेच या बॉम्बहल्ल्यांना जबाब देत लगेचच आपले जीवन पूर्ववत करतात? त्यांना तर आपापल्या रोजीरोटीचे पडलेले असते. बाहेर पडले नाहीत तर त्यांचे मरण नक्की असते. कारण या स्पर्धेच्या वातावरणात ते बाहेर पडले नाहीत, तर त्यांची रोटी हिरावून घेण्यासाठी कोणीतरी टपून बसलेला असतो. बाहेर पडले तर मरणाची शक्यता तान वर्षांतून एकदा असते. घरातच बसला तर दुसऱ्याच दिवशी मरण नक्की ठरते... मुंबईकरांच्या जिद्दीला सलाम ठोकण्याच्या गप्पा करण्याआधी ही वस्तुस्थिती कोणी समजून घेईल?... इथे भारत कणाकणाने मरतो आहे.

या स्फोटांनंतर सगळ्यात वाईट वाटले, ते भावी पंतप्रधान राहूल गांधी यांच्या वक्तव्याचे. त्यांच्या आजी आणि त्यांचे वडील अशाच भ्याड हल्ल्यांचे बळी ठरले. एखाद्या व्यक्तीच्या नात्यातील दोन व्यक्ती एकाच पद्धतीच्या हल्ल्यात मारल्या जाण्याचे कदाचित राहूल गांधी किंवा त्यांचा परिवार हे एकमेव उदाहरण असावे. कोर्टाच्या भाषेत ही 'रेअरेस्ट रेअर' अशी केस. अशी व्यक्ती 'एक टक्का दहशतवादी हल्ले होतच राहणार' असे या हल्ल्यांचे समर्थन करते? कोण काहीही म्हणो, राहूल गांधी हे या देशाचे भावी पंतप्रधान आहेत. कदाचित, पुढील निवडणुकीत कॉंग्रेस पक्षच बहुमताने सत्तेवर आला तर त्याच वेळी किंवा हरला तर पुढील निवडणुकीनंतर ते नक्कीच पंतप्रधान होणार आहेत. अशी व्यक्ती जेव्हा काही बोलते, तेव्हा या देशाच्या भविष्याची ती नांदी ठरत असते. 'एक टक्क्या'ची थिअरी अमेरिकेत का नाही दिसली? ब्रिटनमध्ये का नाही दिसली? ब्रिटनमध्ये अतिरेकी समजून निरपराध मुस्लिम व्यक्तीला ठार केल्यानंतर तिथे मानवतावाद्यांचे मोर्चे निघाले



नाहीत की पाकिस्तानात घुसून ओसामाला आणि इराकमध्ये घुसून सद्दाम हुसेन यांना मारल्यानंतर अमेरिकेत मानवतावाद्यांनी आवाज केला नाही. अशा भंपकपणाला तेथे थारा नाही. भारतात मात्र हे बाजारबुणगे अशा वेळी पुढे सरसावतात. अशा मंडळींच्या मालमत्तेची कधी चौकशी होत नाही की त्यांच्या उत्पन्नाचे ज्ञान स्त्रोत आणि त्यांची प्रत्यक्षातील संपत्ती यांची मोजदाद होत नाही. त्याची मागणीही कोणी करीत नाही.

'दहशतवाद असा चिरडावा लागतो' असे सांगणारी अफजलखानाचे पोट फाडण्याची शिवरायांच्या कृतीची चित्रे दाखविण्यावर आक्षेप घेणाऱ्यांनी आता याच मथळ्याखाली अमेरिकेने छिन्नविच्छिन्न केलेल्या ओसामा बिन लादेनचे चेहरे असलेली पोस्टर लावण्याची परवानगी द्यायला काय हरकत आहे?

स्फोटानंतर देशाचे गृहमंत्री लगबगीने मुंबईत आले आणि हा स्फोट कशामुळे झाला असावा, हे त्यांनी सांगितले. हे सांगण्यासाठी ते मुंबईत आले? हे काम तर संबंधित खात्याच्या दुय्यम अधिकाऱ्याचे आहे. त्यासाठ गृहमंत्र्यांनी कशासाठी वेळ द्यावा? राज्यात तुमचे सरकार, केंद्रात तुमचे सरकार. तुमच्या घरात घुसून अतिरेकी मुडदे पाडतात आणि हे मुडदे पाडण्यासाठी त्यांनी काय तंत्रज्ञान वापरले, याचे विश्लेषण गृहमंत्री करतात! 'सामना'कारांच्या भाषेबद्दल अनेक वेळा मनात उलटसुलट प्रतिक्रिया येत असतात, पण या गृहमंत्र्यांसाठी ते नेहेमी वापरत असलेले 'लुंगीपुचाट' हे विशेषण वापरण्याचा मोह मलाही येथे आवरत नाही.

या देशाची स्थिती मोठी विचित्र झाली आहे. ज्यांनी विश्रांती घेत निवृत्त जीवन जगावे, ते पंतप्रधान आहेत. ज्यांना स्वतःच्या 'इगो'पलिकडे काहीही जपायचे नाही, ते देशाला जपणारे गृहखाते सांभाळत आहेत, 'मिडविकेट'वर क्षेत्ररक्षक उभा करायचा म्हणजे नेमका कुठे हे ज्यांना कळत नाही, ते क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष होत आहेत, एरव्ही प्रत्येक निर्णयावर लक्ष ठेवणाऱ्या काँग्रेस अध्यक्षा घोटाळ्यांवर घोटाळे उघडकीस येताना तोंड उघडत नाहीत, ज्यांना तातडीने फासावर लटकवायला हवे, ते कसाब, अफजलगुरू याच्यासारखे नराधम तुरुंगात व्हीआयपी ट्रीटमेंट घेत सुरक्षितपणे जगत आहेत आणि ज्यांच्या सुरक्षित जीवनाचा मूलभूत हक्क घटनेने मंजूर केला आहे ते या देशाचे नागरिक किड्यामुंग्यांप्रमाणे मरत आहेत... इथे भारत कणाकणाने मरतो आहे.

**या देशाची स्थिती मोठी विचित्र झाली आहे. ज्यांनी विश्रांती घेत निवृत्त जीवन जगावे, ते पंतप्रधान आहेत. ज्यांना स्वतःच्या 'इगो'पलिकडे काहीही जपायचे नाही, ते देशाला जपणारे गृहखाते सांभाळत आहेत, 'मिडविकेट'वर क्षेत्ररक्षक उभा करायचा म्हणजे नेमका कुठे हे ज्यांना कळत नाही, ते क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष होत आहेत, एरव्ही प्रत्येक निर्णयावर लक्ष ठेवणाऱ्या काँग्रेस अध्यक्षा घोटाळ्यांवर घोटाळे उघडकीस येताना तोंड उघडत नाहीत, ज्यांना तातडीने फासावर लटकवायला हवे, ते कसाब, अफजलगुरू याच्यासारखे नराधम तुरुंगात व्हीआयपी ट्रीटमेंट घेत सुरक्षितपणे जगत आहेत आणि ज्यांच्या सुरक्षित जीवनाचा मूलभूत हक्क घटनेने मंजूर केला आहे ते या देशाचे नागरिक किड्यामुंग्यांप्रमाणे मरत आहेत...**

कणाकणाने मरणाऱ्या भारतात सुखाने जगत आहेत ते फक्त राजकीय नेते. हे सुख पक्षनिरपेक्ष आहे. ज्या जीवनशैलीत 'लोकसेवकां'ना 'सेवकां'चा दर्जा द्यायचा, त्यांना सर्वोच्च मानाचा दर्जा दिल्यामुळे झालेला हा घोटाळा आहे. महात्मा गांधी ते राहूल गांधी या मालिकेत सर्वच नेते 'लार्जर दॅन लाईफ' बनले. ही दोन नावे आली म्हणून हा विषय फक्त काँग्रेसपुरता आहे असे मानायचे कारण नाही. सिग्नल तोडल्यानंतर अडवणाऱ्या पोलिसाला आपल्या वार्डाच्या नगरसेवकाचा फोन लावून देण्यापासून या घोटाळ्याची सुरवात होते. शिक्षणसंस्थेचे उद्घाटन चारित्र्यहीन नेता करतो, मंत्र्यांच्या लाल दिव्याच्या गाड्या जाण्यासाठी अँब्युलन्सपासून सारी वाहने रोखली जातात, मंत्र्यांच्या सांगण्यावरून विमानाचे उड्डाणही लांबविले जाते... ही यादी पार मोठी होऊ शकते. १५ ऑगस्ट १९४७ पासून भारत असा कणाकणाने मरतो आहे. पण तो सामान्य भारतीयांप्रमाणेच मोठा चिवट आहे. तो पूर्णतः निष्प्राण होत नाही. कधीतरी हातापायांत बळ येईल, असा त्याला विश्वास वाटत असतो.

**दत्ता जोशी**
मो. ९२२५३०९०१०

■■

# मंत्रिमंडळातील फेरबदल : शेतीच्या झारीतील शुक्राचार्यांना बक्षिसी

**शहरी संपन्न ग्राहक व गिरणी मालक यांचे हित बघण्यात देशाचे व्यापारमंत्री धन्यता मानत आहे. शेती आणि शेतीव्यापाराची समज नसलेल्या व्यापारमंत्र्याला पंतप्रधानांनी बदलले नाही. शेती व्यापारात झारीतील शुक्राचार्य बनलेल्या या मंत्र्याला बक्षीस म्हणून पंतप्रधानांनी आणखी एक खाते बहाल केले! पंतप्रधानांची शेतीक्षेत्राप्रती असलेली अनास्था, असलेला दुजाभाव या फेरबदलाच्या रुपाने पुन्हा दिसून आला आहे. देशात शेतकरी व शेतीक्षेत्राला मिळत असलेली दुय्यम व सावत्र वागणूक नजिकच्या भविष्यात बदलण्याची आणि लढाईविना बदलण्याची सुतराम शक्यता नाही हे या फेरबदलाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.**

निर्णय न घेणारे पंतप्रधान म्हणून कुख्यात झालेल्या मनमोहनसिंह यानी बहुप्रतिक्षीत असा मंत्रिमंडळ विस्तार आणि फेरबदल एकदाचा आटोपला. मंत्रिमंडळ फेरबदल म्हणजे मंत्री बनण्यासाठी इच्छुक सत्तारूढ पक्षाच्या खासदारांसाठी मोठी पर्वणी असते. अशा पर्वणीची ते सदैव वाट पाहत असतात; पण यावेळी अशा फेरबदलाची त्यांच्या पेक्षाही जास्त उत्सुकता प्रसिद्धी माध्यमे, राजकीय निरीक्षक आणि विश्लेषक, विरोधीपक्ष आणि राजकीय-बिगर राजकीय कार्यकर्त्यांसहित जागृत नागरिकांना अधिक होती. मनमोहन सरकारच्या करणीने किंवा ना-करणीने देशभरात निराशेचे व अस्वस्थतेचे वातावरण आहे. स्वत: मनमोहनसिंह यांची विश्वसनीयता व त्यांच्या स्वच्छ प्रतिमेने निर्माण केलेली सदभावना लयास जाण्याची पार्श्वभूमी या फेरबदलाला होती. याच्या जोडीला स्वत:च्या सरकारवर कोणताही वचक वा प्रभाव नसलेला पंतप्रधान अशी अपकीर्ती होतीच. यावरही कळस म्हणजे स्वच्छ प्रतिमेच्या पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यानंतरचे सर्वाधिक घोटाळेबाज, भ्रष्ट आणि जोडीला लोकोपयोगी कार्यांच्या बाबतीत तितकेच निष्क्रिय व अकार्यक्षम सरकार अशी केंद्र सरकारबाबत निर्माण झालेल्या सार्वत्रिक भावनेची पार्श्वभूमी लाभलेला हा फेरबदल असल्याने त्याबाबत अनेक घटकांमध्ये प्रचंड उत्सुकता असणे स्वाभाविक होते. या फेरबदलाच्या निमित्ताने आपण मुके, बहिरे किंवा नामधारी आणि अकार्यक्षम पंतप्रधान नसल्याचे दाखवून देण्याची संधी मनमोहनसिंह यांना लाभली होती. आपल्या सरकारची प्रतिमा उजळ करण्याची संधी होती. सरकार गतिमान करण्यासाठी या फेरबदलाचा उपयोग करून घेण्याची संधी चालून आली होती. अशा संधीचा उपयोग करून घेण्यावर पंतप्रधानांची



सुधाकर जाधव

क्षमता व प्रभाव सिद्ध होणार होता.

कारण यासाठी मंत्रिमंडळात व्यापक फेरबदल अपेक्षित होते; पण असे काहीच घडले नाही. फेरबदलाचा बार एकदम फुसका ठरला. व्यापक फेरबदल तर सोडाच; पण ज्यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे अशा विलासी मंत्र्यांनादेखील पंतप्रधानांनी हात लावला नाही. सर्वोच्च न्यायालयाने ठपका ठेवल्यावर विलासराव देशमुख यांच्या मंत्री म्हणून झालेल्या नियुक्तीवर व बढतीवर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायधीशांनी जाहीर आक्षेप घेतला होता. न्यायधीशांनी मंत्र्यांच्या नियुक्तीबद्दल हस्तक्षेप करू नये एवढाच संदेश देण्यासाठी त्यांना मंत्रिमंडळात कायम ठेवण्याचा अट्टहास करण्यात आला असावा. त्यांना कायम का ठेवले हा मुद्दा बाजूला ठेवला तरी त्यांच्याकडे विज्ञान आणि तंत्रज्ञान यासारखे खाते देण्याच्या औचित्यावर नक्कीच प्रश्न उपस्थित होतो. भविष्यातील प्रगतीच्या दृष्टीने खरे तर हे खाते निर्णायक आहे; पण मंत्र्यांना हे खाते जुलुमाचा राम राम वाटते. अगदी पोलिस व इतर अधिकारी कर्मचाऱ्यांना गडचिरोलित

जाताना वाटतो तसा! प्रधानमंत्र्याला एखाद्या मंत्र्याला शिक्षा देण्यासाठी या मंत्रालायाचा उपयोग होत आला आहे. मनमोहनसिंह यांनी हीच परंपरा पुढे चालविली आहे. भारतात विज्ञान व तंत्रज्ञानाची दुर्दशा व बुवाबाजीची भरभराट का आहे याचे उत्तरही विलासरावांच्या नियुक्तीतून मिळते! निष्क्रियतेच्या बाबतीत तर बरेच मंत्री दोषी होते; पण ज्या प्रश्नांबद्दल मनमोहनसिंह अधूनमधून कळकळ आणि तळमळ प्रकट करीत असतात त्या महत्त्वाच्या ऊर्जा प्रश्नाचे ऊर्जामंत्री सुशीलकुमार शिंदे यांना कोणतेही गांभीर्य नाही, अणू ऊर्जा प्रकल्प २-४ वर्षे उशिरा झाल्याने बिघडत नाही अशी सरकारी भूमिकेच्या विरोधात भूमिका ज्यांनी घेतली त्यांचे खातेदेखिल मनमोहनसिंह याना बदलता आले नाही. भ्रष्टाचार विरोधी आंदोलने चुकीच्या पद्धतीने हाताळणारेही या बदलांतून सहीसलामत सुटले आहेत. सर्वोच्च न्यायालयाला घटनात्मक मर्यादेत राहून काम करण्यास सांगण्याचे नैतिक धैर्य नसलेल्या पंतप्रधानांची त्या संबंधीची घुसमट आणि त्रागा वीरप्पा मोइली यांना विधी मंत्री पदावरून हटवून व्यक्त झाली आहे. कोणतीही चूक दुरुस्त करण्याचा प्रयत्न या फेरबदलातून पंतप्रधानांनी केला नाही. मंत्रिमंडळ फेरबदलाच्या एक दिवस आधी एका साध्या राज्यमंत्र्याने पंतप्रधानांची अवहेलना केली होती. रेल्वे राज्यमंत्री असलेल्या तृणमूल काँग्रेसच्या मुकुल रॉय यांना पंतप्रधानांनी रेल्वे अपघात स्थळी भेट देण्याचा निर्देश दिला होता; पण हे महाशय पंतप्रधानांचा आदेश झुगारून आपल्या पक्षाच्या नेत्या ममता बॅनर्जी यांच्या कार्यक्रमात सामील होण्यासाठी गेलेत. अपघात स्थळी न जाता ममताची चाटुगिरी करण्यासाठी जाणाऱ्या या राज्यमंत्र्याला घराचा रस्ता दाखवायला हवा होता. खरे तर तृणमूलच्या नेत्या ममता यांनीच त्याला डच्चू देण्याची विनंती करायला हवी होती; पण अविचाराने वागण्यास प्रसिद्ध असलेल्या ममतांकडून अशी अपेक्षा करणेच व्यर्थ आहे. पंतप्रधानांनी मुकूल रॉय यांना राजीनामा देण्यास सांगितले असते तर देशात त्याचे स्वागत झाले असते. या निमित्ताने आघाडी सरकारातील घटक दलांना मर्यादेत राहून वागण्याचा संदेश देण्याची हातची संधी गमावून पंतप्रधानांनी आपली हतबलताच प्रकट केली आहे. एकूणच पंतप्रधानांनी फेरबदलाच्या निमित्ताने आपण दुर्बल प्रधानमंत्री नसल्याचे कृतीतून दाखवून देण्याची आणि सरकारची घसरलेली गाडी रूळावर आणण्याची मोठी संधी गमावली आहे. ज्यांना या फेरबदलांबाबत उत्सुकता होती त्या सर्वांचीच पंतप्रधानांनी घोर निराशा केली; पण स्वच्छ व गतिमान सरकारबाबत अपेक्षा भंग करणारा हा बदल असला तरी निव्वळ रिकाम्या जागा भरण्यासाठी हा बदल झालेला नाही हे या बदलाकडे बारकाईने पाहिले असता दिसून येईल.

फेरबदल कशासाठी?

या फेरबदलाचा अर्थ व कारण समजून घ्यायचे असेल तर ते आपल्याला जयराम रमेश यांच्याकडून पर्यावरण खाते काढून त्यांना दिलेल्या बढतीतून समजून येईल. जयराम रमेश यांचा पर्यावरण विषयक आग्रह अतिरेकी स्वरूपाचा व बराचसा सवंग लोकप्रियता मिळविण्याचा त्यांचा प्रयत्न त्यातून दिसून येत असला तरी पर्यावरणासंबंधी नियमांची खिल्ली उडविणाऱ्या, नियमांचे खुलेआम उल्लंघन करणाऱ्या अनेक उद्योगांना त्यानी चाप लावला होता; पण एकूणच त्यांचा कारभार पर्यावरणप्रेमींना भावणारा असला तरी औद्योगिक जगतासाठी डोकेदुखी ठरला होता. काही प्रमाणात प्रगती व सुधारणा यांनाही तो बाधक ठरला होता. सर्वसामान्यांसाठी पंतप्रधान निष्क्रिय वाटत असले तरी उद्योग जगताच्या समस्या सोडविण्याच्या व त्यांना पाहिजे त्या सुविधा देण्याच्या बाबतीत नेहमीच सक्रीय राहत आले आहेत. या बाबतीतील पंतप्रधानांची कृतीप्रवणता जयराम रमेश यांनी अनेकदा अनुभवली आहे. त्यांनी घेतलेले अनेक निर्णय पंतप्रधानानी बदलायला भाग पाडले आहेत. स्वतः पंतप्रधानानी याची कबुली पाच संपादकाशी झालेल्या चर्चेत दिली होती. जयराम रमेश यांच्या अपरिपक्व अतिउत्साहाने पंतप्रधानांच्या हस्तक्षेपाला आमंत्रण दिले हे मान्य केले तरी यातून पंतप्रधानांचा उद्योगांना असणारा वरदहस्त स्पष्ट होतो. उद्योगांच्या मार्गात जयराम रमेश अडथळा ठरत होते. उद्योग जगताच्या मार्गातील हा अडथळा दूर करण्यासाठीच पंतप्रधानांनी या फेरबदलाचा वापर करून घेतला असे म्हणावे लागेल. किंबहुना त्यासाठीच या फेरबदलाचा घाट घातला गेला असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. कारण या फेरबदलाचा दिसणारा व जाणवणारा परिणाम जयराम रमेश यांच्या खाते बदलाशीच निगडित आहे. औद्योगिक उत्पादन वाढीचा घटत चाललेला वेग ही चिंता यामागे पंतप्रधानांची असेल तर ती चुकीची आहे असे म्हणता येणार नाही; पण दुसऱ्या क्षेत्रातील प्रगतीबाबत पंतप्रधान फार गंभीर नाहीत हे मात्र चिंताजनक आहे. दुसऱ्या क्षेत्रात चुकीच्या धोरणाने आणि चुकीच्या निर्णयाने प्रगतीत बाधा येऊन त्याचा फटका कोट्यवधी लोकांना बसत असला तरी पंतप्रधानांना त्याची फिकीर नसते हे पुन्हा एकदा या फेरबदलाने दाखवून दिले आहे. केंद्रीय व्यापारमंत्र्याचे आयात-निर्यात विषयक धोरण सतत शेती व शेतकरीविरोधी राहिले आहे. कांद्याला चांगला भाव मिळत असताना कांद्याची आयात करून भाव पाडण्यात आले. आंतरराष्ट्रीय बाजारात रुईच्या गाठींना चांगला भाव मिळत असताना निर्यात बंदी लादून कापूस उत्पादकांचे अतोनात नुकसान करण्यात आले. साखरेचे बंपर उत्पादन झाले. साखर ठेवायला गोदामे नाहीत. तरीही साखर निर्यातीस परवानगी देण्याबाबत आढेवेढे सुरूच आहेत. शहरीसंपन्न ग्राहक व गिरणी मालक यांचे हित बघण्यात देशाचे व्यापारमंत्री धन्यता मानीत आहे. शेती आणि शेती व्यापाराची समज नसलेल्या व्यापारमंत्र्याला पंतप्रधानांनी बदलले नाही. शेती व्यापारात झारीतील शुक्राचार्य बनलेल्या या मंत्र्याला बक्षीस म्हणून पंतप्रधानांनी आणखी एक खाते बहाल केले! पंतप्रधानांची शेती क्षेत्राप्रती असलेली अनास्था, असलेला दुजाभाव या फेरबदलाच्या रुपाने पुन्हा दिसून आला आहे. देशात शेतकरी व शेतीक्षेत्राला मिळत असलेली दुय्यम व सावत्र वागणूक नजिकच्या भविष्यात बदलण्याची आणि लढाईविना बदलण्याची सुतराम शक्यता नाही हे या फेरबदलाने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

**सुधाकर जाधव**

पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८

ssudhakarjadhav@gmail.com

http://myblog-common-nonsense.blogspot.com/

■■

# बळीराजा डॉट कॉम

## ‘पिढ्यान्‌पिढ्यांच्या अबोलतेला बोलते करण्याचा एक इवलासा प्रयत्न’




अनेक दिवसांपासूनची एक इच्छा होती, की कोट्यवधी शेतकरी असलेल्या या विशालप्राय देशात किमान काही हजार शेतकरी मंडळी एकाच व्यासपीठावर एकत्र येऊन शेती या विषयावर त्यांनी आपसात चर्चा केली पाहिजे. आपल्या सुखदुःखात एकमेकाला समरस केले पाहिजे. शेतीत आयुष्य व्यतीत केल्यानंतर आलेल्या अनुभवांची आपसात देवाण-घेवाण केली पाहिजे. नवनवे तंत्रज्ञान अवगत करताना आणि त्याचा आपल्या शेतीत वापर करताना येणाऱ्या अडचणी सोडवून घेण्यासाठी आपसात विचारविनिमय झाला पाहिजे.

शेतकरी संघटनेच्या अगदी सुरुवातीच्या काळापासून एक कायमची खंत व्यक्त केली जात आहे की, जगाच्या इतिहासातील एवढी मोठी शेतकरी चळवळ, ज्या चळवळीच्या मेळाव्यांनी व अधिवेशनांनी गर्दीचे सर्व उच्चांक मोडले. ज्या चळवळीने लाखापेक्षा जास्त महिलांना एकत्र आणण्याचा विस्मयकारक चमत्कार घडवून आणला, इतिहासानेही तोंडात बोटे घालावी, असे आंदोलन यशस्वी करून दाखवले; त्या चळवळीला प्रसारमाध्यम आणि साहित्यक्षेत्रात मात्र फारशी चमकदार कामगिरी करून दाखवता आली नाही. या चळवळीला पूरक असे दर्जेदार साहित्यसुद्धा थोडाफार अपवाद वगळता फारसे काही निर्माण झाले नाही.

मुळातच शेतकरी समाज मुका आहे. त्याला स्वतःला व्यक्त होण्याची संधीच मिळत नाही. आर्थिक स्थितीने पुरेपूर परावलंबी असल्याने इतरांना जे रुचेल तेच बोलण्याखेरीज त्याला पर्याय उरत नाही. त्याला बोलण्यापूर्वी पहिल्यांदा परिणामांचा विचार करावा लागतो. कर्ज देणे थांबवेल म्हणून सावकार किंवा बँकाच्या विरोधात बोलू शकत नाही. उधारीवर किराणा मिळणे बंद होईल म्हणून व्यापाऱ्यांच्या विरोधात बोलू शकत नाही. ७/१२ चा उतारा मिळायला त्रास जाईन म्हणून प्रशासनाच्या विरोधात बोलू शकत नाही आणि पुढाऱ्यावाचून तर बरेच काही अडते, मग त्यांच्या विरोधात बोलायची तो कशी काय हिंमत करू शकेल? अन्यायाने कितीही मर्यादा ओलांडल्या तरी... त्याला त्याच्या मनातली खदखद जिभेवर आणताच येत नाही. सर्वांना रुचेल असेच बोलणे, हीच परिस्थितीची गरज असल्याने त्याला स्वतःची अशी भाषा उरतच नाही.

परिणामांची तमा न बाळगता एखाद्याने स्वतःला व्यक्त करायचे ठरवलेच तर तसे व्यासपीठच उपलब्ध नाही. शेतकऱ्याकडे जो कोणी येतो तो त्याला ऐकवायलाच येतो, त्याचे ऐकायला कोणीच येत नाही. कृषिविभागाच्या किंवा राजकीय पक्षांच्या मेळाव्यांत तो केवळ श्रोता असतो. कागदावर लिहून पाठवले तर गैरसोयीचे असल्याने वृत्तपत्रही शेतकऱ्यांचे मनोगत छापण्याची हिंमत दाखवत नाही. पुस्तक लिहायचे तर छपाईचा खर्च परवडण्यासारखा नाही. रेडियो-टीव्ही यांना तर

**'पिढ्यान्‌पिढ्यांच्या अबोलतेला बोलते करण्याचा एक इवलासा प्रयत्न' असे ब्रीदवाक्य असलेले बळीराजा डॉट कॉम (www.baliraja.com) हे संकेतस्थळ तुमच्यासाठीच आहे. येथे तुम्ही तुमच्या मनातल्या भावना स्पष्टपणे चितारू शकता. कविता, लेख लिहू शकता. इतरांच्या लेखनावर परखडपणे प्रतिक्रिया नोंदवू शकता. अगदी चारपाच ओळीचा मुद्दा किंवा मनोगतसुद्धा व्यक्त करू शकता. शेतकरी म्हणून जीवन जगताना आलेले अनुभव कथन करू शकता. आजवरच्या वेगवेगळ्या आंदोलनांविषयीची माहिती लिहू शकता. आंदोलनाचे तुमच्याकडे काही फोटो असल्यास ते प्रकाशित करू शकता.**

**प्रवेश कसा घ्यायचा, सदस्यत्व कसे घ्यायचे, मराठीत कसे लिहायचे या विषयीची सर्व माहिती बळीराजा डॉट कॉम (www.baliraja.com) वर उपलब्ध आहे. त्या उपरही काही अडचण आल्यास gangadharmute@gmail.com किंवा ९७३०५८२००४ वर संपर्क करा.**

एकंदरीतच शेती या शब्दाची ॲलर्जी आहे. मग शेतकऱ्याने व्यक्त व्हायचे तरी कसे? अभिव्यक्ती व्यक्त करताच येत नसेल तर अभिव्यक्ती स्वातंत्र्य असून-नसून काय उपयोगाचे?

पण आता या प्रश्नाचे उत्तर मिळाले आहे. शासन, प्रशासन आणि समाज यांनी नव्हे तर नियतीने व नव्या तंत्रज्ञानाने ती संधी शेतकऱ्यांना उपलब्ध करून दिली आहे. इंटरनेटने आता अल्पशा खर्चात अगदी दुर्गम प्रदेशातील आम माणसालासुद्धा थेट जगाच्या नकाशावर आपली छाप सोडण्याची नामी संधी मिळवून दिली आहे. अगदी नाममात्र खर्चात आता इंटरनेटच्या माध्यमातून करोडो शेतकरी, जाती-पाती, धर्म-पंथ, स्त्री-पुरूष, देश-प्रांत या सर्व भेदाभेदाच्या सीमा ओलांडून एकाच वेळी एकाच व्यासपीठावर एकत्र येणे सहज शक्य झाले आहे.

तंत्रज्ञानाने गरुडझेप घेतली आणि सूर्य-चंद्र, मंगळ-अमंगळ तारे मनुष्याच्या टापूत यायला सुरुवात झाली. मात्र या कृषिप्रधान देशातला बहुसंख्य शेतकरी आणि एकूणच शेती हा विषय अडगळीत पडला आहे. विकासाच्या आणि प्रगतीच्या व्याख्येचे संदर्भ आणि अर्थ बदलत आहेत. शासनाच्या चुकीच्या आणि शेतकरी विरोधी धोरणामुळे शेती हा विषयच फारफार मागे ढकलला गेला आहे.

**मंगळ कह्यात आला, कक्षेत तारका**
**भैरू अजून खातो, कांदा न भाकरी**

शेतकऱ्यांच्या अनेक पिढ्या उलटून गेल्या; पण आमचा भैरू मात्र अजूनही कांदा-भाकर खाऊनच आला दिवस ढकलत आहे. त्याच्या न्याहारीचा 'मेनू' बिघडल्या घड्याळाच्या काट्यासारखा आहे त्याच स्थितीत स्थिर असून त्यात काही फारसा बदल घडत नाहीये. हे चित्र बदलण्याची सक्त गरज आहे. शेतकऱ्यांच्या जीवनातले नैराश्य संपून चैतन्य निर्माण होण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या आयुष्यात सुखाचा व सन्मानाचा दिवस उजाडण्यासाठी प्रयत्न होण्याची नितांत आवश्यकता आहे.

शेतीचे यथार्थ चित्रण करणारे आणि परिवर्तनाला भाग पाडणारे साहित्य निर्माण झाले पाहिजे, असे आपल्याला वाटते; पण आपण म्हणतो, की आम्ही मात्र लिहिणार नाही. ते इतरांनी लिहिले पाहिजे. आमचे आयुष्य जगलो आम्ही, आमच्या हालअपेष्टा भोगल्या आम्ही, आंदोलनात उतरलो आम्ही, तुरुंगाची हवा खाल्ली आम्ही, लाठ्यागोळ्या झेलल्या आम्ही आणि आम्ही म्हणतो की आम्ही लिहिणार नाही. ते कुणीतरी लिहावे. हे कसे शक्य आहे? हे कदापि शक्य नाही. शेतकरी चळवळीचा विचार पुढे नेणारी साहित्यनिर्मिती शेतकरी चळवळीमध्ये काम केलेला आंदोलक जेवढ्या प्रभावीपणे करू शकेल तेवढ्या प्रभावीपणे चळवळीबाहेरचा साहित्यिक करू शकणार नाही मग तो कितीही मोठ्ठा प्रभावशाली साहित्यिक असू देत. आपली अनुभूती आपणच साकारायलाच हवी. अस्सल आणि अभिजात लेखन करायला लेखनशैलीची गरज भासत नाही. बोबडेबोल जरी अस्सल आणि अभिजात असेल तर त्यात जिवंतपणा असतो व तो जिवंतपणाच त्या लेखनाला परिणामकारकता प्रदान करतो. लेखन करणे ही एक कला असते, हे मान्य; पण लेखनात कलाकौशल्य वगैरे वापरल्याने ते लेखन कलाकृतीकडे झुकते आणि मग ती कलाकृती वास्तविकतेपासून फारकत घेण्याची दाट शक्यता असते. कला ही कला असते आणि वास्तव हे वास्तव. त्यामुळे फारसा विचार करायची गरज नाही. जसे लिहिता येईल तसे आणि जसे जमेल तसे लिहायचा प्रयत्न शेतकऱ्यांनी करायलाच हवा.

म्हणून मित्रांनो... या!! काळ्याआईच्या कष्टकऱ्यांनो... या, शेतीच्या उज्ज्वल भविष्यासाठी आपण इथे थोडीशी धडपड करूया...!!

**गंगाधर मुटे**
संपादक - बळीराजा डॉट कॉम
gangadharmute@gmail.com
मो. ९७३०५८२००४

■■

# भोंडला, हादगा आणि भुलाबाईची गाणी : महिलांच्या व्यथा

**काही महिलाप्रधान सणांपैकी भुलाबाईचा उत्सव हा एक सण. आश्विन शु. १० ते कोजागिरी पौर्णिमेपर्यंतचा काळ 'आश्विनच्या भुलाया' म्हणून साजरा केला जातो. काही भागात याला हादगा म्हटले जाते तर काही भागात भोंडला. या काळात मातीच्या बाहुल्या/भुलाया मांडून दररोज नित्यनेमाने गाणी म्हटली जातात. खिरापत वाटली जाते. जसजसा काळ बदलत गेला तसतसे या सणांचे महत्त्वही कमी होत गेले. पण त्या काळी छोट्या-छोट्या बालिकांपासून जख्खड म्हाताऱ्या महिलासुद्धा यामध्ये गाणी गाण्यासाठी सहभागी होत असायच्या. त्या पैकी काही गाणी ऐकताना माझ्या अंगावर काटा उभा राहायचा तर काही गाणी ऐकून मन खूप-खूप उदास व्हायचे. काही गाणी मनाला चटका लावून जायची तर काही गाणी ऐकताना कुतूहल मिश्रीत प्रश्नचिन्ह निर्माण व्हायचे.**

बालपणीच्या अशा फारच कमी आठवणी असतात की ज्या माणसाच्या आयुष्यभर सावलीसारख्या सोबत-सोबत चालतात. जीवनाने कितीही रंग बदललेत, आचार-विचारांच्या संरचनेत कितीही बदल झालेत तरीही त्या आठवणी मात्र वास्तवाचे कायम स्मरण करून देत असतात. एका अर्थाने या आठवणी माणसाला डोळस दृष्टी प्राप्त करून देत असतात आणि सामाजिक जीवनमानाकडे बघण्याचा नवा दृष्टिकोनही देत असतात.

माझ्या बालपणीच्या (१९७०-७५) काळात दळणवळणाची साधने एकतर फारशी विकसित झाली नव्हती किंवा ग्रामीण भागापर्यंत पोचलेली तरी नव्हती. एखादी मोटर सायकल जरी गावात आली तरी गावातील लहानसहान पोरं मोटरसायकल मागे धावायचीत. बुजूर्ग मंडळीही घराबाहेर येऊन कुतूहलाने बघायचीत. त्याकाळी गावातले दळवळणाचे सर्वात मोठे विकसित साधन म्हणजे सायकल. सायकलचा वापरही केवळ पुरुषांसाठीच असायचा. पत्नीला सुद्धा सायकलवर बसवणे लाजिरवाणे वाटायचे आणि कुणी जर तसा प्रयत्न केलाच तर ते चेष्टेचा विषय ठरायचे. ग्रामीण जनतेचे दळणवळणाचे एकमेव साधन म्हणजे रेंगीबैल, छकडा, दमनी वगैरे. गावाला जोडणारे पक्के रस्ते उपलब्ध नसल्याने ग्रामीण माणसांचा संचारही मर्यादीत असायचा. पावसाळाभर गावाचा संपूर्ण जगाशीच संपर्क तुटायचा, असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरू नये.

इलेक्ट्रिक, टेलिफोन किंवा तत्सम साधने गावात पोहोचायची होती. टीव्ही, संगणकाचे नामोनिशाण नव्हते. गावात दिसलाच तर एकटा-दुकटा रेडिओ दिसायचा. गावातील एखादा तरुण नोकरी करायला शहरात गेला की शहरातून गावाकडे परतताना हमखास काखेला रेडिओ लटकवून आणि रस्त्याने गाणी वाजवतच गावात प्रवेश करायचा. लग्नामध्ये हुंडा म्हणून गोफ, घड्याळ, अंगठी, सायकल आणि रेडियो ही वरपक्षाची सर्वांत मोठी मागणी समजली जायची. स्वाभाविकपणे मनोरंजनाची काहीच साधने उपलब्ध नसल्याने पारंपरिक सण साजरे करून त्यातूनच मनोरंजनाची गरज पूर्ण केली जायची.



गंगाधर मुटे

जी अवस्था दळणवळण व मनोरंजनाची- तीच वैचारिक देवाणघेवाणीची. सभा, मेळावे, परिसंवाद याचे लोण गावापर्यंत पोचलेच नव्हते. चालायचे ते केवळ हरिनाम सप्ताह किंवा कीर्तन-प्रवचने. हरिनाम सप्ताह किंवा कीर्तन-प्रवचने या प्रकारातला सर्वात मोठा दोष असा की हे बनवे ट्रॅफिक असते. त्यात चर्चेला वगैरे काहीच स्थान नसते. एकाने सांगायचे आणि इतरांनी ते भक्तिभावाने श्रवण करायचे. आपल्या सुखदुःखांना व्यक्त करण्याचे व्यासपीठच उपलब्ध नसल्याने ग्रामीण जनतेची केवढी घुसमट झाली असावी, याचा अंदाज आता सहज बांधता येऊ शकतो.

निदान पुरुष मंडळींना मारुतीच्या पारावर किंवा चावडीवर बसून गप्पा तरी करता येत होत्या. भावना व्यक्त करायला संधी मिळत होती, पण महिलांचे काय? त्यांना ना पारावर बसून गप्पा मारण्याची अनुमती, ना सुखदुःखाला व्यक्त करण्यासाठी एखादे व्यासपीठ उपलब्ध. त्यामुळेच महिलाप्रधान सण अतिशय जिव्हाळ्याने साजरे केले जात असावेत आणि त्या निमित्ताने ग्रामीण महिला मनोरंजन आणि एकीमेकीचे क्षेमकुशल व्यक्त करण्यासाठी अथवा जाणून घेण्यासाठी या सणांचा वापर व्यासपीठासारखा वापर करून घेत असाव्यात.

अशाच काही महिलाप्रधान सणांपैकी भुलाबाईचा उत्सव हा एक सण. आश्विन शु. १० ते कोजागिरी पौर्णिमेपर्यंतचा काळ 'आश्विनच्या भुलाया' म्हणून साजरा केला जातो. काही भागात याला हादगा म्हटले जाते तर काही भागात भोंडला. या काळात मातीच्या बाहुल्या/भुलाया मांडून दररोज नित्यनेमाने गाणी म्हटली जातात. खिरापत वाटली जाते. जसजसा काळ बदलत गेला तसतसे या सणांचे महत्त्वही कमी होत गेले.

पण त्या काळी छोट्या-छोट्या बालिकांपासून जख्खड म्हाताऱ्या महिलासुद्धा यामध्ये गाणी गाण्यासाठी सहभागी होत असायच्या. त्या पैकी काही गाणी ऐकताना माझ्या अंगावर काटा उभा राहायचा तर काही गाणी ऐकून मन खूप-खूप उदास व्हायचे. काही गाणी मनाला चटका लावून जायची तर काही गाणी ऐकताना कुतूहल मिश्रीत प्रश्नचिन्ह निर्माण व्हायचे.

*रुणझुण पाखरा जा माझ्या माहेरा*
*माझ्या का माहेरी सोन्याची पायरी*
*त्यावरी बसजो शिदोरी सोडजो*
*माझ्या का मातेला निरोप सांगजो*
*तुझ्या का लेकीला बहू सासुरवास*
*होते तर होऊ दे औंदाच्या मास*
*पुढंदी धाडीन गायीचे कळप*
*पुढंदी धाडीन म्हशीचे कळप*
*सोन्याचे मंदिर, सोन्याचा कळस*

या धर्तीवर घराचे छत सोन्याचे असेल तर ते समजण्यासारखे होते, पण घराला चक्क सोन्याची पायरी? उलगडा व्हायचा नाही म्हणून मग खूप कुतूहल वाटायचे.

भुलाबाईच्या गाण्याला तत्कालीन सामाजिक साहित्याचा आविष्कारच म्हणावे लागेल. साहित्य हा समाजाचा आरसा असतो असे म्हणतात; परंतु थोरामोठ्या कवी/लेखकांच्या साहित्यात तत्कालीन वास्तव प्रामाणिकपणे उतरलेलेच नसावे. त्या काळात संतकवी देवास भजण्यात गुंग, त्यांचे बहुतांश काव्यवैभव/प्रतिभा देवाचे गुण गाण्यात खर्ची पडली असावी. कवी हा तर मुळातच कल्पनाविलासात रमणारा प्राणी. वास्तववादी लेखन केले तर आपल्या काव्याला साहित्यिक दर्जा मिळणार नाही, या भयाने पछाडलेला. त्यातल्या त्यात कवी हे बहुतांश पुरुषच. त्यामुळे आपल्या दुखाःला कोणीच वाली नाही हे बघून महिलांचा कोंडमारा झाला असावा. महिला विश्वाच्या सुखदुःखाचे लेखक, कवी किंवा गीतकारांनी नीट शब्दांकन केले नाही म्हणून आमच्या मायमाउल्या स्वतःच पुढे सरसावल्या असाव्यात आणि कदाचित त्यामुळेच अपरिहार्यपणे महिलांनी प्रस्थापित काव्याला फाटा देऊन स्वतःचे काव्यविश्व स्वतःच तयार केले असावे. कवी, गीतकार आणि संगीतकाराची भूमिका त्यांनीच चोख पार पाडली असावी आणि मग त्यातूनच आकारास आले असावे हादगा, भोंडला, भुलाबाईचे गाणे. या गीतामध्ये साठवलेली आहेत महिलांची अपार दुःखे. प्रकट झाली आहे साताजन्माच्या असहायतेची कारुण्यता. स्पष्टपणे प्रतिबिंबित झाली आहे अबला म्हणून आयुष्य कंठताना वेळोवेळी झालेली कुचंबणा आणि मिळालेली हीनत्वाची वागणूक. त्या सोबतच अधोरेखित झाली आहे अठराविश्व दारिद्र्य लाभलेल्या संसाराचा गाडा हाकलताना झालेली दमछाक व ससेहोलपट अगदी ठळकपणे.

वरील गीतात आईच्या घराला सोन्याची पायरी आहे असे म्हटले आहे. मग याला काय म्हणावे? कल्पनाविलास की अतिशयोक्ती? माहेरच्या बढाया की वास्तवता? मला मात्र यामध्ये एक भीषण वास्तविकता दिसते. ती सासुरवासीन जेव्हा सांगावा धाडण्यासाठी त्या पाखराला तिच्या माहेरगावी पाठविण्याचा बेत आखते तेव्हा तिचे माहेरघर पाखराला ओळखता यावे यासाठी तिच्या आईच्या घराची ओळख, खाणाखुणा सांगणे क्रमप्राप्तच ठरते. नेमकी येथेच तिची गोची झाली असावी. तिच्या आईच्या घराचे छप्पर, भिंती आणि दरवाजे हे नक्कीच सांगण्या योग्य नसावे. खरं आहे ते सांगण्यासारखं नाही आणि खोटंही बोलायचं नाही अशी स्थिती जेव्हा उद्भवते तेव्हा अतिशयोक्तिपूर्ण कथन करून वेळ मारून नेणे, हाच तर मनुष्यस्वभाव आहे. जेव्हा एखाद्याकडे सांगण्यासारखे काहीच नसते तेव्हा तो बढाईचा आधार घेत असतो हेच तर त्रिकाल अबाधित शाश्वत सत्य. मग तिने सोन्याची पायरी सांगितली त्याचा वेगळा अर्थ कसा घेणार?

त्यावरी (पायरीवर) बसजो, शिदोरी सोडजो म्हणजे काय? निरोप घेऊन जाणाऱ्या पाखराला सोबत नेलेली शिदोरीच खाण्यास सांगायला ती विसरत नाही. का? उत्तर अगदी सोपे आहे, पाखराला तातडीने जेवायची व्यवस्था आईच्या घरी होऊ शकेल अशी परिस्थिती आईचीही नाही, हे तिला पुरेपूर ठाऊक असावे. तसे नसते तर तिने सोबत शिदोरी कशाला दिली असती? आईचे गाव लांब आहे, तेवढी मजल गाठेपर्यंत रस्त्याने भूक लागेल हा उद्देश असता तर मध्येच वाटेवरच्या एखाद्या विहिरीवर किंवा नदीवर बसून शिदोरी खायला सांगितले असते. आईच्या घरी पोचल्यावर पायरीवर बसून सोबतचीच शिदोरी खावी जेणेकरून पाव्हणा उपाशी नाही याचे समाधान आईला लाभेल व आईकडे पाव्हण्याला तातडीने जेवू घालायची व्यवस्था नसेल तरी तिची या फटफजितीपासून सुटकाही होईल, असा कयास बांधूनच तिने पाखराला नेमकी सूचना दिली, हे उघड आहे.

आता हे गीत बघा. या गीतामध्ये एका सुनेला लागलेली माहेरची ओढ आणि सुनेला जर माहेरा जाऊ दिले तर शेतीत कष्ट करणारे दोन हात कमी होतील, या भीतीने त्रेधातिरपीट उडालेल्या कुटुंबातील उर्वरीत सदस्यांची हतबलताच दिसून येत आहे.

नुकतेच लग्न होऊन सासरला नांदायला आलेल्या सुनेला तिच्या माहेरची आठवण होते, आईच्या आठवणीने जीव व्याकूळ झालेला असतो. तिकडे आईलासुद्धा लेकीची आठवण होऊन गहिवरलेले असते म्हणून मायलेकीची गाठभेठ करून देण्यासाठी बाप लेकीला घेण्यासाठी आलेला असतो. बाप घ्यायला आलेला बघून आनंदाने उल्हसित झालेली सून सासूला हळूच पण भीत भीत विचारते :

*हात जोडूनी पाया पडूनी*
*सासूबाई मी विनविते तुम्हाला*
*बावाजी आले घ्यायाला*
*जाऊ का मी माहेराला, माहेराला?*

माहेराला जायची रीतसर परवानगी सूनबाई मागते आहे हे बघून सासू थोडी भांबावते. तिच्या समोर अनेक प्रश्न उभे राहतात. एक तर काहीना काही पैसा लागेलच जो घरात नाहीच. दुसरे असे की शेतीत कष्ट करणारे दोन हात पण कमी होणार. म्हणून ती सुनेला म्हणते :

*कारलीचे बी लाव गं सूनबाई*
*मग जा आपल्या माहेरा, माहेरा*

कारलीच्या बियाणाची लागवड करून माहेराला जाण्याचा सल्ला सुनेला मनोमन पटतो. ती बेगीबेगी लागवड उरकते आणि पुन्हा सासूला विचारते :

*कारलीचे बी लावलेजी सासूबाई*
*आता तरी धाडा माहेरा, माहेरा*

एक वेळ मारून नेता आली. कारलीचे बी लावून झाले पण आता पुढे काय? पुन्हा सासूबाई शक्कल लढवते :

*कारलीचा वेल निघू दे गं सूनबाई*
*मग जा आपल्या माहेरा, माहेरा*

सून पुन्हा काही दिवस कळ काढते, बियाणे अंकुरून वेल निघेपर्यंत बियाला पाणी घालते, वेलीचे संवर्धन करते आणि मग वेल निघालेला बघून पुन्हा एकदा आपल्या सासूला विचारती होते :

*कारलीचा वेल निघालाजी सासूबाई*
*आता तरी धाडा माहेरा, माहेरा*

सासूसमोर पुन्हा तोच यक्षप्रश्न. इकडे आड तिकडे विहीर. नाही म्हणता येत नाही आणि पाठवायला गेले तर संसाराचं अर्थशास्त्र कोसळते. कौटिल्याची अर्थनीती कळायला अर्थतज्ज्ञ किंवा अर्थमंत्रीच लागतो

या सुशिक्षित समाजातील गोंडस समजुतीला उभा छेद देणारी एका अशिक्षित सासूची वर्तणूक. मग तिथून पुढे नवनवीन युक्त्या लढविणे सासूचा नित्यक्रमच बनून जातो.

*कारलीला फूल लागू दे गं सूनबाई*
*मग जा आपल्या माहेरा, माहेरा*

कारलीला फूल लागले की माहेराला जायला मिळणार या आशेने सून मात्र आलेला दिवस पुढे ढकलत असते.

*कारलीला फूल लागलेजी सासूबाई*
*आता तरी धाडा माहेरा, माहेरा*

कारलीचा वेल मांडवावर गेलाय. वेल फुलांनी बहरून गेली. पण नशिबाच्या वेलीला बहर येईल तेव्हा ना.

*कारलीला कारले लागू दे गं सूनबाई*
*मग जा आपल्या माहेरा, माहेरा*

आता प्रतीक्षेची घडी संपली. कारलीला कारले लागलेत. आता तरी परवानगी मिळायला हवी की नाही?

*कारलीला कारले लागलेजी सासूबाई*
*आता तरी धाडा माहेरा, माहेरा*

आता कष्ट फळांस आले. कारली पण कारल्याने लदबदून गेली. पण कारली बाजारात नेऊन विकल्याखेरीज पैसा कसा येणार? म्हणून पुन्हा सासू सुनेला अगदी समजावणीच्या स्वरात सांगते

*कारलीला बाजारा जाऊ दे गं सूनबाई*
*मग जा आपल्या माहेरा, माहेरा*

कारलीला कारले लागलेत, कारली बाजारात गेली. आता मात्र नक्कीच परवानगी मिळणार अशी सुनेला खात्री आहे, म्हणून ती म्हणते

*कारली बाजारात गेलीजी सासूबाई*
*आता तरी धाडा माहेरा, माहेरा*

कारली बाजारात गेली आहे. शेतीत पिकवलेला माल बाजारात जाणे, हा शेतीतील कष्ट फळास येणारा परमोच्च बिंदू. खरे तर हे गीत यापुढे आनंदाच्या क्षणांकडे वळायला हवे. एवढ्या मेहेनतीने पिकविलेली कारली बाजारात जाणे हा कष्टाचे फळ पदरात पडण्याचा क्षण. शेतकऱ्याच्या घरात लक्ष्मी येण्याचा एकमेव मार्ग म्हणजे शेतीत घाम गाळून पिकविलेला माल विक्रीस जाणे. माल विकायला बाजाराकडे गेलेला घरधनी घराकडे येताना लक्ष्मी घेऊन परतायला हवा. सोबत काहीना काही भातकं, खाऊ वगैरे आणायला हवा; पण इथून पुढे या गीतात तसे काहीच होत नाही. याउलट गीताच्या याच कडव्यापासून गीत विचित्र वळण घेते. निदान आतापर्यंत तरी कुठलाही खाष्टपणा न दाखविणाऱ्या सासूचा स्वभाव इथूनच बदलायला लागतो. आजपर्यंत घरात एकमेकाशी गोडीगुलाबीने वागणारी माणसे आता नैराश्याच्या भावनेतून एकमेकांशी फटकून वागताना दिसत आहे. घरात चिडचीडपणा, उदासीनता वाढीस लागलेली दिसत आहे.

नेमकं झालंय तरी काय? कारली मातीमोल भावाने तर नाही खपली ना? की कारलीच्या खरेदीला कोणी घेवालच मिळाला नाही? मनुष्यजातीचा स्वभाव त्याच्या आर्थिक स्थितीनुसार बदलत असतो हे समीकरण अर्थतज्ज्ञांच्या अर्थशास्त्रात बसत नसले तरीही तेच सत्य असावे. कारण या गीताचा शेवट नेमके तेच अधोरेखीत करून जातो.

आता तरी आपल्याला माहेराला जायला मिळणार की नाही या विचाराने ग्रस्त झालेली सून परत एकदा सासूला विचारती होते. सासूला खुश करण्यासाठी तिला तिच्या आवडीची कारलीची भाजी करून खाऊ घालते.

*कारलीची भाजी केलीजी सासूबाई*
*आता तरी धाडा माहेरा, माहेरा*

पण आता आर्थिक विवंचनेने ग्रासलेल्या घरातली सारी कहाणीच बदललेली असते. परिस्थितीसमोर निरुत्तर झालेली सासू चक्क सुनेसोबत त्रोटक स्वरूपात बोलायला लागते. तिची भाषा बदलते, भाषेची ढब बदलते आणि शब्दफेकीची तऱ्हाही बदलते.

*मला काय पुसते, बरीच दिसते*
*पूस आपल्या सासऱ्याला, सासऱ्याला*

अगं सूनबाई, माझी ना नाही पण एक शब्द मामंजीला पण विचारून घे ना. असे म्हटले असते तर ते समजण्यासारखे होते पण सासूची आता तशी सहज आणि सौदार्हपूर्ण बोलीभाषाच बदललेली दिसत आहे कारण मला काय पुसते, बरीच दिसते हे वाक्य वाटते तेवढे सहज नाही. या वाक्यात उद्वेग, उबग, क्लेश, चिडचिड, ग्लानी आणि फटकळपणा ठासून भरला आहे.

मात्र तरीही सासऱ्याकडूनच परवानगी घ्यायची होती तर इतके दिवस तुम्ही कशाला उगीच बहाणे सांगत राहिल्या असा प्रतिसवाल सून करीत नाही. सासूची इच्छा प्रमाण मानून सून आता सासऱ्याला विचारायला जाते.

*मामाजी, मामाजी बाबा आले न्यायाला*
*जाऊ काजी माहेरा, माहेरा*

पण सासरा तरी वेगळं बोलणार? सुनेला माहेरी पाठवायचे म्हणजे निदान तिला जाण्यापुरता तरी घरात पैसा असावा की नाही? नसणारच. म्हणून तर तोही आपल्यावरची जबाबदारी दुसऱ्यावर ढकलून मोकळा होतो.

*मला काय पुसते, बरीच दिसते*
*पूस आपल्या नवऱ्याला, नवऱ्याला*

आता शेवटला पर्याय. तिची माहेराला जाण्याची हक्काची मागणी कोणीच समजून घेतली नाही; पण आता परवानगी देण्याचे अधिकार थेट नवऱ्याच्याच हातात आले आहे. तिच्या व्याकुळतेची तीव्रता नवऱ्याला तरी नक्कीच कळलेली असणार, असे तिला वाटते. तिला खात्री आहे की आता नक्कीच जायला मिळणार. बस्स एवढ्याच तर आशेपायी ती नवऱ्याला विचारायला जाते.

*स्वामीजी, स्वामीजी बाबा आले न्यायाला*
*जाऊ काजी माहेरा, माहेरा*

पण प्राणप्रियेच्या प्रश्नाला नवरा उत्तरच देत नाही. नवरा काय म्हणतो हे गीतात लिहिलेच नाही. गीताचा दोन ओळीत थेट शेवटच करून टाकला आहे.

*घेतलीय लाठी, हाणलीय पाठी,*
*तुला मोठं माहेर आठवते, आठवते!!*

पीएचडी, डी.लिट मिळवून किंवा वेदपुराण, कुराण, बायबल, कौटिल्य, चाणक्य किंवा हजारो पानांचे अर्थशास्त्राचे पुस्तक वाचूनही जेवढे गाव, गरिबी आणि शेतीचे अर्थशास्त्र समजून घेता येत नाही त्यापेक्षा जास्त वास्तववादी अर्थशास्त्र या एका गीतात सामावले आहे, याची मला खात्री आहे.

**गंगाधर मुटे**
आर्वी छोटी - ४४२३०७, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.
gangadharmute@gmail.com/ www.baliraja.com
मो. ९७३०५८२००४

■■

# सोने की सीढ़ी

कण कण में ईश्वर की सत्ता को मानने वालों ने वास्तव में एक एक कण को अपनी उर्जा और प्रतिभा से सदा के लिये बदल कर रख दिया. इतने सुंदर जीवन में कोई क्यों लौटना नहीं चाहता? इसलिये हम इस धरा पर बार बार लौटते रहे. कभी अपने ही लोगों के बीच, तो कभी अनजाने लोगों के बीच में. यह वह दौर था जब हमारे माँ बाप सोने की सीढ़ी की लालसा में जीवन जीते थे. पोते पड़पोतो का सुख जीवन को प्रेरित या बनाये रखने वाली मुख्य शक्ति था. मेरा परिवार हम तीन भाईयों का सामुहिक परिवार होने से मेरी माँ को यह सौभाग्य नसीब हुआ. देश के कितने परिवार, इस सरकार नियोजित विस्थापन से बचे होंगे, जहाँ सोने की सीढ़ी का सुख देखने वाली माताएँ मौजूद होगी? क्या हमारे बुजुर्ग, वृद्धाश्रमों के अकेलेपन में किसी पड़पोते के जन्म का वह आनंद उत्सव मना पायेंगे, जो मेरी माँ के हिस्से में आया है.

बचपन से एक कहावत मैं सुनता आया था कि किसी व्यक्ति के जीवन काल में ही यदि उसे अपने परिवार की चौथी पीढ़ि देखने का सौभाग्य मिले तो बस मान लिजीए उसकी विदाई सोने की सीढ़ी पर होगी. जब कभी उनकी मृत्यु होती, ऐसे लोगो की लाश के सिरहाने एक या दो ग्राम की सोने की एक सीढ़ी बना कर रख दी जाती, जो श्मशान घाट में सामान जमा करने वाले उठा लेते. मुझे यह एक किस्म का अंधविश्वास या पागलपन लगता था कि एक तरफ तो आदमी अपनी बड़ती उम्र या बुढ़ापे से जर्जर हो चुकी काया से परेशान मृत्यु का इंतजार कर रहा हो और हम है कि उसके चौथी पीढ़ि देखने का जश्न मना रहे है. कई सालों तक यह गुत्थी नहीं सुलझी. इसी बीच में २००३ में मेरे पिता और २००६ में मेरे बड़े भाई की मृत्यु के दो गहरे आघात मेरे परिवार को और विशेष रूप से मेरी माँ को भुगतने पड़े. मेरे भाई की मृत्यु के समय तो कोई भी उसे सांत्वना देने का साहस नहीं बटोर पाया और सभी को यूँ लगता था कि उसे अब शेष बचा हुआ जीवन इस मृत्यु की यातना के साये में ही जीना होगा. हमारा सारा परिवार एक गहरे सन्नाटें में था.

इसी बीच मेरे स्वर्गीय भाई के बेटे का विवाह हुआ और साल भर के भीतर ही उसकी पत्नि के गर्भवती होने की सूचना मिली. सारा परिवार जैसे उस नये जीवन के स्वागत की तैयारियों में लग गया. २८ जनवरी २००९ को हमारे परिवार की चौथी पीढ़ि अर्थात उसकी नवजात बेटी का घर में आगमन हो गया. जिस तरह एक गहरी दर्दनाक रात के बाद का सूरज हमें सांत्वना और साहस दोनो ही देता है, ठीक उसी अंदाज में इसे नये सदस्य ने घर के प्रत्येक सदस्य को अपनी उर्जा से भरना और प्रेरीत करना शुरू कर दिया. मेरी माँ अपने सारे अवसादों को भूलकर उसके पालन पोषण में लग गई. सत्तर साल की उस कर्मठ महिला में जैसे एक नयी माँ का जन्म हो गया. हमारे घर में केवल एक बच्चा ही नहीं जन्मा, सभी के भीतर मानो कोई न कोई रिश्ताा जन्म लेने लगा. इस एक सदस्य ने अपनी बेहद ताजा, पवित्र और दिव्य उपस्थिति से घर की एक एक ईंट में जान भर दी. सभी पुरूष सदस्य काम से थके बाहर से आते और उससे खेलने में मशगूल होकर अपने सारे व्यावसायिक तनाव भूल जाते. वही हमारी मनोवैज्ञानिक, वही हमारा टॉनिक बन गई. हमारे घर के आपसी तनाव कब लुप्त हुये यह तो हम भी नहीं बता सकते किंतु उसके जन्म का जो सबसे बड़ा असर पड़ा, वह यह कि, हमें हमारी माँ की चिंताओं से मुक्ति मिल गई. मेरी माँ के जीवन के शेष बचे सालों की सहचारी सखा उसे मिल गई. उसका जीवन उस नन्हें से सदस्य की मौजूदगी से जश्न बन चुका है. उसका वर्तमान एक दिव्य शांति से भर चुका है. मैंने जमीन पर लेट कर हमारे उन बुद्धिमान पूर्वजों को नमन किया जिन्होंने जिंदगी के कितने ही बेशकीमती सूत्र अनगिनत कहावतों या मुहावरों के रूप में हमें प्रदान किये थे. हम ही मानो बेवक़ूफ़ थे जो सरकारी प्रचारतंत्र का शिकार होकर जीवन को बोझ समझते रहे और सरकारी बाबूओं की तर्ज पर नये जीवन का स्वागत करने के स्थान पर जनसंख्या नियंत्रण के नारे लगाते रहे. हम एक ऐसी नीति की जय जयकार करते रहे, जहाँ एक व्यक्ति अपने घर में पर्यावरण को दूषित करने वाली पाँच पचास कारें या स्कूटर तो रख सकता



ॲड. दिनेश शर्मा

है, लेकिन बच्चे केवल दो ही पैदा करेगा. हम घर के प्रत्येक सदस्य को अलग अलग कमरा या बाथरूम देने वाली समृद्ध व्यवस्था की ओर तो बढ़े लेकिन रिश्तों के लिये घर के दरवाजे बंद करते चले गये.

भारत और चीन जैसे देशों ने जनसंख्या नियंत्रण का जो सरकारी तरीका अपने अपने देश में लागु किया था उसके कीमत इन दोनो देशों की जनता को अपने जीवन के समूल भावनात्मक विस्थापन को स्वीकार करके चुकानी होगी. हम कल एक ऐसे दौर में पहुँच जायेंगे जहाँ प्रशस्त सड़को वाले शहर होंगे, ऊँची ऊँची अट्टालिकायें होगी, हर नागरिक के लिये अलग वाहन होंगे, किंतु जीवन को जारी रखने के लिये जरूरी रिश्ते नदारद होंगे. वे लोग भाग्यशाली होंगे जिन्हें जीवन साथी मिल जायेगा. हमारी आने वाली पीढ़िया भाईयों की ताकत से वंचित होगी और रक्षा बंधन के दिन बहने ढूँढने से भी नहीं मिलेगी.

हमारे जीवन से यदि प्रेम ही हट गया और हमें केवल मशीनों के सामने काम करने वाले पहरेदारों में तब्दील करके रख दिया गया तो लोग क्यों जीना चाहेंगे? यदि जीवन की यात्रा को जारी रखने वाला विपरित लिंग ही हमारे सामने से हटा दिया गया तो जीवन किसकी प्रेरणा से आगे बढ़ेगा? किसके लिये साहित्य लिखा जायेगा, किसके लिये स्वस्थ हुआ जायेगा? तब सरकार को जनसंख्या नियंत्रित करने के लिये किसी तरीके को इजाद करने की जरूरत नहीं होगी, बल्कि लोग स्वयं होकर अपने आपको समाप्त कर लेंगे. इन दोनो महान देशों के लिये बीते दशक रिश्तों के कत्लेआम के दशक थे. ये दशक परिवार संस्था के उच्चाटन के दशक थे. ये दशक हर अजन्मे बच्चे को बोझ समझने वाली सरकारी मानसिकता के दशक थे. ये जीवन का सम्मान करने वालो के नहीं बल्कि उसे समस्या मानने वालो के दशक थे.

इस बात को सांइस मैगजीन की खोजी पत्रकार मारा व्हिस्टेंडाल की रिपोर्ट और भी सनसनीखेज ढंग से सिद्ध करती है. वह बताती है कि एक बच्चे वाली जनसंख्या नीति के कारण चीन में किसी भी शहर के स्कूलों में लड़कों की तुलना में लड़कियों का प्रमाण बेहद कम हो चुका है. इस समय चीन में विवाह योग्य युवाओं में लिंग के आधार पर फासला चार करोड़ से ज्यादा का हो चुका है अर्थात चार करोड़ लड़कियाँ कम है. नतीजतन वहाँ हर हाल में चार करोड़ युवाओं को आजन्म कुँआरा ही रहना होगा. उनकी मृत्यु के साथ ही उनकी करोड़ां साल पुरानी वंश परंपरा समाप्त हो जायेगी. चीन के साथ साथ भारत, वियतनाम, अजरबैजान और अल्बानिया जैसे देशों में लिंगानुपात तेजी से बिगड़ चुका है. भारत जैसे देश के कोने कोने में फैले गर्भ परिक्षण केंद्रों के जाल की मेहरबानी से हर गाँव, हर मुहल्ले में जैसे स्त्रीभ्रूणों का जौहर चल रहा है. केवल दो ही बच्चे यदि चाहिये तो कौन दूसरे की फिक्र करें, अपने घर में तो दोनो कमाऊ पूत ही चाहिये. सारा देश जैसे सरकारी कानूनों और प्रचारतंत्र का शिकार होते हुये अपने की बच्चों के संभावित जीवनसाथीयों की जाने ले ले रहा है. देश के उच्च वर्ण में पिछले दशक में यह कत्लेआम ज्यादा होने के कारण उनकी हालात बेहद खराब है. अपने अपने परिवार को बचाने के लिये ये लोग अब अपने जातीय अहंकारों को भूल कर तथाकथित पिछड़े वर्गो की लड़कियों को अपनी बहूएँ बना रहे है. उनकी खरीद फरोख्त हो रही है. जो समाज महज तीन दशक पहले जनसंख्या नियंत्रण के नारे को राष्ट्रीय घोष वाक्य मान चुका था और जहाँ तीन से ज्यादा बच्चों वाले माँ बाप को तिरस्कार की नजरों से देखा जाता था, वहाँ अचानक स्थिति ने नयी करवट ले ली है. मेरे ही घर के सामने कॉटन मिल के एक कर्मचारी ने अपने जीवन में एक बेटे की लालसा में छह लड़किया पैदा कर दी. हम सभी आज से बीस साल पहले इसी बात से चिंतातुर थे कि वह इन छह लड़कियों की शादी कहाँ करेगा. उसके पास उन छह लड़कियों को पढ़ाने के पैसे भी नहीं थे और मन में वैसी कोई इच्छा भी नहीं थी. जैसे जैसे उसकी लड़किया बड़ी हो रही थी, हमारा उसके लापरवाह जीवन के प्रति आक्रोश भी उसी अंदाज में बढ़ रहा था.  लेकिन वक्त ने ऐसी करवट मारी की वह जीत गया और हम ठगे से देखते ही रह गये. उसकी सारी लड़किया आज बड़े घरों की बहुएँ बन चुकी है और यह बंदा जीवन का आनंद ले रहा है. जबकि उसकी छह लड़कियों को देख कर रोज उसे ताने मारने वाला दो बच्चों का एक बाप आज अपने ही घर में अकेला रहता है. उसकी पत्नि की मौत हो चुकी है और बच्चें शहर में रहते है.

अब जरा इस जनसंख्या नीति के दूसरे दुष्परिणामों पर भी गौर कर लिया जाये. अभी अभी जो आँकड़े आये है उसके अनुसार देश के ग्रामीण बहुसंख्यक आबादी वाले जिलों की लोकसंख्या पिछले दशक में कम हो चुकी है. देश के शहर आबादी को अपनी ओर खींच रहे है. नतीजें में आनेवाले दशक में सारे देश का खेती क्षेत्र श्रमिकों की कमी से जूझता मिलेगा. गाँव के गाँव खाली हो रहे है. वहाँ केवल वृद्ध रहते है. कोई डॉक्टर, शिक्षक या पढ़ा लिखा आदमी गाँव में रहने को तैयार ही नहीं है. गाँव के लोगों को अपनी मामूली जरूरतों के लिये शहरों की ओर दौड़ना पड़ता है. एक शतक पहले तक जो गाँव लगभग आत्मनिर्भर थे वे मानो आज टूट चुके है. वहाँ रहना मँहगा पड़ रहा है. जिल्हा परिषद की स्कूलों को गाँवों में बच्चे नहीं मिल रहे है और शहरों में स्कूलों के सामने मीलों लंबी लाइने लगी हुयी है. हमारे जीवन, रिश्तों की संपदा से दीन हीन होते चले जा रहे है, जीवन एक यांत्रिक प्रक्रिया में तब्दील किया जा चुका है. स्कूलें, कारखानों में बदल चुकी है और बच्चे उत्पादों में ढाले जा चुके है. काम, मशीने कर रही है और आदमी निगरानी मात्र के लिये पाला जा रहा है. सरकारी हस्तक्षेप के कारण जीवन की मूलभूत शक्ति को मिले.आघात का इससे बड़ा और कौनसा उदाहरण होगा?

मेरे मन में ऐसे में सदा एक प्रश्न खड़ा होता है. जब हमारे पूर्वज अपने अस्तित्व के लिये युद्धरत थे, भुखमरी से परेशान होकर गाँव गाँव की यात्रा करते थे, तब जीवन की उस सारी आपाधापी के बीच भी जीवन की दिव्यता की तलाश कर लिया करते थे. उन्होंने भगवत्ता की कल्पना को जन्म दिया और दूर गगन में बैठे उस ईश्वर की आराधना की, जिसे किसी ने कभी देखा नहीं था. उन्होंने अपने मृत पूर्वजों की आत्मा की शांति के लिये तिर्थो में फूल चढ़ाये, उनकी स्मृतियों में धर्मशालायें बाँधी. उन्होंने मृतकों की याद को सदा के लिये जीवन का हिस्सा बनाने के लिये श्राद्ध के महिने का अविष्कार किया. कौन सा पूर्वज अपने ही परिवार में फिर से जन्मा है, यह देखने



के लिये शरीर के चिन्हों की पहचान की. जन्म जन्मांतर की यात्रा को नमन करने के लिये पूर्वजन्म की संकल्पना और कर्मफल सिद्धांत को स्वीकार किया. क्योंकि वे जीना चाहते थे, जीवन का सम्मान करना चाहते थे. उन्होंने फल फूल, पेड़ पौधे, पशु पक्षी, नदियों, पहाड़ो में ईश्वर को खोजा और चराचर जगत के कण कण में जीवन की सत्ता को स्वीकार किया. नतीजे में वे महानतम नायकों से भरी जीवन कथाओं का पारायण ही नहीं उनका निर्माण भी करते रहे. भले ही उनके कदम चाँद या मँगल पर नहीं पड़े हो किंतु चांद से वे रोज मुखातिब थे और मंगल उनकी जिंदगी में किसी उग्र रिश्तेदार की तरह रोज उत्पात मचाते रहता था. यह वह जीवन था, जो अपने आसपास के कण कण से जुड़ा हुआ था. तब भले ही लोग युद्धों में मारे गये हो किंतु आत्महत्या को पाप माना गया. क्योंकि तब सरकार नाम की कोई भी संस्था हमारे जीवन में इतने ताकतवर अंदाज में मौजूद नहीं थी. समाज का सामूहिक भला करने वालो का पागलपन समाज को नियंत्रित नहीं कर रहा था. तब कोई योजना आयोग मौजूद नहीं था, जो हमें यह बताता कि देश कितने बच्चों का बोझ संभाल सकता है. जीवन एक मुक्तगान की तरह अपनी व्याख्या स्वयं कर रहा था. वह जीवन के जितना ही अनपेक्षित और आकस्मिक चमत्कारों से भरा था. उसी अनपेक्षित दौर ने हमारे सबसे महान साहित्यकारों, राष्ट्र नायकों, प्रेम कथा के नायक नायिकाओं, वास्तुविदों, चिकित्सकों, गायको और अनूठे शिल्प से भरे मंदिरों या गुफाओं को जन्म दिया.

कण कण में ईश्वर की सत्ता को मानने वालों ने वास्तव में एक एक कण को अपनी उर्जा और प्रतिभा से सदा के लिये बदल कर रख दिया. इतने सुंदर जीवन में कोई क्यों लौटना नहीं चाहता? इसलिये हम इस धरा पर बार बार लौटते रहे. कभी अपने ही लोगों के बीच, तो कभी अनजाने लोगों के बीच में. यह वह दौर था जब हमारे माँ बाप सोने की सीढ़ी की लालसा में जीवन जीते थे. पोते पड़पोतो का सुख जीवन को प्रेरित या बनाये रखने वाली मुख्य शक्ति था. मेरा परिवार हम तीन भाईयों का सामुहिक परिवार होने से मेरी माँ को यह सौभाग्य नसीब हुआ. देश के कितने परिवार, इस सरकार नियोजित विस्थापन से बचे होंगे, जहाँ सोने की सीढ़ी का सुख देखने वाली माताएँ मौजूद होगी? क्या हमारे बुजुर्ग, वृद्धाश्रमों के अकेलेपन में किसी पड़पोते के जन्म का वह आनंद उत्सव मना पायेंगे, जो मेरी माँ के हिस्से में आया है.

**- ॲड. दिनेश शर्मा**
पुलगाँव, जि. वर्धा महाराष्ट्र.
मो. ९३२६८४१९२४
dgsharma07@gmail.com

■■

# अलीगढ की पदयात्रा

**आपल्या थिंकटँकर्सची मेमरी हँग झाल्याचे पाहून माताजींनी ठरवले, की तूर्त म्हणून चिरंजीवांना दोन-चार दिवस चालू द्यावे. नाहीतरी मीडियावाल्यांच्या त्या करप्शनविरोधी बातम्या वाचून-पाहून जनता कंटाळली आहे. त्यांनाही काही आनंदी न्यूज द्याव्या लागणार आहेतच, एकदा का आपले चिरंजीव चार पावले चालले तर थकतील, थकल्यावर शांतपणे रात्री किमान झोपतील, बरे ही झोप खेड्यापाड्यात कोठेतरी एखाद्या झोपडीसदृश्य बेडवर पॅकेजमध्ये ठेवू या, इव्हेन्ट मॅनेजमेंटवाल्याला सांगू या म्हणजे तिथेही आपले अनेक कार्यकर्ते ठेवता येतील. संभाव्य राजे चालत येणे ही कल्पना तिकडे उत्तरेतल्या साऱ्यांना आवडेल...**



**शे.भ.प.** शेती भक्त परायण)
**-'थंडा' महाराज देगलूरकर**

**अपने दिल में लेकर लगन**
**चलते रहने की दिमाग में अगन**
**कौनसी थी वह दिल की अगन?**
**किसने लगायी दिमाग में मगन?**

मध्यप्रदेशनामक भारतवर्षातील एका राज्याचे माजी प्रतिपाल तथा पंढरपूरच्या वारीचे व्यावसायिक वारकरी भिज्‌विजयसिंग हे एके दिवशी इंद्रपस्थनगरीवरील माताजींच्या दरबारात पोहोचले ते वरील ओझे मनात घेऊनच. या ओळी त्यांना तेव्हा सुचण्याचे कारण जे होते ते म्हणजे माताजींचा आदेश. त्या आदेशात त्यांनी विचारणा केली होती, की हमारं, बुढह होत जा रहा बच्चा अब भी नादान हरकते कर रहा है, एखादं कुडी फसाने की बजाय देश की चिंता करने का ख्वाब देखत है, उसकी चिंता का ख्वाब आम पब्लिक को सच लगे ऐसा कुछ सोचकर आव!! भिज्‌विजयसिंग हे भलत्याच विचारांसाठी अणि असे भलते विचार हे सलत्या पद्धतीने पचकण्यासाठी 'प्रवक्ता दशसहस्त्रेशू' म्हणून ख्यातनाम होतेच. त्यांना आता तर तातडीने विचार व्यक्त करायचे होते, आजवर त्यांनी घडून गेलेल्या घटनेच्या क्रमाला पाहूनच विचार व्यक्त करण्यात सामर्थ्य प्राप्त केले होते. आपलीच ही अडचण पाहून त्यांनी आपली संभाव्य 'टूर डायरी' पाहिली आणि त्यातील आपले नियोजित दौरे वाचून त्यांना त्यात 'आषाढीनिमित्त विठोबारायाचे आजी प्रतिपाळासोबत आपोआपच मुखदर्शन तथा तद्‌नंतर सुखभोजन' हे प्रवासकारण पाहून हर्ष दाटून आला. शेकडो किलोमीटर चालून येणाऱ्या वारकऱ्यांसारखेच त्यांनी आपल्या बच्चूराजांना उत्तरप्रदेशात माफक प्रमाणात मिनीवारीचा मार्ग सूचवण्याचे मनोमन ठरवले. हे ठरवणे म्हणजे त्यांचा महतविचार होता. या विचारामागचे विश्लेषण तर त्यांना आधीच माहीत होते. या विश्लेषणात एक सूत्रही दडले होते. ते सूत्र असे होते.

**धनाढ्यांना कुतूहल दारिद्र्याचे ।**
**दारिद्र्याला वेड श्रीमंतीचे ।।**
**शेतकरी म्हणजे दारिद्र्य प्रतिक ।**
**श्रीमंती तेथे निव्वळ पथिक ।।**

हे सूत्र घेऊन ते माताजींच्या दिवाण ए खासमखासमध्ये पोहोचले, तेव्हा माताजी हैराणावस्थेत त्यांना दिसल्या तेव्हा त्यांनी नम्रतेने त्यातील अतिलीनता नावाचा नवा प्रकार वापरून त्यांच्या तळपायाखालील पादत्राणांच्या धुळीकडे नजर झुकवून विचारणा केली, की 'मोस्टेस्ट ऑनरेबल मॅडमजीसाहेबा, आप इतनी महाचिंतीत क्यों हैं जी?' माताजी पश्चिम दक्षिणेकडे पाहून म्हणाल्या, की वो चिंटा-फिंटा छोड के ये बतावो की क्या सोचके आये हो, लफडेवाली सोच मत बोलना, क्यों के टुमको रायपूर में उस सोच के लिए किटनी मार पडी थी वह याद है ना?' आपल्या माताजीला आपण मार खाल्ल्याचे प्रकरण कोणी रिफ्रेश करून दिले असेल याची काळजी सोडून भिज्‌विजयसिंगांनी त्यांना बच्चा महाराजांना पदयात्रेला सोडून द्यावे ही आपली कल्पना सांगितली आणि या कल्पनेला समांतर म्हणून त्यांनी आपल्या दरवर्षीच्या काल्पनिक वारकरी म्हणून चालत जाण्याचा अनुभव

सांगितला. भिज्‌विजयाचे हे विचार माताजीला प्रथमदर्शनी मान्य झाले, कारण त्यांना दुसऱ्या कोण्या सरदाराने एकही मार्ग सूचवला नव्हता. या प्रथमदर्शनी मान्यतेला बळकटी म्हणून त्या ताड्‌कन उठल्या, कॉम्प्युटरजवळ गेल्या, इंटरनेटवर पोहोचल्या, गुगलवर पदयात्रा, वारकरी या शब्दांच्या सीमीलर ऑप्शनला क्लिक केले आणि त्यांना जे पर्याय सापडले त्यांबद्दल त्यांनी आपल्या पीएला प्रिंट आऊट काढायला लावली आणि सर्व थिंक टँकर्सची थिंक कुंथन बैठक बोलावली. ही बैठक भिज्‌विजयसिंगाच्या साक्षीनेच पार पडली आणि या नियोजित पदयात्रेच्या फलनिष्पत्तीच्या कल्पनेनेच सारेजण चिंब-लिंब भिजले. या बैठकीत जे माताजींनी प्रश्न विचारले त्यात हा प्रश्न होता म्हणे, की पूर्वी कोणीतरी मीठासाठी दांडीयात्रा काढली होती ती कशासाठी होती? या गुढ प्रश्नावर सर्व अतिबुद्धीवितांनी एकच उत्तर दिले की, माताजींचा तो प्रश्न अत्यंत जटील असून त्यासाठी त्या साऱ्यांना संशोधन करावे लागणार आहे तेव्हा ते सारे बघून सांगतील आणि बघत बसतील किंवा सांगून बघतील! आपल्या थिंकटँकर्सची मेमरी हँग झाल्याचे पाहून माताजींनी ठरवले, की तूर्त म्हणून चिरंजीवांना दोन-चार दिवस चालू द्यावे. नाहीतरी मीडियावाल्यांच्या त्या करप्शनविरोधी बातम्या वाचून-पाहून जनता कंटाळली आहे. त्यांनाही काही आनंदी न्यूज द्याव्या लागणार आहेतच, एकदा का आपले चिरंजीव चार पावले चालले तर थकतील, थकल्यावर शांतपणे रात्री किमान झोपतील, बरे ही झोप खेड्यापाड्यात कोठेतरी एखाद्या झोपडीसदृश्य बेडवर पॅकेजमध्ये ठेवू या, इव्हेन्ट मॅनेजमेंटवाल्याला सांगू या म्हणजे तिथेही आपले अनेक कार्यकर्ते ठेवता येतील. संभाव्य राजे चालत येणे ही कल्पना तिकडे उत्तरेतल्या साऱ्यांना आवडेल आणि बच्चाराजे, 'टपटप - टपटप चाले राजा, पब्लिक म्हणते आजा-आजा' ही बालकविता आठवतील. हे विचार माताजींच्या मनात आले आणि त्या खुदकन् हसल्या आणि मनोमन म्हणाल्या,

**बहेन प्यारी मोहमाया अती**
**करुंगी अब तेरी माती**
**मन में जागी करले भीती**
**दचकून उठ रोज राती**



हे मनोमन बोलणे ऐकणेही भिज्‌विजयसिंगांच्या कर्णपटलावर लाऊडस्पीकरने आदळले आणि त्यांनी पदयात्रेआधीच अलीगढच्या मालकाचे मैदान जनसभेसाठी बूक करून टाकले आणि तिथे काय करावे याचे सादरीकरण ठरवले. इकडे बच्चाराजे मनात विचारत होते, की दोन वर्षांआधी आपण महाराष्ट्रातल्या यवतमाळला गेलो होतो तेव्हा कलावतीनामक महिलेला भेटलो होतो ती कलावती तर नंतर इलेक्शनला उभी राहिली होती, मुंबईला लोकलमध्ये फिरलो होतो तर आपल्या टीका झाली होती, उत्तर प्रदेशातल्या श्रावस्तीमध्ये महिलेच्या घरी राहिलो होतो, तर नाटक्या म्हणून बोल ऐकावे लागले होते- आता मात्र आपण अलीगढला भव्य (?) विचार प्रगट करू. (आपल्या वारीचा संदर्भ घेऊन ही बालवारी ठरल्याचे पाहून इकडे आषाढी एकादशी मनात खदाखदा हसली, वारी परतताना पाऊस पाडण्याची परंपरा उत्तरेत न पाळण्याचे तिने मनोमन ठरवले आणि आणि ऐन सभा-उत्सव ज्या मैदानमंदिरी होणार होता तिथे तिने अतिवृष्टी टाकून त्या मैदानाला चिखलसरोवर करून टाकले.) या विचारानेच बच्चाराजे खुलले.

बच्चाराजाला जो भव्य विचार शेतकऱ्यांच्या जमीन अधिग्रहणाबाबत द्यायचा होता त्या विचारानुसार ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीला अधिग्रहणाचा टिळा लावायचा असेल त्या जमिनीची मालकी प्रथम त्यांच्याच पार्टीच्या तगड्या स्थानिक कार्यकर्त्यांना सोपवावी, त्यांनीच त्याबाबत व्यवहार ठरवावा आणि मग ते जे म्हणतील ती किंमत शेतमालकाने मान्य करावी. ही विचारसर म्हणजे सेझचे रूप आणि रोजच तूप अशी होती. मानव ठरवतो तर निसर्ग फेटाळतो- हेच तिथे घडले. या सरीवर जलधारा कोसळल्या आणि अलीगढला जे घडले त्याने जेमतेम सत्तर किलोमीटरची ही वारी ऊर्फ यात्रा उधळली गेली आणि तिकडे बहेनजींची अहंकाररूपी माया पुन्हा सत्तालोभात गुरफटून गेली. हे सगळे घडले आणि भिज्‌विजयसिंग नेमाप्रमाणे पंढरी येऊनी-

**द्या हो विठोबा, मला एक पद**
**तुम्हाला चढवेल सोन्याचाच कद**
ही आळवणी घालून गेले.

**- शे.भ.प. 'थंडा' महाराज देगलूरकर**
**मु. पो.** thandamaharaj@gmail.com
टेम्परसी टूजी कार्ड संपर्क क्र. ९४२१८३९६६९

■■

# खूप उशीर झाला तरी साखर निर्यातीच्या घोषणेचे स्वागत

केंद्रीय अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखालील विशेषाधिकार मंत्री समितीने आणखी ५ लाख टन साखर निर्यात करण्याचा निर्णय घेतला आहे. निर्णय घेण्यास खूपच उशीर झाला आहे. याचे दुष्परिणाम साखर उद्योगाला भोगावे लागत आहे. याचे वाईट परिणाम पर्यायाने ऊस उत्पादकांवर ही होतो आहे. तरीही उशीरा का होईना निर्णय झाला याचा आनंद आहे.

केंद्राने या पूर्वी ५ लाख टन साखरेच्या निर्यातीला परवानगी दिली होती. तथापी प्रत्यक्षात मात्र चालढकल झाली. त्याचे आदेश काढले गेले नाही. त्यामुळे अद्याप १ लाख टन साखरेची साखरेची निर्यात झाली नाही.

उसाला मिळाणारा सध्याचा भाव शेतकऱ्यांना समाधान कारक वाटतो आहे. या मुळे उसाच्या क्षेत्रात वाढ होते आहे. यामुळे पुढील वर्षी उसाच्या उत्पादनात मोठी वाढ होईल. त्यामुळे खुप जादा साखरेचा साठा राहू शकतो. या साठीच साखरेची निर्यात त्वरीत व्हावी असे आम्ही आग्रहाने प्रतिपादन केले होते. तथापी नेहमी सरकार वाजवी पेक्षा जादा सावध भूमिका घेते आहे.

सरकारला शेतकऱ्यांपेक्षा ग्राहकांची चिंता जास्त् आहे. कारण ग्राहक संख्येने जास्त आहेत. त्यांच्या असंतोषाचा परिणाम निवडणूकीतून दिसतो. म्हणून ५ लाख टन साखर निर्यातीचा निर्णय अतिशय सावधपणे सरकारने घेतला, त्यानंतर प्रत्यक्षात तो निर्णय होऊ देण्यात ही टाळाटाळ केली. अद्याप १ लाख टन साखरेची निर्यात झाली नाही.

देशात गरजेपेक्षा जादा साखरेचे उत्पादन होते आहे. निर्यातीचा निर्णय ताबडतोब घेणे आवश्यक आवश्यक आहे असे आम्ही आग्रहाने प्रतिपादन केले होते. या संबधात चालढकल करीत अखेर सरकारने निदान ५ लाख टन साखरेचा निर्यातीचा निर्णय घेतला आहे. तथापी पावसाळा तोंडावर असल्याने केवळ कंटेनरमधूनच निर्यात होईल. निर्यात अतिशय संत गतीने होईल

सध्या उसाला मिळलेला भाव शेतकऱ्यांना समाधानकारक वाटला आहे. यामुळे ऊस क्षेत्रात वाढ होण्याची शक्यता आहे. उत्तर प्रदेशात यंदा उसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढेल असे वाटते. उत्तर प्रदेशातातील राज्य सूचीत किंमत शेतकऱ्यांना समाधानकारक वाटली. शिवाय कारखान्यांनी ऊसभाव ही वेळेवर दिला आहे. यामुळे यंदा तेथे ऊसाच्या क्षेत्रात चांगली वाढ अपेक्षीत आहे.

या उलट महाराष्ट्रात सोलापूर-पुणे-नगर जिल्ह्यात ऊसाचे क्षेत्र मोठे होते. काही भागात ऊस खूप उशिरा तुटला तर काही भागात ऊस शिल्लक राहण्याची शक्यता दिसत आहे. तरीही पुढील वर्षी कारखान्यांना ऊस कमी पडेल असे दिसत नाही. यामुळे महाराष्ट्रात ही साखर उत्पादनात वाढच होईल अशी स्थिती आहे.

साखर उत्पादन वाढते आहे. साखरेची निर्यात करणे आवश्यक आहे. याचे भान अखेर सरकारला येऊ लागले हे आंनदाची गोष्ट आहे.

आणि उत्तर प्रदेश या दोन राज्यात सुमारे ६० टक्के साखर उत्पादन होते. उत्तर प्रदेशात ऊसाचे क्षेत्र वाढत असल्याच्या बातम्या आहेत. किमान १० टक्के क्षेत्रवाढ अपेक्षीत आहे. महाराष्ट्रातही क्षेत्रवाढ होईल असे दिसते. महाराष्ट्रतील काही भागात ऊस तोडणीसाठी अडचणी आल्या,१. तोडणी कामगारांची टंचाई जाणवली काही भागात तोडणी अभावी ऊस शिल्लक राहण्याची शक्यता आहे. साधारण १ लाख टनापेक्षा जादा ऊस शिल्लक राहील असे दिसते.

पुढील वर्षी पुन्हा जादा ऊस आहे. नवे कारखाने गाळपासाठी सिध्द होत आहेत. अन्य राज्यात ही साखर उत्पादन वाढते आहे. यामुळे पुढील वर्षी ३०० लाख टन साखर उत्पादन झालेस आश्चर्य वाटायला नको. या पार्श्वभुमीवर यंदा किमान २० लाख टन निर्यात करणे गरजेचे होते. पण सरकारने टंगळ मंगळ करीत फक्त १० लाख टन साखर निर्यातीस परवानगी दिली आहे. याचे अर्थिक दुष्परिणाम पुढील वर्षी दिसतील.

५ लाख टन निर्यातीची घोषणा झाल्यानंतर देशातील साखरेच्या भावात ४ ते ५ रू किंलोनी वाढ झाली आहे. पण यात डिझेलच्या दरात वाढ झाल्याचाही परिणाम आहे. सदर घोषणा पूर्वी साखरेचे भाव २४०० च्या दरम्यान होते. कोल्हापूर जिल्ह्यातील कारखान्यांनी तर प्रतिटन २०००रू दर दिला आहे. त्यांना आता यापुढे दर देण्यात मोठ्या अडचणी येऊ शकतात. त्यांना या निर्यातीच्या घोषणेमुळे झालेल्या दरवाढीमुळे थोडासा दिलासा मिळू शकतो.

**अजित नरदे**
संपादक - साखर डायरी

# साखर निर्यात आणि साखर कारखाने

सरकारने ५ लाख टन साखर निर्यात करण्याची घोषणा केली आहे. या साखरेची निर्यात ही गेल्या निर्याती सारखीच असेल असे वाटते. ५ लाख टन साखरेचा कोटा गेल्या वेळी प्रमाणे देशातील सर्व साखर कारखान्यांना वाटून दिला जाईल.

गेल्या वेळी ५ लाख टन निर्यातीची घोषणा झाली. तरी प्रत्यक्षात ४.४८ लाख टन निर्यातीचा कोटा जाहीर झाला. त्या पैकी महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना एकूण १.६२ लाख टन निर्यातीचा कोटा मिळाला होता. तरीही इतर राज्यातील कोट्याची साखर महाराष्ट्रातूनच निर्यात झाली. यामुळे महाराष्ट्रातून २.७५ लाख टन साखर प्रत्यक्षात निर्यात झाली.

या वेळी ५ लाख टन निर्यातीच्या कोट्यामुळे १.७५ लाख टन साखर निर्यातीचा कोटा महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना मिळू शकेल. पण गेल्या वेळी प्रमाणे या वेळी ही अन्य राज्यातील साखर कारखान्यांच्या कोट्याची साखर महाराष्ट्रातून जाण्याची शक्यता आहे. याचे कारण बंदरापासून अतिशय दूर असलेल्या साखर कारखान्याचा साखर वाहतूक खर्च खूप जादा येतो. शिवाय त्या भागात साखरेच्या किंमतीही महाराष्ट्रापेक्षा खूप जादा असतात. म्हणून तेथून साखर आणून निर्यात करणे परवडत नाही.म्हणून साखर व्यापारी त्याच्या कोट्याचे परवाने विकत घेतात त्यावर महाराष्ट्रातील साखर खरेदी करून निर्यात करतात. यामुळे या वेळी ३ लाख टन पेक्षा जास्त साखर महाराष्ट्रातून

निर्यात होईल असे मला वाटते.

सध्या आंतरराष्ट्रीय साखरेचे भाव चांगले आहेत. ७०० डॉलर F.O.B. (Free on board) म्हणजे बंदरात जहाजावर पोहोच साखरेचे आहेत. यामुळे साखर कारखान्यांना निर्यातदार व्यापाऱ्याकडून प्रती क्विंटल रू ३००० पर्यंत दर मिळू शकेल. हा दर देशातील सध्याच्या साखरेच्या भावापेक्षा रू ५०० ते ६०० जादा असू शकेल.

निर्यातदार व्यापारी बाहेरच्या राज्यातील साखरेचा कोटा प्रिमियम देऊन खरेदी करतील. ते पुन्हा महाराष्ट्रातील कारखान्याकडून निर्यातीसाठी साखर खरेदी करतील. त्याचा दर रू २४५० प्रती किंवटल असू शकेल. त्या वेळेच्या त्या प्रतीच्या साखरेच्या प्रचलीत किंमती प्रमाणेच व्यापारी खरेदी करतील. कारखान्याच्या फायदा फक्त साखर लवकर विकणे, साठवणूक आणि व्याज यावरील खर्चात बचत अशी राहील.

सरकाच्या वेबसाईटवर नोटीफिकेशन घोषीत झाले नंतर निर्यातीचे रिलीज आर्डर निघू लागतील. रिलीज ऑर्डर ३० दिवसात निघतील त्यानंतर प्रत्यक्षात निर्यातीच्या कार्यवाहीला सुरुवात होईल. १ नंतर ६० दिसात ५ लाख टन साखर निर्यात होईल अशी अपेक्षा आहे.

काळ, काम, वेग लक्षात घेता सध्याच्या कोट्याची निर्यात १ ऑक्टोंबर पर्यंत होईल. याचा अर्थ चालू हंगामात १० लाख टन पेक्षा जादा साखर निर्यात होण्याची शक्यता नाही. आणखी निर्यातीसाठी पुढील साखर हंगामातील घोषणेची वाट पहावी लागेल. त्या वेळी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत साखरेचे भाव काय असतील हे आज सांगणे कठीण आहे.

मात्र आपण साखर निर्यातीची सुवर्ण संधी घालवली आहे मात्र निर्यात स्पष्ट होईल, त्यावेळी साखरेचे भाव कदाचीत कमी झाले असतील

बाजारपेठेत चांगल्या दराने साखर विक्री करण्याची संधी आपण निश्चत गमावली आहे. याचे परिणाम साखर उद्योगाला आणि ऊस उत्पादक शेतकरी यांना भोगावे लागतील.

**दिपेश ठक्कर**

(साखर निर्यातदार)

शेतकरी महिला आघाडी

# संयुक्त कार्यकारिणीची बैठक

शेतकरी संघटना

**प्रिय मित्र,**

**स. न. वि. वि.**

दि. २९ व ३० जुलै २०११ रोजी अहमदनगर येथे शेतकरी संघटना, शेतकरी महिला आघाडी, शेतकरी युवा आघाडी आणि स्वतंत्र भारत पक्ष यांच्या संयुक्त कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीस सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे ही विनंती.

* **शेतकरी संघटना आणि स्वतंत्र भारत पक्ष यांच्या संयुक्त कार्यकारिणीतील विषय :**

१. शेतकरी संघटक या पाक्षिकाच्या मालकी हक्कासंदर्भात न्यास किंवा ट्रस्टची स्थापना करणे.
२. कर्जमुक्ती आंदोलन टप्पा ३ चे नियोजन करणे.
३. स्वतंत्र भारत पक्षाची सभासद नोंदणी मोहीम सुरू करणे.
४. दि. ९ ऑगस्टपासून स्थानिक स्वराज्य संस्थांतील संभाव्य उमेदवारांनी आपापल्या मतदार संघात साने गुरुजी शेतकरी संवाद यात्रा सुरू करणे.
५. कॅगने दिलेल्या साखर कारखान्यांसंदर्भातील अहवालानुसार पश्चिम महाराष्ट्रात सहकारविरोधी परिषद घेणे.
६. नवीन भू-संपादन कायदा संदर्भात रणनीती ठरविणे.
७. शेतकरी संघटकचे वर्गणीदार वाढविण्यासंदर्भात कार्यवाही करणे.

कळावे

आपले,

**रवि देवांग**
अध्यक्ष, शेतकरी संघटना

**वामनराव चटप,**
अध्यक्ष, स्वभाप (महाराष्ट्र)

**सौ. जयश्री पाटील,**
अध्यक्ष, शेतकरी महिला आघाडी

**अनिल घनवट,**
अध्यक्ष, शेतकरी युवा आघाडी

**सौ. शैलजा देशपांडे,**
अध्यक्षा, स्वभाप महिला आघाडी

**संपर्क:**

अनिल घनवट - ९९२३७०७६४६, राजेंद्र लोंढे -९८६०२८८२३५, लालासाहेब सुद्रिक -९४२२६१५२९१

**स्थळ** -लक्ष्मी नारायण मंगल कार्यालय, टिळक रोड, स्वास्तिक चौक, औ.बाद-पुणे बसस्टँडजवळ, अहमदनगर.

**दिनांक** २९ व३० जुलै २०११

**टीप : बैठक दोन दिवसांची प्रदीर्घ असल्यामुळे केवळ निमंत्रित कार्यकर्त्यांनी निवासाच्या दृष्टीने यावे.**